


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २९ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




## अकोल्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती निश्चित

**अकोला/प्रतिनिधीः** आगामी महानगरपालिका निवडणूकच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांच्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. दोन्ही पक्षांची भूमिका जवळपास निश्चित मानली जात असून ही निवडणूक अत्यंत चुरशीची आणि निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजकीय वर्तुळात या लढतीकडे मोठ्या राजकीय मुकाबल्याच्या रूपात पाहिले जात आहे.दरम्यान,अकोल्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांच्यातील युती जवळपास निश्चित झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.दोन्ही पक्ष संयुक्तपणे निवडणूक लढवण्याच्या रणनीतीवर सक्रियपणे काम करत असून याच पार्श्वभूमीवर आज एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला दोन्ही पक्षांचे ज्येष्ठ आणि प्रमुख नेते उपस्थित होते.



काँग्रेसकडून आमदार साजिद खान पठाण, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. झीशान हुसेन, महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे सहभागी झाले होते.तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून जिल्हाध्यक्ष संग्राम गवांडे, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, प्रदेश संघटन सचिव जावेद झकरिया हे नेते बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत महानगरपालिका निवडणुकीची रणनीती, संघटन अधिककटीकरणाचे उपाय तसेच युतीअंतर्गत प्रभावी निवडणूक तयारी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. एकत्रितपणे निवडणूक मैदानात उतरण्याचा आणि जनतेशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देण्याचा संकल्प यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.मात्र, एका प्रभागाबाबत अद्याप अंतिम सहमती झालेली नसल्याचे सांगण्यात आले. त्या प्रभागात लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा नेत्यांनी व्यक्त केली असून, अन्यथा तेथे मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता असल्याचेही सूचित करण्यात आले. उद्या सोबत सुद्धा बैठक पार पडणार असून यामध्ये महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणूक लढणार अशी घोषणा करण्यात येणार असल्याची शक्यता आहे.तर जागा वाटपा संदर्भात चर्चा सुद्धा उद्या होणार असल्याची शक्यता आहे.

# ठाकरे बंधुंची युती तुटली! उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून स्वबळाचा नारा

**मुंबई/प्रतिनिधी** : उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं राजकीय युतीची घोषणा करुन एक आठवडाही पूर्ण झालेला नसताना दोन्ही पक्षांनी आता अचानक वेगवेगळं लढण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. हा निर्णय वसई-विरार महानगरपालिकेसाठी घेण्यात आला आहे. स्थानिक स्तरावर सदर निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं स्वबळाचा नारा दिला असला तरी मनसेनं मात्र स्थानिक स्तरावरील युतीमध्ये कायम राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**आता युतीत कोण उरलं?**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीमध्ये बहुजन विकास आघाडी, मनसे, काँग्रेस एकत्रित निवडणूक लढवणार आहे. बहुजन विकास आघाडीच्या चिन्हावर हे दोन्ही पक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याची माहिती समोर येत आहे. पालिकेच्या २९ प्रभागात ११५ उमेदवार तिन्ही पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या मैदानात उतरवले जाणार आहेत.

**या महापालिकेची रचना कशी आहे?**



महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वसई-विरार तालुक्यात असलेल्या वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै २०१० रोजी झाली आहे. चार नगरपरिषदा आणि ५३ ग्रामपंचायती एकत्र करून ही महानगरपालिका तयार करण्यात आली. या महापालिकेच्या क्षेत्रात वसई, विरार, नालासोपारा, नैगाव इत्यादी शहरांचा समावेश आहे. महापालिकेमध्ये एकूण २९ प्रभाग (वाड्‌र्स) आहेत. एकूण ११५ जागा असून त्या २८ प्रभागांमध्ये प्रत्येकी चार जागा आणि एका प्रभागात तीन जागा आहेत.

**या निवडणुकीतील तिरंगी लढत कशी असणार?**

महायुती : भाजपा आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांची युती झाली असून ते ११५ पैकी शिवसेना २४ जागांवर उमेदवार देत आहे. बहुजन विकास आघाडीविरोधात हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत.

महाविकास आघाडी (शृ) : काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या तिघांसोबत बहुजन विकास आघाडी निवडणूक लढणार असं ठरलं होतं. मात्र ऐनवेळी ठाकरेंच्या शिवसेनेनं स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र शिवसेना बाहेर पडत असली तरी इतर पक्ष आघाडीमध्येच निवडणूक लढवणार आहेत. पण शृ स्वतंत्रपणे लढत असल्याने स्पष्ट नाही.

### तिरंगी लढत

मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेनं बहुजन विकास आघाडीसोबत झालेल्या या महाविकास आघाडीतून बाजूला होण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरेंची शिवसेना आता वसई-विरारमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचा नारा दिला आहे. यामुळे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. भाजपा आणि एकनाथ शिंदेंच्या युतीसमोर ठाकरेंची शिवसेना आणि मनसे,काँग्रेस, बविआ आघाडीचं आव्हान असणार आहे.

## 'राहुल बाबा, इतक्यात थकू नका! अजून बंगाल-तामिळनाडूतही पराभव बघायचा आहे'- अमित शहा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** 'काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वारंवार होणा?्या पराभवामुळे आताच थकून जाऊ नये, कारण आगामी काळात बंगाल आणि तामिळनाडूमध्येही त्यांना मोठ्या पराभवाचा सामना करावा लागणार आहे,' अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधींना टोला लगावला. अहमदाबाद महानगरपालिकेच्या ३३० कोटी रुपयांच्या विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शहा यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीबाबतही मोठे भाष्य केले.



देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना अमित शहा म्हणाले की, '२०२९ मध्ये भारतीय जनता पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा सत्तेत येईल. भाजपची तत्त्वे आणि जनतेशी असलेले नाते इतके घट्ट आहे की, देशाचा विकास रथ कोणीही रोखू शकणार नाही.'

अमित शहा यांनी आपल्या भाषणात काँग्रेसच्या विरोध करण्याच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली. राम मंदिर उभारणी असो किंवा पाकिस्तानवर केलेला सर्जिकल स्ट्राईक, काँग्रेसने प्रत्येक☞(पान २ वर)

## मुंबईसाठी अजित पवारांच्या ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

### नवाब मलिकांचे भाऊ-बहीण मैदानात

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात महापालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून उमेदवारांच्या नावांची यादी निश्चित होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका निवडणुकासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादीने आघाडी घेत ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. महापालिकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या १०० उमेदवारांची यादी जाहीर होईल, अशी माहिती आमदार आणि नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांनी दिली होती. मात्र, पहिल्या यादीत ३७ उमेदवारांना संधी देण्यात आली असून नवाब मलिक यांच्या भावासह कुटुंबातील तिघांना उमेदवारी देण्यात आली आहे. नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक, त्यांची सुन बुशरा मलिक आणि बहीण सईदा खान यांना महापालिकेच्या मैदानात उतरवण्यात आलं आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबई महापालिकेत स्वबळाचा नारा दिला असून उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, उद्यापासूनच या उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटपही केले जाणार आहे. राष्ट्रवादीकडून मुंबई महापालिका निवडणुकांची जबाबदारी नवाब मलिक आणि आमदार सना मलिक यांच्यावर सोपवण्यात☞(पान २ वर)

## अदानी बारामतीत, मंचावर बसलेल्या साहेब अन् दादांची चर्चा..!

### एकत्र येण्याच्या चर्चांना पुन्हा बळ



**पुणे/प्रतिनिधी** : राज्यभरात आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, अनेक पक्षांमध्ये बेरीज-वजाबाकीची समीकरणे पाहायला मिळत आहेत. पुण्यात पवार कुटुंबीय पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही गटांमध्ये जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्याने ही चर्चा फिस्कटल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

अशातच आज बारामती येथील विद्या प्रतिष्ठानमध्ये उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या जागतिक 'एआय' सेंटरचे उद्घाटन पार पडले. या कार्यक्रमासाठी उद्योगपती गौतम अदानी हे त्यांच्या पत्नी डॉ. प्रीती अदानी यांच्यासह उपस्थित होते. या निमित्ताने पवार कुटुंबीय अनेक दिवसांनंतर एकाच व्यासपीठावर एकत्र आलेले पाहायला मिळाले.

या कार्यक्रमात व्यासपीठावर ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्रा☞(पान २ वर)

## शरद पवार माझे मार्गदर्शक..'

### गौतम अदानींकडून पवारांच्या कार्याचे भरभरून कौतुक

**बारामती /प्रतिनिधी** : आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या देशातील पहिल्या अत्याधुनिक महाविद्यालयाचे उद्घाटन बारामतीत उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते आज झाले. यावेळी उद्योगपती गौतम अदानींवर ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे यांनी स्तुतीसुमनांचा वर्षाव केला.



यावेळी उद्योजक गौतम अदानी यांनी त्यांच्या भाषणात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला. अदानी यांनी शरद पवार यांना 'माय मेंटॉर' असे संबोधले. शरद पवारांना सर्व क्षेत्रातील माहिती अधिक आहे. शरद पवार माझ्यासाठी आदरणीय आणि आदर्श आहेत. अदानी म्हणाले, 'परिवर्तनाचे प्रतीक म्हणून बारामतीकडे पाहिले जाते. एक नेतृत्व कसे विकास साधू शकते, याचे उदाहरण म्हणून शरद पवार यांच्या कामांना बघितले जाते. कृषिमंत्री पदावर असताना त्यांनी केलेल्या कृषी धोरण, अन्नसुरक्षा कायदा, सहकारी संस्थांचा विकास आणि ग्रामीण अर्थकारणाला चालना देण्याचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्री पदावर असताना राष्ट्रीय हिताचे धोरण राबविणारा नेता क्वचितच दिसतो. त्यांना सर्व क्षेत्रातील माहिती आहे आणि त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक कामे उभारली आहेत.' ☞(पान २ वर)




## अंगावरील सोनं पाहून नियत बदलली
## मित्रांनीच महापालिकेसाठी तयारी करणाऱ्या तृतीयपंथी उमेदवाराला संपवलं

**सोलापूर/वृत्तसंस्था-** : राज्य भरात महानगरपालिका निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच दुसरीकडे सोलापूर शहरात एका तृतीयपंथीयाचा निर्घृणपणे खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या खूनाच्या घटनेनं खळबळ उडाली आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी इच्छूक असलेल्या आणि महानगरपालिकेची तयारी करत असलेल्या भावी नगरसेवकाचा खूनाच्या घटनेनं खळबळ उडाली आहे. अय्युब हुसेन सय्यद (वय ५० रा. उत्तर सदर बझार, सोलापूर) असं मृत तृतीयपंथीयाचं नाव आहे. अय्युब सय्यद हे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार होते. त्यांनी प्रभाग १६ मधून निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली होती, मात्र त्यापूर्वीच त्यांचा खून झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या सोशल मिडीया अकाऊंटवरती देखील ते पालिकेसाठी तयारी करत असल्याचे व्हिडीओ शेअर करण्यात आलेले होते. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर सदर बझार येथील एका तृतीयपंथीचा तोंडावर उशीने दाबून खून करण्यात आला. ही घटना काल (शनिवारी ता, २७) दुपारी तीनच्या सुमारास उघडकीस आली आहे. अय्युब हुसेन सय्यद (वय ५० रा. उत्तर सदर बझार, सोलापूर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला. हा खून का केला याचे कारण अस्पष्ट आहे. सय्यद हे शुक्रवारी झोपण्यासाठी राहत्या घरातील वरच्या मजल्यावर गेले होते. सकाळी उठले ☞(पान २ वर)



## बांगलादेशात आणखी एका हिंदूची हत्या

### घरात कोंडून जाळले, अमित मालवीयंचा दावा...

**दतहम /वृत्तसंस्था-:** बांग्लादेशात हिंदूंवरील हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहेत. दीपू चंद्र दास आणि अमृत मंडल यांच्या निर्घृण हत्येनंतर आता पिरोजपूर जिल्ह्यातील पलाश कांती साहा यांची निर्घृण हत्या झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. भाजप नेते अमित मालवीय यांनी ही माहिती सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर शेअर केली आहे.

घरात कोंडून आग लावल्याचा आरोप

अमित मालवीय यांच्या म्हणण्यानुसार, २७ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ६ वाजता पिरोजपूर जिल्ह्यातील दुमुरिया गावात इस्लामी कट्टरपंथीयांनी हिंदूंच्या घरांवर हल्ले केले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी पलाश कांती साहा यांना त्यांच्या घरात कोंडून घराला आग लावली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यात घर जळताना आणि बाहेर उभे असलेले लोक रडताना दिसत आहेत.



एक दिवस आधीही घरे जाळल्याचा दावा

मालवीय यांनी पुढे सांगितले की, याच जिल्ह्यातील पिरोजपूर सदर भागातील पश्चिम दुमुरीतला गावात या घटनेच्या अवघ्या एक दिवस आधी दोन हिंदू कुटुंबांची पाच घरे जाळण्यात आली होती. या घटना बांग्लादेशात अल्पसंख्याकांवरील☞(पान २ वर)



# आंतरराज्यीय सायबर टोळीचा एक सदस्य मध्यप्रदेशातून जेरबंद

## - व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमधून सुरू झालेला ५२ लाखांचा फसवणूक प्रवास

### -बनावट शेअर अ‍ॅप, आभासी नफा आणि करांच्या नावाखाली लुट

**अमरावती :** शेअर मार्केटमध्ये झटपट नफा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांना बनावट मोबाईल अ?पच्या जाळ्यात ओढणाऱ्या आंतरराज्यीय सायबर टोळीचा पर्दाफाश अमरावती शहर सायबर पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात ५२ लाख रुपयांहून अधिक रकमेची ऑनलाईन फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले असून, मध्यप्रदेशातून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

फिर्यादी हे नियमितपणे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणारे असल्याने सायबर गुन्हेगारांनी त्यांना लक्ष्य केले. व्हॉट्स?पवर पाठविण्यात आलेल्या 'मोनार्च वेल्थ सर्कल' या ग्रुपच्या लिंकवरून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. पुढे 'मोनार्च डायरेक्ट डिलिंग' नावाचे खाते उघडण्याच्या नावाखाली वैयक्तिक माहिती घेतली गेली आणि 'व्हीआयपी ७११' या खास ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. यानंतर 'मोनार्च फिन' नावाचे मोबाईल अ?प डाऊनलोड करून त्यात शेअर्स खरेदी करण्यास प्रवृत्त करण्यात आले. सुरुवातीला अल्प गुंतवणुकीवर अ?पमध्ये नफा दिसू लागल्याने फिर्यादींचा विश्वास अधिक दृढ झाला. हाच विश्वास वापरून आरोपींनी विविध बँक खात्यांद्वारे टप्प्याटप्प्याने तब्बल ५२ लाख ५ हजार रुपये उकळले. मात्र, अ?पमध्ये दिसणारा नफा प्रत्यक्षात केवळ आभासी असल्याचे समोर आले. पैसे काढण्याचा प्रयत्न केल्यावर कमिशन, टॅक्स आणि प्रोसेसिंग चार्जेसच्या नावाखाली पुन्हा रक्कम भरण्याचा दबाव टाकण्यात आला. फसवणूक लक्षात येताच फिर्यादीने सायबर पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. एनसीसीआर पोर्टलवर तक्रार नोंदवून सखोल तांत्रिक तपास सुरू करण्यात आला. तपासात नागपूर येथील एका बँक खात्याचा वापर झाल्याचे उघड झाले. संबंधित मोबाईल क्रमांक बंद असल्याने संशय अधिक बळावला. तांत्रिक विश्लेषणातून आरोपीने बनावट पत्त्यावर आधारकार्ड काढून सिमकार्ड व बँक खाती उघडल्याचे निष्पन्न झाले.

#### अनेक राज्यांतील गुन्ह्यांचा धागा

अटक आरोपी राजकुमार मुल्लू केबट (वय २४, रा. पिपरिया, जि. नर्मदापुरम) याच्या घरातून अनेक बँक पासबुक, क्रेडिट-डेबिट कार्ड, चेकबुक, मोबाईल फोन व रबरी स्टॅम्प जप्त करण्यात आले. तपासात त्याच्या बँक खात्यांविरोधात देशभरातील तब्बल २० पोलीस ठाण्यांत तक्रारी दाखल असल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपी आंतरराज्यीय सायबर टोळीतील सक्रिय सदस्य असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

#### सायबर पोलिसांची अचूक रणनीती

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे आणि सायबरचे पोलिस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांच्या नेतृत्वात पोलिस हवालदार निखील माहुरे, विशाल यादव, उल्हास टवलारे, महेश वाघमारे, नरेंद्र उघडे, अश्विन यादव, रोशन लकडे, निलेश वानखडे, अनिकेत वानखडे, करण बोरकुटे, सुषमा आठवले तसेच चालक वसीम खान यांनी यशस्वीपणे केली. आरोपीचा पोलिस कोठडी रिमांड घेऊन त्याच्या संपर्कातील इतर सायबर गुन्हेगारांचा शोध सुरू असून, या टोळीचे देशव्यापी नेटवर्क उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पुढील तपासात आरोपी मध्यप्रदेशातील नर्मदापुरम जिल्ह्यात असल्याची माहिती मिळताच विशेष पथक रवाना करण्यात आले. सलग दोन दिवसांच्या शोधानंतर पिपरिया येथून आरोपीला अटक करण्यात आली.

# भरधाव कारची दुचाकीला धडक; दोघांचा दुर्दैवी मृत्यू, भुगाव टी-पॉईंटवर भीषण अपघात

**वर्धा जनमाध्यम :** भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना भुगाव परिसरातील टी-पॉईंटजवळ घडली. या अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला असून रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवी घनश्याम जयराजे (वय ४८, रा. आनंदनगर, वर्धा) आणि पिंकी जयसिंग तोमर (रा. इतवारा बाजार, वर्धा) अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रवी जयराजे हे पिंकी तोमर यांना दुचाकीवरून घेऊन एम.एच. ३२ एस. १९२६ क्रमांकाच्या वाहनाने वर्धेकडे जात होते. दुचाकी भुगाव येथील टी-पॉईंट परिसरात येताच समोरून भरधाव वेगात येणाऱ्या के.ए. ३५ पी. ६७११ क्रमांकाच्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की रवी जयराजे यांचा जागीच मृत्यू झाला, तर पिंकी तोमर या गंभीर जखमी झाल्या. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी पिंकी यांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले तसेच सावंगी पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. मात्र उपचार सुरू असतानाच पिंकी तोमर यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. अपघातास कारणीभूत ठरलेल्या कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून टी-पॉईंटसारख्या धोकादायक ठिकाणी वेगावर नियंत्रण आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### 'राहुल बाबा, इतक्यात

वेळी विरोधच केला. काश्मीरमधील कलम ३७० हटवणे आणि मुस्लिम भगिनींसाठी तिहेरी तलाक रद्द करण्याच्या निर्णयालाही काँग्रेसने कडाडून विरोध केला. समान नागरी कायदा आणि बांगलादेशी घुसखोरांना हटवण्याच्या मोहिमेतही काँग्रेसने आडकाठी आणली, असेही अमित शहा म्हणाले.

राहुल गांधींना समजवणे माझ्या क्षमतेबाहेर'

अमित शहा म्हणाले की, 'जनता ज्या गोष्टींचे समर्थन करते, नेमका त्यालाच राहुल गांधी आणि काँग्रेस विरोध करतात. ज्या नेत्याला त्यांचा स्वतःचा पक्ष नीट समजू शकला नाही, त्यांना समजवण्याची क्षमता माझ्यात नाही. अशा नकारात्मक भूमिकेमुळे त्यांना जनतेची मते कशी मिळतील?' असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### मुंबईसाठी अजित पवारांच्या

आली आहे. त्यामुळे, महायुतीपासून फारकत घेत राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे उमेदवार देण्यास सुरुवात केली आहे.

नवाब मलिक कुटुंबातील तिघांना उमेदवारी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मलिक कुटुंबातून यंदा ३ जण निवडणुकीच्या रणांगणात उतरवण्यात आले आहेत. नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक प्रभाग क्रमांक १६५, नवाब मलिक यांची बहीण डॉ सईदा खान प्रभाग क्रमांक १६८ तर कप्तान मलिक यांची सून बुशरा नदीम मलिक प्रभाग क्रमांक १७० मधून निवडणुक लढणार आहेत. कप्तान मलिक यांचा प्रभाग १६८ सध्या महिला राखीव झाल्याने कप्तान मलिक यांच्याकडून सुनेला स्वतः प्रभागात उतरवण्याचा निणऱ्य तर स्वतः साठी नवीन प्रभाग १६५ मधून लढण्याचा निणऱ्य घेतला आहे.

### अदानी बारामतीत, मंचावर

अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, कृषी विकास प्रतिष्ठानचे चेअरमन राजेंद्र पवार, आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार हे सर्व उपस्थित होते. पवार कुटुंबातील सर्व प्रमुख नेत्यांची एकत्र उपस्थिती लक्षवेधी ठरली.

दरम्यान, कार्यक्रमादरम्यान व्यासपीठावर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात झालेल्या चर्चेचा एक फोटो सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. दोघांमध्ये नेमक्या कोणत्या विषयावर चर्चा झाली, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. या फोटोमुळे पुन्हा एकदा पवार कुटुंबीय आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट भविष्यात एकत्र येतील का ? याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

पवार कुटुंबातील मनमोकळ्या संवादाचे दर्शन -

बारामती येथील एआय सेंटरच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खास शैलीत भाषणाची सुरुवात केली, ज्याने बारामतीकरांना हसवून टाकले. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामतीच्या दोन्ही खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, आमदार रोहित पवार यांचा उल्लेख खास शैलीत केला. पवार यांच्या या खास शैलीतील भाषणामुळे बारामतीकरांमध्ये हास्याचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्ताने पवार कुटुंबातील मनमोकळ्या संवादाचे दर्शन घडले.

### शरद पवार माझे

असे अदानी यांनी सांगितले.

पवार कुटुंबातील मनमोकळ्या संवादाचे दर्शन -

बारामती येथील एआय सेंटरच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खास शैलीत भाषणाची सुरुवात केली, ज्याने बारामतीकरांना हसवून टाकले. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामतीच्या दोन्ही खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, आमदार रोहित पवार यांचा उल्लेख खास शैलीत केला. पवार यांच्या या खास शैलीतील भाषणामुळे बारामतीकरांमध्ये हास्याचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्ताने पवार कुटुंबातील मनमोकळ्या संवादाचे दर्शन घडले.

### अंगावरील सोनं पाहून

नाहीत. दुपारीही खाली आलेले नाहीत. त्यानंतर त्यांची काळजी घेणा?्या महिलेच्या लक्षात ही बाब आली. त्यांनी वरच्या मजल्यावर जाऊन पाहिले असता, बेडवर बेशुद्धावस्थेत पडलेले होते. तोंडावर उशी होती. त्या महिलेने पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला, आणि घटनेचा तपासही पोलिसांनी सुरू केला आहे.

एर्दर्ल्ज्ले ग्ग्स नै : दारू पार्टी झाल्यानंतर मित्र गाडी घेऊन पसार

अय्युब सय्यद हे मित्रांसमवेत शुक्रवारी रात्री घराच्या वरच्या मजल्यावर गेले होते. त्यांनी दारू पार्टी केली, अशी माहिती तेथील नागरिकांनी दिली. त्यांच्या घरासमोर दोन सीसीटीव्ही कॅमेरे दिसले. घरात डीव्हीआर नाही. मध्यरात्रीनंतर तिघेजण अय्युब यांच्याच दुचाकीवरून पसार झाल्याचे इतर सीसीटीव्हीमध्ये पोलिसांना दिसून आले आहे. सीसीटीव्ही तपासून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सय्यद यांचे समाजामध्ये चांगले नाव होते. ते सोशल मिडीयावरतीही चांगलेच अँक्टीव्ह होते, ते भिशी चालवत होते. त्यांच्या राहत्या घरातील एका प्लास्टिकच्या डब्यात काही चिठ्ठया मिळाल्या. घरात इतर कोणी राहत नाही. नातेवाईक नई जिंदगी परिसरात राहतात. त्यांच्याकडे किमान ४० ते ५० तोळे सोने आहे. महापालिका निवडणुकीत प्रभाग १६ मधून ते इच्छुक असल्याची चर्चाही होती. तर या घटनेनंतर आजूबाजूच्या नागरिकांनी माहिती देताना सांगितलं की, अयुब सय्यद यांच्याकडे लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने होते. हत्या करणा?्यांनी सर्व सोने लंपास केले आहेत. हत्या करणा?्यांनी कानातील सोने ओरबाडून कान फाडून घेऊन गेले आहेत.

### बांगलादेशात आणखी

हिंसाचार चिंताजनक पातळीवर पोहोचल्याचे दर्शवतात, असा आरोप त्यांनी केला.

मालदा-मुर्शिदाबाद हिंसाचाराची आठवण

आपल्या पोस्टमध्ये अमित मालवीय यांनी पश्चिम बंगालमधील मालदा आणि मुर्शिदाबाद येथील सांप्रदायिक दंग्यांचा उल्लेख करत तुलना केली. ते म्हणाले की, त्या काळात हिंदूंची घरे निवडकपणे लक्ष्य करण्यात आली होती आणि हरगोबिंद दास व चंदन दास या पिता-पुत्राला मारहाण करून ठार मारण्यात आले होते.

ममता बनर्जींच्या भूमिकेवर टीका

मालवीय यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व गृहमंत्री ममता बनर्जी यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले. हिंदूंच्या संरक्षणासाठी काहीच करण्यात आले नाही. आजही त्यांची चुप्पी आणि निष्क्रियता सीमेपलीकडील कट्टरपंथीयांना अधिक धाडसी बनवत आहे, असा आरोप त्यांनी केला. फक्त धर्माच्या आधारे हिंदूंना लक्ष्य केले जात असताना जग डोळेझाक करू शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

### अल्पवयीन मुलाची दगडाने

रेकॉर्ड केला होता. हा व्हिडीओ सोशल मीडियावर टाकण्याची धमकी दिल्याने आरोपी दिपेशमध्ये तीव्र राग आणि भीती निर्माण झाली होती. या वैमनस्यातूनच काही दिवसांपूर्वी राय टाउनशिप परिसरात मृतकाने आरोपीला बोलावून मारहाण केल्याचा प्रकार घडला. या घटनेनंतर दिपेश, त्याचा मित्र पियुष किशोर भोयर (वय १९) आणि दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी कुणालचा काटा काढण्याचा निर्णय घेतला.

**फोन करून बोलावले, दगडाने ठेचले -** आरोपींनी मृतकाला फोन करून रेल्वे स्टेशन परिसरात बोलावले. एकांत साधत चौघांनी मिळून दगडाने ठेचून कुणालची हत्या केली व मृतदेह झुडपांमध्ये फेकून दिला. गुप्त माहिती, कॉल डिटेल्स आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्हे शाखेने ग्राम वडुरा परिसरातून आरोपींना ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास बडनेरा पोलीस करत आहेत.

### भाजपा शहराध्यक्षाच्या गाडीचा

पॅन्ट चोरुन पळ काढला.सकाळी ही घटना उघडकीस येताच त्यांनी याबाबत तिवसा पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी पुढील तपास तिवसा पोलिसांत करीत आहे.

### तिवसा शहरात अज्ञात

फायदा घेत एकाच रात्री ४ घरे फोडून दुचाकी चोरून नेण्याचा प्रयत्न केला.चोरट्यांनी घातलेला हा धुडगूस नागरिकांमध्ये खळबळ उडविणारा ठरला असून चोरीच्या या घटनेमुळे तिवसा पोलिसांसमोर एक आव्हान उभे ठाकले आहे.चोरट्यांचा तातडीने तपास करून रात्र गस्त नियमित व्हावी,अशी मागणी नागरिकांकडून होऊ घातली आहे.चारही घरफोडीच्या ठिकाणी तिवसा पोलिसांनी पाचारण करून पंचनामा केला असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### शोरूमसमोरून सीडी डिलक्स

गेले होते. त्यांनी आपली काळ्या रंगाची सीडी डिलक्स दुचाकी (क्र. एमएच २७ एएक्स ३६८४) शोरूमजवळील सार्वजनिक रस्त्याच्या कडेला उभी केली होती. दिवसभर लोन संबंधित काम आटोपून सायंकाळी ते दुचाकी लावलेल्या ठिकाणी परत गेले असता त्यांची गाडी तेथे दिसून आली नाही. त्यांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच रहदारीच्या रस्त्यांवर शोध घेतला; मात्र दुचाकी मिळून आली नाही. त्यानंतर आरटीओ कार्यालय व इतर पोलिस ठाण्यांत चौकशी करूनही गाडीचा काहीही मागमूस लागला नाही. अखेर कोणीतरी अज्ञात चोरट्याने सुमारे १० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याचा निष्कर्ष निघाल्यानंतर फिर्यादीने राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या जबानी रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

### अंबापेठ - गौरक्षण प्रभागाच्या रश्मी

माजी नगरसेवक - रश्मी घनश्याम नावंदर यांनी आमदार - संजय खोडके, आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश घेतला.सूक्ष्म नियोजन - कार्यकर्त्यांना वेळोवेळी सातत्यपूर्ण पाठबळ -अमरावती शहराचा होत असलेला चौफेर विकास - सर्वसामान्य माणसांसोबत जुळलेली नाळ -सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सोशल इंजिनिअरिंगची ट ऋणानुबंधाची वीण घट्ट करीत आमदार - संजय खोडके व आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांची केलेला पंचसूत्रीचा अवलंब लक्षात घेता त्यांची ही भूमिका कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह व आत्मविश्वास निर्माण करणारा आहे. त्यांच्या या विचारसरणीने प्रभावित होऊन आपण आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे. यावेळी आमदार - संजय खोडके, आमदार - सौ. सुलभाताई खोडके, यश खोडके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन माजी नगरसेवक -सौ. रश्मी घनश्याम नावंदर यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले. यात्रसंगी यश खोडके यांच्यासमवेत घनश्याम नावंदर, माजी नगरसेवक - जवाहरभाई व्यास, अमरावती जिल्हा रक्तदान समितीचे अध्यक्ष - महेंद्र भूतडा, जितेंद्रसिंह ठाकूर, शक्ती तिडके, आशिष व्यास, मनीष देशमुख आदिसह अन्य उपस्थित होते.

### शेतीच्या वादाने घेतला जीव;

मात्र, उपचारासाठी नेत असतानाच वाटेत उमेश सोळंके यांची प्राणज्योत मालवली. शुक्रवारी अमरावती येथे शवविच्छेदन केल्यानंतर उमेशवर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतकाच्या पश्चात पत्नी, लहान मुलगी, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. कष्टकरी कुटुंबावर कोसळलेल्या या दुर्दैवी घटनेने माहुली गावासह परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### सततच्या छळाला कंटाळून

मुलीला आरोपींकडून सातत्याने मानसिक छळ सहन करावा लागत होता. तिच्या चारित्र्यावर संशय घेत बदनामी केली जात होती. या त्रासामुळे तिच्या मनावर खोल आघात होत होते. भविष्यातील आयुष्य उद्ध्वस्त होईल, याची पूर्ण जाणीव असूनही आरोपींनी आपले कृत्य थांबवले नाही, अशी माहिती पुढे आली आहे. अखेर या सततच्या त्रासाला कंटाळून मुलीने टोकाचे पाऊल उचलत गळफास घेऊन आत्महत्या केली. तिने आत्महत्येपूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली असून, त्यामध्ये आरोपींच्या वर्तनामुळे आपण हे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणात ४५ वर्षीय नातेवाईकाच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. एका अल्पवयीन जीवाला संपवणाऱ्या या घटनेने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### धामणगावात काँग्रेसला खिंडार

रवी भुतडा, प्रगती भुतडा (काळमेघ),,काँग्रेस च्या प स माजी सभापती शारदा पाटील, धामणगावच्या नगराध्यक्ष डॉ अर्चना रोठे अडसड, कृष्णा मारोडकर, भाजपा तालुकाध्यक्ष प्रवीण खैरकार, प्रणय राजनकर सुनील साकोरे विठ्ठलराव राळेकर, मोहन इंगळे ,राजू केला, मनोज डहाके, मंगेश मारोडकर,विजय कांडलकर, मनोज धांदे, प्रमोद ढाले, पवन पडोळे यांच्यासह तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### दारूच्या नशेत पत्नीवर पतीचा

आला. कोणतेही कारण नसताना त्याने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत शिवीगाळ सुरू केली. सुरुवातीला शब्दांच्या वादातून सुरू झालेला प्रकार काही वेळातच हिंसक वळणावर पोहोचला. आरोपीने पत्नीला थपडा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करत केस ओढून खाली फेकले. या झटापटीदरम्यान महिला घरात ठेवलेल्या ट्रॅक्टरच्या लोखंडी भागावर जोरात आपटली. त्यामुळे तिच्या कानाच्या कातडीला गंभीर जखम झाली असून, कानशिलाचा तुकडा तुटून पडल्याची माहिती पुढे आली आहे. रक्तबंबाळ अवस्थेत महिलेला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर मिळालेली वैद्यकीय कागदपत्रे, डिस्चार्ज रिपोर्ट व फिर्यादी महिलेच्या जबानी तक्रारीच्या आधारे दत्तापूर पोलिसांनी आरोपी बंडू वासेकर याच्याविरोधात संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत असून, दारू व संशयातून होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

### शहरात अवैध दारूविक्रीला लगाम;

ठाण्याच्या हद्दीत माया नगर परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत धनराज नारायण बहुराशी (रा. माया नगर, अमरावती) याच्याकडून देशी दारूच्या १५ बॉटल जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत अंदाजे ६०० रुपये आहे. ही कारवाई २७ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. खोलीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत महाजनपुरा परिसरात प्रणय हरीदास पवार (रा. महाजनपुरा, अमरावती) याच्याकडून देशी दारूच्या ५ सिलबंद बॉटल जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत ४०० रुपये आहे. सर्व प्रकरणांत आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांमार्फत सुरू आहे.

# कालीमाता मंदिरातील दानपेटी फोडली

## - चोरट्यांकडून २५ हजारांची रोकड लंपास

**अमरावती :** शहरातील खोलापुरी परिसरातील कालीमाता मंदिरात अज्ञात चोरट्यांनी घुसखोरी करून दानपेटी फोडत त्यातील सुमारे २५ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.२८) उघडकीस आली. या प्रकरणी खोलापुरी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मंदिराचे पुजारी विजय प्रभाकरराव चिखलकर (रा. कालीमाता मंदिर परिसर, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २८ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे मंदिर उघडण्यासाठी आले असता मंदिरातील गौशाळेजवळ ठेवलेल्या लोखंडी दानपेटीचे कुलूप तुटलेले दिसून आले. दानपेटीची पाहणी केली असता त्यातील सुमारे २५ हजार रुपयांची रोकड चोरीस गेल्याचे लक्षात आले. अज्ञात आरोपीने रात्रीच्या सुमारास मंदिराच्या परिसरात प्रवेश करून दानपेटीचे कुलूप तोडून ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त होत असून मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणी खोलापुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### संत श्री गजानन महाराजांच्या चमत्कारांनी

संबोधून केले. रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी शेगांव - रहाटगाव - कठोरा मार्ग परिसर समीपस्थ मनीषा कॉलनी स्थित श्री हनुमान मंदिर परिसरात आयोजित श्री संत गजानन महाराज यांचे श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण सोहोळ्यात त्या बोलत होत्या.सर्वप्रथम आमदार -सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी ब्रह्मांडनायक संत श्री गजानन महाराजांच्या प्रतिमेस पूजन - वंदन - माल्यार्पण करीत ' श्रींचे ' कृपाशीर्वाद घेतले. तसेच यावेळी सर्व भावीकभक्तांच्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी त्यांनी ' श्रींचे ' चरणी प्रार्थना केली.व्यासपीठ ग्रंथ वाचक - हरिभक्तपरायण सौ. हेमाताई कराळे यांच्या सुमधुर वाणीतून आपले विचार आणि कृती यांच्यातील संगती हेच खरे संतुलन आहे.

या शब्दांत उपस्थित भावीकभक्तांनी श्री. गजानन विजय ग्रंथ सामूहिक पारायण श्रवणाचा लाभ घेतला. याप्रसंगी आयोजकांच्या वतीने उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात जवळपास ४०० महिला भगिनींनी पारंपरिक वेशभूषा धारण करीत श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण सोहोळ्यात सहभाग नोंदवला होता. सामूहिक पारायण सोहोळ्यात सहभागी भाविक भक्तांसाठी आयोजकांच्या वतीने आसन व्यवस्था, पेयजल सेवा उपलब्धता करण्यात आली होती.यावेळी भाविकभक्तांनी ' श्री अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सचिदानंद भक्तप्रतिपालक शेगांव निवासी श्री समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय ' चा एकसुरात भव्य जयघोष करण्यात आला होता. याप्रसंगी मनीषा कॉलनी येथील व आजूबाजूच्या परिसरातील महिला भगिनींच्या वतीने शाल - श्रीफळ - पुष्पगुच्छ देऊन आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांचा स्नेहपूर्ण सत्कार करण्यात आला. भक्ती, ज्ञान आणि आनंदाचा अनमोल खजिना..... संबोधल्या जाणाऱ्या ' श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण ' अध्यात्मिक सोहोळ्याच्या समारोपीय क्षणानंतर उपस्थित सर्व भावीकभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. विद्या बद्रे, पुष्पा खडके, माया पवार, रजनी शहापुरे, उज्वला घोंगडे,संपदा पासेबंद यांच्यासह स्थानिक महिला भगिनींनी अथक परिश्रम घेतलेत. याप्रसंगी गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण सोहोळ्याचे दरम्यान प्रास्ताविक - सौ. संपदा सागर पासेबंद यांनी तर आभार प्रदर्शन - सौ. विद्या बद्रे यांनी केले


## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०



## जाहीर सुचना

ज्याअर्थी, निबंधक तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (रुई) यांनी मौजा वाई (रुई) ता. यवतमाळ येथील **सैय्यद यूसुफ सैय्यद अजीज** यांची दिनांक ०९.०७.१९७० रोजीची मौजा वाई (रुई) ता.यवतमाळ येथे झालेली जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वाई (रुई) नोंदवहीमध्ये केलेली / झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३ (३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्वत्र नागरीकांना याव्दारे कळविण्यात येते की, **सैय्यद युसुफ सैय्यद अजीज, रा.मु.पो.माऊली ता.दारव्हा जि. यवतमाळ** यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेण्याबाबत कोणासही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायायलयास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, कोणासही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही, असे गृहीत घरुन अर्जदार यांचा जन्म नोंदीचा आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीचा ग्राहय धरण्यात येणार नाही.

आज दिनांक ०८.१२.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(डॉ. योगेश देशमुख)**
**तालुका दंडाधिकारी, यवतमाळ**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २९ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जलसंधारण अभियानाला वेग देवून ३१ जानेवारीपर्यंत कामे पूर्ण करा -जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, जलयुक्त शिवार २.० तसेच गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार ही शासनाची महत्त्वाकांक्षी व लोकाभिमुख अभियाने आहेत. या अभियानांमुळे पाण्याची उपलब्धता वाढून शेतीला शाश्वत आधार मिळणार आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने, जबाबदारीने व गुणवत्तापूर्ण कामकाज करणे आवश्यक आहे. सुरू असलेली व प्रस्तावित सर्व कामे ठरवून दिलेल्या वेळेत पूर्ण करावीत. कोणत्याही परिस्थितीत कामांमध्ये दिरंगाई होता कामा नये.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

पाणलोट विकास घटक २.०, जलयुक्त शिवार २.० तसेच गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय आढावा



बैठक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी शाम फेरवानी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, आत्मा प्रकल्पाच्या संचालक अनिसा महाबळे, लघु पाटबंधारे विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी बिजवे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील जलसंधारण, कृषी उत्पादनवाढ व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात शाश्वत वाढ साध्य करण्याच्या दृष्टीने या योजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. बैठकीत कामांची प्रगती, आगामी नियोजन, विभागांतील समन्वय तसेच लोकसहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. अभियानांतर्गत सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांची सविस्तर माहिती व प्रगती अहवालाचे सादरीकरण श्याम फेरवानी यांनी केले. जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी गुणवत्तापूर्ण कामे, वेळेत पूर्तता आणि प्रभावी देखरेख याबाबत स्पष्ट सूचना देत जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याची उपलब्धता वाढवून शेती व ग्रामीण विकासाला चालना देण्याचे आवाहन केले.शासन महामंडळ निधी अंतर्गत साठवण बंधारे कोल्हापुरी बंधारे पाझर तलाव साठवंताला गाव तलाव तसेच जिल्हा नियोजन समिती अंतर्गत एकात्मिक विकास कार्यक्रम लघुपाटबंधारे योजना कोल्हापुरी बंधारा योजना पूर संरक्षक भिंतीचे काम, तसेच कृषी विभागाअंतर्गत ढाळीचे बांध आदी कामकाज व अभियानांतर्गत सुरू असलेली सर्व कामे ३१ जानेवारीपर्यंत

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पाणलोट विकास घटक २.०, जलयुक्त शिवार २.०, गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार अभियानाचा जिल्हास्तरीय आढावा**

कोणताही विलंब न करता तात्काळ पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कामांची गती वाढवावी, गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये तसेच ठरवून दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण झाल्याची खात्री करावी, असे त्यांनी सांगितले. यंत्रणांकडून नियमित प्रगती अहवाल सादर करण्यात यावा आणि अडचणी असल्यास त्या तात्काळ प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात, जेणेकरून अभियानाची उद्दिष्टे वेळेत व प्रभावीपणे साध्य होतील, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले. मागील काही दिवसात शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

# नव्या सत्ताधाऱ्यांसमोर मतदाराच्या अपेक्षांचे ओझे

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील नगर पंचायत च्या निवडणुकीत विधानपरिषद आ भावना ताई गवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शहरातील मतदारांनी शिवसेनेकडे सत्तेच्या चाव्या सोपवल्या. १७ पैकी ८ जागा जिंकत आणि नगराध्यक्षपदावर ओमप्रकाश खुरसडे यांना संधी देत शिवसेनेने मालेगाव च्या राजकारणात पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध केले. या निकालातून शहराच्या विकासाबाबत जनतेच्या अपेक्षा नव्या नगराध्यक्ष तसेच नगरसेवकाकडून असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मालेगावची ढासळलेली अवस्था, रखडलेली विकासकामे, पायाभूत सुविधांचा अभाव आणि पर्यावरणीय प्रश्न पाहता सक्षम व निर्णयक्षम नेतृत्वाची गरज आहे. प्रसंगी कठोर निर्णय घ्यावे लागतील. मात्र, शहराची गरज ओळखून दीर्घकालीन विकासाला प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा मतदारांनी या निकालातून व्यक्त केली आहे.


या निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्याने ही निवडणूक अनेक अर्थांनी राजकीय वळण सूचित करणारी ठरली. या निवडणुकीत आमदार अमित झनक यानी पूर्ण ताकद लावत अनेक प्रभागांत उमेदवार उभे केले. शिवसेनेने यावेळी नव्या चेहऱ्यांना संधी देत



विकासाचे स्पष्ट व्हिजन मतदारांसमोर मांडले. सर्वच प्रभागांत इंछूकाचीची मोठी गर्दी हे पक्षासमोर आव्हान होते.

**ही आहेत आव्हाने... :** या निकालाने सेनेला सत्ता दिली असली, तरी त्याबरोबर मोठी जबाबदारीही मतदारांनी त्यांच्या खांद्यावर टाकली आहे. शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बाजारातील तसेच शहरातील स्वच्छतेचा प्रश्न रस्ते वीजपुरवठा. कार्यालयातील रेंगाळलेली कामे पार्किंगचा प्रश्न अतिक्रमण चा प्रश्न मोकाट जनावरांचा प्रश्न यासह अनेक प्रश्न रेंगाळलेली आहेत. मोठ्या तिजोरीच्या चाव्या घेऊन शहराच्या विकासाचा वेग वाढवणे, वेळप्रसंगी कठोर पण आवश्यक निर्णय घेऊन गावच्या विकासासाठी प्रयत्न करणे, हे नव्या सत्ताधाऱ्यांपुढे आव्हान असणार आहे.

# चिमुकल्या युवानची गगनभरारी!



■ प्रतिनिधी | कारंजा ■

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला आणि महाराष्ट्रातील सर्वात उंच (सुमारे ५,१७५ फूट) मानला जाणारा नाशिक जिल्ह्यातील 'साल्हेर' किल्ला सर करण्याची किमया अवघ्या ८ वर्षांच्या युवान सचिन ताथोड या चिमुकल्याने केली आहे. हिंदवी परिवारातर्फे आयोजित या मोहिमेत सहभागी होऊन युवानने ही दैदिप्यमान कामगिरी नोंदवली आहे. युवान ताथोड हा कारंजा येथील उच्चशिक्षित प्रतिष्ठित प्रतिष्ठित व्यावसायिक सचिन

**८ वर्षांच्या युवान ताथोडने सर केला महाराष्ट्रातील सर्वात उंच 'साल्हेर' किल्ला; मान्यवरांकडून विशेष कौतुक**

ताथोड यांचे सुपुत्र आहे.

गडकिल्ले सर करणे हे मोठ्यांसाठीही अनेकदा आव्हानात्मक असते, मात्र युवानने आपल्या जिद्दीच्या आणि चिकाटीच्या जोरावर हा गड सर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव युवानच्या या उत्तुंग यशाबद्दल त्याचा विशेष सन्मान करण्यात आला. हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवरत्न शेटे सर यांच्या हस्ते आणि खासदार ओमराजे निंबाळकर व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत युवानला प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी युवानच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.युवान हा आर. जे.चवरे प्रायमरी शाळा कारंजाचा इयत्ता तिसरी चा विद्यार्थी आहे. इतक्या लहान वयात गडकिल्ल्यांची आवड आणि इतिहास जपण्याची धडपड पाहून युवान नक्कीच इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# अभिषेक मुंदडा : विश्वास, नेतृत्व आणि मालेगावच्या विकासाची नवी दिशा

■ अमोल कल्याणकर ■

**मालेगाव : शहराचा चेहरा मोहरा बदलन्यासाठी स्वच्छ चेहरा सगळे मालेगावकर शोधत होते त्याना अभिषेक भाऊ मुंदडा याच्या रूपाने भेटला असून या निवडणुकीत ते एक नगराध्यक्ष आणि ८ नगरसेवक निवडून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अभिषेक भाऊ यांच्यामुळे नव्या अभिषेक पर्वाला मालेगावात सुरुवात झाली असून ही मालेगावच्या विकासाची नांदी असल्याचे बोलले जात आहे.**

शहराचा विकास अनेक वर्षांपासून अपेक्षित पातळीवर पोहोचलेला नव्हता. रखडलेली विकासकामे, वाढत्या नागरी समस्या आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा या पार्श्वभूमीवर बदलाची गरज तीव्रपणे जाणवत होती. हीच गरज अचूकपणे ओळखून, विकास हाच एकमेव अजेंडा समोर ठेवत अभिषेक मुंदडा यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. समाजसेवेचा वारसा लाभलेले अभिषेक भाऊ मुंदडा हे केवळ राजकीय व्यक्तिमत्त्व नसून, जनतेशी थेट नाते जपणारे नेतृत्व आहे. त्यांनी शिंदे गटाच्या शिवसेना पक्षात प्रवेश करताच मालेगावच्या राजकारणात नवचैतन्य



निर्माण झाले. खा भावना ताई गवळी यांची त्याना मोलाची साथ मिळाली. पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेच्या मोहापेक्षा शहराचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे मुख्य ध्येय राहिले. यावेळी नगरपंचायत निवडणुकीच्या काळात अभिषेक भाऊ मुंदडा यांनी जनतेशी थेट संवाद साधत विश्वासाचे नाते अधिक दृढ केले. आश्वासनांपेक्षा वास्तववादी भूमिका, शब्दांपेक्षा कृती आणि राजकारणापेक्षा विकास या स्पष्ट भूमिकेमुळे जनतेचा विश्वास अधिक बळकट झाला. याच विश्वासाचे प्रतिबिंब निवडणूक निकालात ठळकपणे उमटले. या निवडणुकीत शिंदे गटाच्या शिवसेनेने नगराध्यक्ष पद जिंकण्यासोबतच इतर सर्व पक्षांच्या तुलनेत सर्वाधिक ८ नगरसेवक निवडून आणत घवघवीत यश संपादन केले. हा विजय केवळ आकड्यांचा खेळ नसून, अभिषेक मुंदडा यांच्या नेतृत्वावर जनतेने दिलेल्या विश्वासाची ठोस पावती आहे. प्रामाणिक हेतू, सातत्यपूर्ण मेहनत आणि जनतेच्या हितासाठीची तळमळ असेल, तर जनता त्या नेतृत्वाला नक्कीच स्वीकारते, हे मालेगावच्या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. मालेगावच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला असून, अभिषेक भाऊ मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली शहर प्रगतीच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करेल, अशी आशा आज प्रत्येक नागरिक व्यक्त करत आहे.मालेगाव शहरातील विविध समस्या त्यांच्या पुढाकाराने नक्कीच मार्गे लागतील अशी सर्वांना आशा आहे.

# सराफ यांनी साकारले नगराध्यक्षाचे हुबेहूब छायाचित्र



**वाशीम :** नगरीचे नवनिर्वाचीत नगराध्यक्ष हजारो लोकांचे मनातील ताईत अनील केंदळे यांचा वाशिम येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश सराफ यांचे पुतण्या चिरंजीव वेद महेशराव सराफ याने अनिल केंदळे यांची हुबेहूब छायाचित्र स्वहस्ते रेखाटली व केंदळे यांना सप्रेम भेट दिली. केंदळे व त्यांचे परीवाराने उपस्थित लोकांनी चिं वेद याचे मनापासून कौतुक केले. केंदळे यांनी कौतुकाची थाप वेद यांचे पाठिवर दिली वेद हा दहाव्या वर्गात शांती निकेतन चा विद्यार्थी असुन ज्या दिवशी केंदळे यांची भाजपची ऊमेदवारी जाहिर झाली त्याच दिवशी अवघे चार तासात हे छायाचित्र स्वहस्ते रेखाटले होते . आत्मविश्वासाने सांगत होता साहेबच विजयी होणार आणी हे छायाचित्र मी स्वतःचे हाताने केंदळे साहेबांना भेट देणार झालेही तसेच हा भेट देण्याचा योग रवीवार दि २८रोजी आला यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते माजी नप उपाध्यक्ष बापुभैया ठाकूर , माजी नगरसेवक संतोष वानखेडे बबनराव बारटक्के शशीकांत सावजी भुरे उपस्थित होते.

# वाशिम जिल्हास्तरीय विज्ञान उत्सवाचे थाटात उद्घाटन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ, नागपूर व झील इंटरनॅशनल स्कूल,कारंजा यांचे संयुक्त विद्यमाने झील इंटरनॅशनल स्कूल, भिलखेडा कारंजा येथे दि.२० डिसेंबर २०२५ रोजी वाशिम जिल्हास्तरीय विज्ञान उत्सवाचे उद्घाटन संपन्न झाले.

प्रदर्शनीच्या उद्घाटनीय कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून कारंजा तहसीलचे तहसीलदार कुणाल झाल्टे, अध्यक्ष म्हनून वाशिम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता सतीन मेश्राम तर प्रमुख अतिथी म्हणून कारंजातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अजय कांत,विज्ञान भारतीचे समन्वयक नरेंद्र सातफळे, सौ.मनिषा




घारे,सतीश घारे, मंजुषा थत्ते,झील इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष शार्दुल मेश्राम,सचिव चेतना मेश्राम, मुख्याध्यापक अभिलाषा बासुळे,वाशिम जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे विजय भड, मनिष गावंडे,प्रभारी विज्ञान पर्यवेक्षक ललित भूरे व विद्याभारती इंग्लिश स्कूलचे माजी प्राचार्य डॉ. रविंद्र मुकवाने, परीक्षक गण आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण गवई,तर स्वागतपर मनोगत काजल पवार यांनी व्यक्त केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता सतीन मेश्राम यांनी विज्ञान प्रतिकृती कक्षाची फित कापून विज्ञान प्रकल्प,रांगोळी व पोस्ट प्रदर्शनीचे उद्घाटन केले. तहसीलदार कुणाल झाल्टे उद्घाटनीय भाषणात म्हणाले की,संशोधक वृत्ती वृद्धींगत करण्यासाठी विज्ञान प्रदर्शन हा उपक्रम आवश्यक आहे व शालेय जीवनात विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. अजय कांत यांनी सहभागी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टर व विज्ञान प्रकल्प याचे भरभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात अधिष्ठाता सतीन मेश्राम यांनी आजच्या शिक्षण प्रणालीबाबत मार्गदर्शन करुन मानवी जीवनात विज्ञानाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाची सुरवात झील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनीनी समूह गिताने केली.सदर प्रदर्शनीमध्ये २१ प्रतिकृती, २३ रांगोळी,२५ पोस्टर, ०९ विज्ञान नाटिका चा समावेश या प्रदर्शनीत करण्यात आला होता.

# समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री उभारणीसाठी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद

**वाशिम :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री बसविण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे व चांदूर रेल्वे तालुक्यात कि.मी. १०४ +०८० ते कि.मी. १२०+३०० या दरम्यान हे काम दि. २७ डिसेंबर ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत पाच टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यातील कामाच्या वेळी संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णतः थांबविण्यात येणार असून, काम पूर्ण होताच वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल. २७ डिसेंबर रोजी नगरगावंडी परिसरात मुंबई वाहिनीवर दुपारी २ ते ४ या वेळेत, २८ डिसेंबर रोजी नागपूर वाहिनीवर दुपारी २ ते ४ या वेळेत तर २९ डिसेंबर रोजी टिटवा परिसरात नागपूर व मुंबई दोन्ही वाहिन्यांवर ठरावीक वेळेत वाहतूक थांबविण्यात येणार आहे. या कालावधीत वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा व वाहतूक व्यवस्थेस सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी केले आहे.

# कांदा पिकावर सडीचा प्रादुर्भाव; काळे ॲग्रो ट्रेडर्सकडून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर मार्गदर्शन



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

यावर्षी मालेगाव तालुक्यात कांदा या नगदी पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे. मात्र कांदा हे पीक अत्यंत नाजूक स्वरूपाचे असल्याने सध्याच्या बदलत्या हवामानामुळे अनेक भागांत कांदा पिकावर सडीचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. यासोबतच पात करपणे, मुळांजवळ कुज येणे अशा समस्या शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहेत.

या पार्श्वभूमीवर दुधाळा येथील युवा उद्योजक तथा काळे ॲग्रो ट्रेडर्सचे शिरपुर संचालक गोपाल विलास काळे यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष त्यांच्या शेतबांधावर भेट देत कांदा पिकाचे शास्त्रोक्त नियोजन कसे करावे, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. पिकातील रोगांची लक्षणे ओळखणे, सडीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कोणते उपाय योजावेत, तसेच खत व औषधांचा संतुलित वापर कसा करावा, याविषयी त्यांनी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली.कांदा पिकातील पाण्याचे नियोजन, जमिनीतील ओलावा राखणे, हवेशीर परिस्थिती निर्माण करणे व योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाय करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे गोपाल काळे यांनी यावेळी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी घाईगडबडीने उपाय न करता तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच पावले उचलावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

काळे ॲग्रो ट्रेडर्सच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक प्रतिसाद उमटला असून, अडचणीच्या काळात थेट शेतात येऊन मिळालेले मार्गदर्शन उपयोगी ठरत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कांदा पिकाचे नुकसान टाळण्यासाठी असे प्रत्यक्ष मार्गदर्शन उपयुक्त ठरत असून, यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे.

# सहकार क्षेत्रात कार्यकर्त्यांनी सजग व समर्पित राहावे -विनोद भीमनवार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे. कर्मचारी व संचालक मंडळाने प्रत्येक वेळी सजगता बाळगून समर्पण भावनेने काम केल्यास सहकारी संस्था निश्चितच प्रगतीपथावर मार्गक्रमण करतील, असे प्रतिपादन सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश सचिव विनोद भीमनवार (वर्धा) यांनी केले.

कारंजा येथील संत गाडगेबाबा पतसंस्थेत सहकार भारती वाशिम जिल्ह्याची कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रकाश बागडे होते. प्रमुख उपस्थितीत सुनील कुऱ्हेकर (अमरावती विभाग सहप्रमुख, अकोला), कांतीलाल बरडीया व विश्वनाथ राऊत उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

**सहकार भारतीची वाशिम जिल्हा नूतन कार्यकारिणी जाहीर**




आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या समापनानिमित्त विविध उपक्रम राबविणे, सहकार भारती सदस्यता अभियान, सहकार दिन साजरा करणे तसेच वाशिम जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्याच्या उद्देशाने ही बैठक घेण्यात आली. वाशिम जिल्हा कार्यकारिणी जाहीरयावेळी वाशिम जिल्हा अध्यक्षपदी प्रकाश बागडे, तर महामंत्रीपदी आशिष तांबोळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. उपाध्यक्षपदी कांतीलाल बरडीया, अरुण खंडागळे, सुनील गुल्हाने, धण्यकुमार बांडे (मालेगाव), तानाजी रंजवे (रिसोड) यांची निवड करण्यात आली. सचिवपदी गजानन जाधव (रिसोड), अतुल धाकतोड (कारंजा), कोषाध्यक्षपदी ब्रिजमोहन मालपाणी यांची नियुक्ती करण्यात आली.

संघटन प्रमुख तुळशीराम निकम, सहसंघटन प्रमुख हेमंत जोशी, अरविंद देसाई, बँक प्रकोष्ठ प्रमुख हरीश राघवानी, सहप्रमुख अनिल पाकधने, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख तुळशीदास हांडे, सहप्रमुख दीपक बसंतवाणी, मनीष थड्डाणी, महिला प्रमुख सौ. कांता अग्रवाल, सहप्रमुख सौ. रुपाली महेश राऊत, विधी प्रकोष्ठ प्रमुख ॲड. आशिष नेने, कर्मचारी संस्था प्रमुख किशोर राठोड, संपर्क प्रमुख संतोष धोंगडे, पगारदार संस्था प्रकोष्ठ प्रमुख कविष गहाणकरी, कार्यालय प्रमुख अनंतराव जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य म्हणून अविनाश नांदगावकर, सुनील देशमुख, अनिल दंडे, रामेश्वर ठाकरे (मंगरुळ), प्रा. नागनाथ मठपती, राजेश मिटकरी, तर प्रचार व प्रसिद्धी प्रमुखपदी रामदास मिसाळ यांची निवड झाली.

**तालुकास्तरीय जबाबदाऱ्या :** कारंजा तालुका अध्यक्ष – विश्वनाथ राऊत उपाध्यक्ष – किरीट रायचूरा, मदनलाल जोशी, विजय गाढवे वाशिम तालुका अध्यक्ष – गजानन भेंडेकर कार्यक्रमाच्या शेवटी प्रकाश बागडे व कांतीलाल बरडीया यांनी सहकार क्षेत्रात कार्यकर्त्यांनी कसे काम करावे याबाबत मार्गदर्शन केले. सहकार क्षेत्रातील विविध अडचणींवर सखोल चर्चा करण्यात आली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### नववर्षात कॅलेंडरसोबत नियमही बदलणार



**मुंबई-**नव्या वर्षात अनेक नियम बदलणार आहेत. कर्मचाऱ्यांच्या पगारापासून ते टॅक्स नियम, एलपीजी गॅस दरापासून पॅन-आधार लिंक यात बदल होईल. या बदलांचा तुमच्या दैनंदिन जीवन आणि तुमच्या खिशावर थेट परिणाम होऊ शकतो.नवीन वर्षाच्या सुरुवातीसह अनेक प्रमुख बँकांनी त्यांचे व्याजदर कमी केले आहेत. यामुळे गृहकर्ज आणि वैयक्तिक कर्जे स्वस्त होऊ शकतात. नवीन व्याजदर मुदत ठेवींवरदेखील लागू होतील, ज्यामुळे बँकेनुसार बचतकर्त्यांना थोडासा फायदा किंवा तोटा होऊ शकतो.१ जानेवारीपासून जवळजवळ सर्व बँकिंग आणि सरकारी सेवांसाठी पॅन-आधार लिंक करणे अनिवार्य असणार आहे. असे न केल्यास खात्याशी संबंधित अनेक सेवा बंद होऊ शकतात.नवे वर्ष सरकारी कर्मचा-यांसाठी ब-याच अर्थाने महत्त्वाचे असणार आहे. १ जानेवारी २०२६ पासून देशभरात आठवा वेतन आयोग लागू होण्याची अपेक्षा आहे, ज्याअंतर्गत पगार आणि पेन्शनमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले जाऊ शकतात.नवा आयकर कायदा १ जानेवारीपासून पूर्ण लागू केला जाणार नसला तरी आयटीआर फॉर्म आणि नियमांची अधिसूचना जारी होईल. हा कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल डिजिटल फसवणूक रोखण्यासाठी, यूपीआय, मोबाईल नंबर आणि बँक खात्यांशी संबंधित नियम आणखी कडक केले जातील. सिम पडताळणी आणि डिजिटल ओळखीवर विशेष लक्ष दिले जाईल, ज्यामुळे ऑनलाइन फसवणूक रोखली जाईल.नव्या वर्षात पीएफ काढण्याचे नियम सोपे होतील. आवश्यक गरजा, घरगुती गरजा आणि विशेष परिस्थिती यामुळे कर्मचाऱ्यांना पूर्ण निधी कधी काढता येईल आणि अंशतः रक्कम कधी उपलब्ध आहे हेही समजणे सोपे होईल.१ जानेवारीपासून रेशन कार्डशी संबंधित सेवा सर्वसामान्यांसाठी सोप्या होतील. नवीन रेशन कार्ड मिळवण्यापासून ते नाव जोडणे, वगळणे किंवा दुरुस्त करणे यापर्यंतची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन असेल.नेहमीप्रमाणे एलपीजी, व्यावसायिक गॅस आणि विमान इंधनाच्या किमतीत बदल शक्य आहेत.काही राज्यांमध्ये पीएम-किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी एक युनिक शेतकरी आयडी आवश्यक असेल.

### ४२८ पासपोर्ट जप्त, नवी मुंबई पोलिसांची कारवाई

**मुंबई-**विदेश मंत्रालय उत्प्रवासी संरक्षी कार्यालय (पीओई) व नवी मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचच्या मदतीने वाशी, बेलापूर, पनवेल आणि खारघर या ठिकाणी कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४२८ पासपोर्टसह ऑफर लेटर, बनावट शिक्के जप्त करण्यात आले.एमिग्रेशन ॲक्ट १९८३ च्या कलम ३५ अंतर्गत संयुक्त मोहीम राबविण्यात आली. कायद्याचे उल्लंघन करून वैध नोंदणी किंवा परवाना नसतानाही अनधिकृत परदेशी भरती उपक्रमांची झाडाझडती घेण्यात आली. पोलिसांच्या पथकाने प्रवाशांचे ४२८ पासपोर्ट जप्त केले. त्याचबरोबर रोजगार ऑफर लेटर, लॉगबुक, व्हिसा, बनावट व्हिजिटिंग कार्ड, बनावट रबर शिक्के तसेच बेकायदेशीर परदेशी भरती उपक्रमांमध्ये वापरण्यात आलेली इतर कागदपत्रे जप्त केली. ही कागदपत्रे व साहित्य पुढील कारवाईसाठी नवी मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचने ताब्यात घेतली आहेत.

### तपोवनातील झाडे तोडून सरकार कुठला धर्म वाचवणार!



**नाशिक-**आपला वैदिक धर्म पंचमहाभूतांची पूजा करणारा आहे. प्रभू श्रीरामांचे नाशिकच्या तपोवनात वास्तव्य होते, असे वन नष्ट करून सरकार कुठला धर्म वाचवणार आहे, असा सवाल शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केला. आचारसंहिता संपताच तपोवनाला रिझर्व्ह फॉरेस्टचा दर्जा द्या, तो मिळेपर्यंत आम्ही थांबणार नाही. अरवलीसाठी लढणाऱ्या जनतेसारखी चळवळ उभी करू, विकासाच्या नावाखाली हरित क्षेत्र नष्ट करून बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव उधळून लावू, असा इशारा दिला. कुंभमेळ्याला आमचा विरोध नाही, तो झालाच पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. आदित्य ठाकरे तपोवनाला भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलत होते. या सरकारचा धर्म बिल्डर धर्म आहे, सब भूमी बिल्डर की, असंच त्यांना वाटतंय, असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. माईस हब कुठेही होईल, तरी ठक्कर म्हणून कुणी बिल्डर आहे, त्याने मुख्यमंत्र्यांसोबतचा व्हिडीओ व्हायरल केला होता, तो मुख्यमंत्र्यांना सुचवतो. तपोवनला यलो झोन करून बिल्डरांना तुम्ही सगळं देणार असाल तर नाशिककरांच्या हाती काय उरणार, असा संताप आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. झाडांवर कुऱ्हाड चालवू पाहणाऱ्या या सत्ताधाऱ्यांना मतदान होऊच नये. कारण, ते आता थातूरमातूर सांगतील, नंतर बुलडोझर घेऊन येतील, अशा शब्दांत जागरूक केले. त्र्यंबकेश्वरच्या अंजनेरी ते ब्रह्मगिरी पर्वतापर्यंतच्या रोप वेसाठी सरकारने पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत, या प्रश्नाला उत्तर देताना आदित्य ठाकरे म्हणाले की, याआधी आम्ही तेथील पर्यावरण रक्षणासाठी आवाज उठवला होता. आता जर कुणी अंजनेरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना आम्ही श्री हनुमानाची ताकद दाखवून देऊ, असा इशारा दिला.

### राज्य सरकारची मुंबई-लातूर महामार्गाला संमती

**मुंबई-**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मुंबई ते लातूर प्रवास करणाऱ्यांना दिलासा मिळला आहे. मुंबई ते लातूर प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कल्याण–लातूर जनकल्याण द्रुतगती महामार्ग उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून या प्रकल्पाला तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर एमएसआरडीसीने महामार्गाच्या संरेखनाचे काम प्रत्यक्षात सुरू केले आहे.एमएसआरडीसीच्या सुमारे चार हजार किलोमीटर लांबीच्या प्रस्तावित रस्ते प्रकल्पांमध्ये कल्याण–लातूर द्रुतगती महामार्गाचा समावेश अनेक वर्षांपूर्वी करण्यात आला होता. मात्र दीर्घकाळ हा प्रकल्प कागदावरच मर्यादित राहिला होता. या मार्गामुळे मुंबई, ठाणे परिसर आणि मराठवाडा यांच्यातील अंतर व प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी होणार.

# मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीची अधिकृत घोषणा

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे धैर्यवर्धन पुंडकर यांची माहिती



**मुंबई-** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा झाल्यानंतर राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने राजकारणात घडामोडी सुरू आहेत. मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी युतीची घोषणा केलेली आहे. त्यानंतर आता मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये युती झाली आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीची अधिकृत घोषणा केली आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी वंचित बहुजन आघाडी ६२ जागा लढवणार असल्याचंही या संयुक्त पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आलं आहे. 'काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची मुंबईत आघाडीची घोषणा करत असताना मला आनंद होत आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी या दोन्ही पक्षांची नैसर्गिक मैत्री आहे. कारण संविधानाला अभिप्रेत असणारा भारत घडवणं हा आमचा देखील राजकीय अजेंडा आहे आणि वंचित बहुजन आघाडीचा देखील हाच राजकीय अजेंडा आहे.काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचं नातं चांगलं आहे', असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. 'मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी समविचारी पक्षांना बरोबर घेण्याची काँग्रेसची भूमिका असल्याचं आम्ही सांगत होतो. आज आम्ही मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीची घोषणा करत आहोत. तसेच राज्यात इतर २८ ठिकाणी युती करण्यासाठी देखील आमची चर्चा सुरू आहे. सकारात्मक निर्णय होईल. नगरपंचायतीच्या निवडणुकीत देखील काही ठिकाणी आम्ही एकत्र लढलो आहोत. आता आजपासून काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी हे दोन्ही पक्ष मित्र पक्ष म्हणून राहतील', असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. 'आजपासून आम्ही एका नव्या अध्यायाला सुरूवात करत आहोत. आमची आघाडी ही सत्तेसाठी नाही तर विचारांची आहे. संविधानाची मूल्ये जपण्यासाठी आम्ही पुढे जात आहोत. आगामी काळात आमची आघाडी परिवर्तन घडवेल', असा विश्वासही हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतींच्या माध्यमातून मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी वंचित बहुजन आघाडी ६२ जागा लढवणार असल्याची घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे.

# अदाणींच्या भावाने शरद पवारांचा पक्ष फोडला-राऊत



**पुणे-**जिल्ह्यातील बारामती येथे आज अदाणी उद्योग समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांच्या हस्ते 'शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या केंद्राचे उद्घाटन होत आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गौतम अदानी आणि पवार कुटुंबातील सर्व दिग्गज नेते पुन्हा एकदा एकाच मंचावर दिसून आले आहेत. काँग्रेसकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गौतम अदाणी यांच्या संबंधांवर सतत टीका होत असतानाच शरद पवार आणि गौतम अदाणी एकत्र आल्याने चर्चांना उधाण आले असून आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक खळबळजनक दावा केला.

संजय राऊत म्हणाले की, मुंबईवर मोदींचा आणि भाजपाचा मित्र ज्या पद्धतीने ताबा मिळवत आहे, त्याला आमचा तात्विक आणि नैतिक विरोध आहे. गौतम अदाणी यांना मुंबईला ताब्यात दिली जाते आहे, त्याविरोधात आमची लढाई आहे. भारतीय जनता पक्षाच्या मदतीने मुंबई गिळण्याचा प्रयत्न होत आहे. ते उद्योगपती आहेत. पण गौतम अदाणींसारखा हव्यास इतर उद्योगपतींनी मुंबईच्या बाबतीत दाखवल्याचे दिसून येत नाही. टाटा, बिर्ला, अंबानी यांच्यासह अनेक उद्योगपती या मुंबईमध्ये आलेत. पण ज्या पद्धतीने अदानींना मुंबई गिळण्यासाठी उत्तेजन दिले जात आहे, हे मुंबईसाठी आणि मराठी माणसासाठी अत्यंत घातक आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

संजय राऊत पुढे म्हणाले की, शरद पवार आणि गौतम अदाणींचे संबंध राजकीय नाहीत. कौटुंबिक आणि व्यक्तिगत आहेत. आपल्या कार्यक्रमाला कुणाला बोलवायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. त्यांनी गौतम अदाणींना बोलावलं असेल आणि त्यासाठी पवारांचे संपूर्ण कुटुंब ज्यांनी पक्ष फोडला ते अजित पवार सुद्धा उपस्थित असतील तर तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. शरद पवारांचा पक्ष फोडण्यात गौतम अदाणींच्या भावाचा सहभाग होता, अशी माझी ऐकीव माहिती आहे, असा खळबळजनक दावा त्यांनी केलाय. तर रोहित पवारांनी अदाणींच्या कारचं सारथ्य का केलं, हे त्यांनाच विचारा, असे देखील संजय राऊत म्हणाले.

जुलै २०२३ मध्ये अजित पवार हे सत्तेत सहभागी झाले आहेत. त्यावेळीही ते उपमुख्यमंत्री झाले होते. तसंच भाजपा महायुतीने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतही विजय मिळवला.

अजित पवार २०२४ नंतरही राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. २०२३ मध्ये जेव्हा पक्ष फुटला तेव्हा शरद पवारांची साथ का सोडली त्याचं कारणही त्यांनी सांगितलं होतं. तसंच सतत आपल्याला व्हिलन ठरवलं गेल्याचंही अजित पवार तेव्हा म्हणाले होते. आता संजय राऊत यांनी आरोप करत गौतम अदाणींच्या भावाने शरद पवारांचा पक्ष फोडला असा दावा केला आहे.

# भाजप हिंदुत्वाचा आणखी किती अपमान करणार?

## हिंदू महासंघाचे अध्यक्ष दवे यांची भाजपवर टीका



**मुंबई-**केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या एका जाहिरातीमधील छायाचित्रामध्ये गणपती बाप्पाच्या डोक्यावर चक्क सांताक्लॉजची टोपी घालण्यात आल्याने भाजपचे बेगडी हिंदुत्व पुन्हा एकदा उघड झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी चर्चमध्ये गेले म्हणून तुम्हाला गणपतीचे धर्मांतर करण्याची परवानगी मिळाली असा त्याचा अर्थ होत नाही.

भाजप हिंदुत्वाचा आणखी किती अपमान करणार आहे, असा सवाल हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी केला आहे. जाहिरात प्रसिद्ध करणाऱ्या सांस्कृतिक मंत्र्याचा तत्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.भाजपच्या हिंदूविरोधी कृतींवरून त्यांचे खोटारडे हिंदुत्व अनेक वेळा उघड झाले आहे. नाताळनिमित्त पंतप्रधान मोदी चर्चमध्ये गेल्याने अनेक हिंदुत्ववादी संघटनांकडून त्यांच्यावर टीका सुरू असतानाच, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने एका वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमध्ये गणपतीला सांताक्लॉजची टोपी घालून गणेशाला सांताक्लॉजच्या रुपात दाखवण्याचा प्रयत्न केल्याने गदारोळ निर्माण झाला आहे.

### १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची लवकरच घोषणा

**मुंबई-**सध्या सुरू असलेल्या महानगरपालिका निवडणुकांची उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यावर ५० टक्क्यांच्या मर्यादेत आरक्षण असलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा मंगळवारनंतर राज्य निवडणूक आयोगाकडून केली जाणार आहे. ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असलेल्या २० जिल्हा परिषदांमध्ये मात्र लगेचच निवडणूक होणार नाही. राज्यातील ३२ पैकी केवळ १२ जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्केच्या आत आरक्षण असून २० जिल्हा परिषदांमध्ये ५१ ते १०० टक्के पर्यंत आरक्षण देण्यात आले आहे. अशाच प्रकारे ३३६ पंचायत समित्यांपैकी १२५ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळण्यात आली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार ५० टक्क्यांच्या आत आरक्षण असलेल्या १२ जिल्हा जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. प्रारंभी २९ महापालिकांसोबतच या निवडणूका घेण्याची चाचपणी आयोगाने केली होती. मात्र आता महापालिकांची निवडणूक प्रक्रिया १७ जानेवारीपर्यंत संपणार असल्याने जिल्हा परिषदांसाठी मतदान यंत्र तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांची होणारी उपलब्धता लक्षात घेऊन जानेवारीच्या चौथ्या आठवड्यात किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात या निवडणुका घेण्याची तयारी आयोगाने केली आहे.

**१२ जिल्हा परिषदांमध्येच निवडणूक-**लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या सर्व जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांच्या मर्यादेत आरक्षण लागू आहे.

ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, अहिल्यानगर, जालना, बीड

# जेलमधून लढवणार निवडणूक, बंडू आंदेकरचा नवा राजकीय प्रवेश



**पुणे-**पुण्यातील गँगवॉरला कारणीभूत ठरलेल्या आयुष कोमकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी बंडू आंदेकरने आता राजकीय मैदानात नवा डाव आखल्याची चर्चा आहे. आपल्या नातवाच्या हत्येप्रकरणी तुरुंगात असलेल्या आंदेकरने पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी न्यायालयाकडून विशेष परवानगी घेतली होती. या परवानगीनंतर शनिवारी तो पोलिस बंदोबस्तात क्षेत्रीय कार्यालयात दाखल झाला आणि समर्थकांसमोर जोरदार घोषणाबाजी करत आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला.

विशेष न्यायालयाच्या आदेशानंतर आंदेकर कुटुंबातील बंडू आंदेकर, लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर हे तिघे भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोहोचले होते. मात्र अर्ज अर्धवट भरलेले असल्याचे निदर्शनास आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी हे अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे हे तिघे पुन्हा अर्ज दाखल करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, बंडू आंदेकरसह तिघांचे अर्ज बाद झाल्यानंतर आता जेलमधून बाहेर येण्यासाठी हा संपूर्ण प्रकार मास्टरप्लॅनचा भाग असल्याची चर्चा रंगू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर वनराजच्या पत्नीनेही आंदेकरांच्या पावलावर पाऊल टाकत निवडणूक प्रक्रियेचा मार्ग अवलंबल्याचे बोलले जात आहे. आंदेकर कुटुंबातील बंडू आंदेकर, लक्ष्मी उदयकांत आंदेकर आणि सोनाली वनराज आंदेकर हे प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती आहे.

'नेकी का काम, आंदेकर का नाम' आणि 'आंदेकरांना मत म्हणजे विकासाला मत' अशा घोषणा देत आंदेकरने आपली राजकीय उपस्थिती दाखवून दिली. विशेष न्यायालयाने सशर्त परवानगी दिल्यानुसार काल दुपारी पोलिस बंदोबस्तात हे अर्ज दाखल करण्यात आले होते. बंडू आंदेकरने प्रभाग क्रमांक २४ कसबा पेठ-कमला नेहरू रुग्णालय-केएमई येथून तर लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर यांनी प्रभाग क्रमांक २३ रविवार पेठ-नाना पेठ येथून अर्ज भरल्याची चर्चा होती. मात्र अर्ज अपूर्ण असल्याने ते स्वीकारण्यात आले नसल्याचे भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### ३१ डिसेंबरला गाडी चालवणे पडणार महागात

**पुणे-**नववर्षाच्या स्वागतासाठी होणाऱ्या सेलिब्रेशनदरम्यान वाहतुकीचे नियम धुडकावणाऱ्यांवर आता थेट कारवाई होणार आहे. थर्टी फर्स्ट आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य अपघात टाळण्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने विशेष उपाययोजना राबवल्या आहेत. मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी शहरात सहा विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. या मोहिमेअंतर्गत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवताना आढळलेल्या चालकांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता थेट वाहनचालक परवाना निलंबित करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

# राज्यात पुन्हा थंडीचा कडाका वाढणार

**नागपूर-**नवीन वर्ष सुरू होण्यास अवघे चार दिवस शिल्लक असताना राज्यात पुन्हा एकदा थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाली आहे. उत्तरेकडील शीतलहरी हळूहळू दक्षिणेकडे सरकत असल्याने महाराष्ट्रातील हवामानात लक्षणीय बदल जाणवत आहेत. राज्यभरातच थंडीचा कडाका वाढलाय. विशेषतः पहाटे आणि रात्रीच्या सुमारास गारठा अधिक वाढतो आहे. दिवसा काही काळ उबदारपणा जाणवत असला, तरी एकूणच थंडीचा प्रभाव कमी झालेला नाही. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, डिसेंबरअखेर वाऱ्यांच्या दिशेत बदल होण्याची शक्यता असून याचा थेट परिणाम तापमानावर होऊ शकतो. रविवारी महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. थंडीचा जोर राज्याच्या अनेक भागांत कायम राहणार आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या तीव्र थंडीच्या लाटेचे पडसाद महाराष्ट्रात उमटत आहेत. उत्तर आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान दहा अंश सेल्सिअसच्या खाली घसरले आहे. त्यामुळे सकाळी लवकर घराबाहेर पडणारे नागरिक, शेतकरी आणि कामगार वर्गाला कडाक्याच्या गारठ्याचा सामना करावा लागत आहे.दरम्यान, हवामान खात्याने उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणामध्ये एक जानेवारीपर्यंत दाट धुक्याचा इशारा दिला आहे. या बदलत्या हवामानाचा परिणाम महाराष्ट्रावरही होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील काही भागांत पहाटे धुक्याची चादर पसरलेली दिसून येईल. विशेषतः महामार्गांवर आणि ग्रामीण भागांत वाहनचालकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले-उद्धव ठाकरे



**मुंबई-**आपल्या डोळ्यांदेखत हुतात्म्यांच्या बलिदानातून मिळालेली मुंबई दोन गुजराती लोकांना गिळायची आहे. आपण जर आपल्या व्यक्तिगत महत्वाकांक्षांना महत्त्व देत, तुझं माझं करणार असू तर दुफळीचा फायदा लोक घेतील. तुमच्यापैकी कुणीही फुटता कामा नये.भारतीय जनता पक्षाने आजवर आपला दुरुपयोग करुन घेतला. काँग्रेसचा अनुभवही तुम्हाला आहे. महाराष्ट्रासाठी आणि मराठी माणसासाठी मनसेशी युती केली आहे. युती, आघाडी असते तेव्हा १०० टक्के मनासारख्या गोष्टी घडत नाहीत. काही जागा हक्काने सोडाव्या लागतात. काही वेळा त्यांच्या जागा असतात त्या त्यांना सोडाव्या लागतात. कुठलाही वाद न घालताना युती केली आहे असे मत उद्धव ठाकरे यांनी व्यकत केले.

यावेळी राज्यातील महापालिका निवडणुका तोंडावर आहेत. १५ जानेवारीला मतदान होईल आणि १६ जानेवारी २०२६ रोजी निकाल लागेल. राज्यातील निवडणुका शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्र लढणार आहेत. मुंबईसह राज्यातील महापालिका निवडणुका उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र लढणार आहेत. हेच नाही तर राज ठाकरे यांनी जाहीर केले की, मुंबई महापालिकेवर मराठीच माणूस महापौर होईल आणि तोही आमचाच असा दावा केला.

उद्धव ठाकरे यांनी कोव्हिड काळात केलेल्या जनसेवेबाबत सविस्तर माहिती देणारी पुस्तिका आज शिवसेनाभवन येथे उद्धवसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आली.

याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार अरविंद सावंत, शिवसेना नेते खासदार अनिल देसाई, शिवसेना नेते अनिल परब सचिव आमदार मिलिंद नार्वेकर, प्रवक्ते आणि जनसंपर्क प्रमुख ॲड. हर्षल प्रधान,सचिव सुरज चव्हाण, माजी महापौर किशोरी पेडणेकर, पुस्तिकेचे संकलक कीर्तिकुमार शिंदे, श्री अखिल चित्रे आदी उपस्थित होते. मुंबईतील सर्व विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख , आमदार, खासदार यांच्याशी आज उद्धव ठाकरेंनी संवाद साधला.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४ ■ सोमवार, २९ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## पालकमंत्री पोहोचले सामान्य रुग्णालयात

# पाठीशी घालाल तर सुटका नाही : आगीच्या चौकशीत पालकमंत्र्यांचा कडक इशारा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा सामान्य रुग्णालयातील इमारत क्रमांक २ मध्ये दुसऱ्या माळ्यावर २३ डिसेंबर रोजी लागलेल्या आगीने प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा भांडाफोड केला आहे. या गंभीर घटनेची दखल घेत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी थेट घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि चौकशीबाबत आक्रमक भूमिका घेतली. एसीएस अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही थेट कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

रविवारी (२८ डिसेंबर) दुपारी चारच्या सुमारास पालकमंत्री डॉ. भोयर जिल्हा सामान्य रुग्णालयात पोहोचले. त्यांनी सर्वप्रथम इमारत क्रमांक २ मधील बालरुग्ण विभाग तसेच दुसऱ्या माळ्यावरील त्या स्टोअर रूमची पाहणी केली, जिथे आग लागून महत्त्वाचे साहित्य जळून कोळसा झाले. पाहणीदरम्यान



काही ठिकाणी अस्वच्छता आढळल्याने पालकमंत्री संतप्त झाले. 'रुग्णालय स्वच्छच राहिले पाहिजे,' असा स्पष्ट आदेश देत प्रत्येक विभागप्रमुखांची जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनतकरी यांना दिले.

या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी आग लागणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी रुग्णालय प्रशासनाने तातडीने इलेक्ट्रीक व स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, या प्रकरणी एसीएस अध्यक्षतेखाली गठीत विशेष चौकशी समितीने काम सुरू केले आहे. समितीत इलेक्ट्रीक तज्ज्ञाचाही समावेश असून, आगीचे नेमके कारण शोधण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, चौकशी सुरू असतानाही आग कशामुळे लागली याचे ठोस कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे प्रशासनातील निष्काळजीपणा आणि दुर्लक्षावर संशय अधिक गडद होत आहे. 'ही चौकशी केवळ औपचारिक नसेल. कुणालाही वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित चौकशी समितीतील अधिकाऱ्यांवरच कारवाई केली जाईल,' असा थेट इशारा देत पालकमंत्र्यांनी प्रशासनाला खडसावले. जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनतकरी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयातील आग ही केवळ दुर्घटना की प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा परिणाम, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. चौकशी समितीचा अहवाल काय निष्कर्ष काढतो, यावर दोषींवर कारवाई होणार की पुन्हा एकदा फाईल बंद होणार, हे ठरणार आहे.

# बसस्थानक परिसरात उड्डाणपुलाला तडे : बांधकामावर घाला

## -प्रशासनाची डोळेझाक:कधीही कोसळू शकतो कॉँक्रिटचा भाग

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्गावर कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला उड्डाणपूल अवघ्या काही दिवसांतच भेगाळू लागल्याने कारंजा शहर हादरले आहे. बसस्थानक परिसरातील या उड्डाणपुलाच्या भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून, सिमेंट कॉँक्रिटचे तुकडे सैल झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. नव्याने बांधलेल्या पुलाची ही अवस्था पाहता, हा विकासाचा प्रकल्प आहे की जनतेसाठी उभा केलेला मृत्यूचा सापळा आहे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

विशेष म्हणजे या परिसरात दिवसभर प्रवासी, पादचारी, विद्यार्थी, महिला तसेच जड वाहनांची प्रचंड वर्दळ असते. अशा ठिकाणी उड्डाणपुलाच्या भिंतींना तडे जाणे म्हणजे थेट जीवितास धोका निर्माण होण्यासारखे आहे. वेळेत दखल घेतली नाही, तर भविष्यात मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही संबंधित यंत्रणा गप्प का, असा सवाल उपस्थित होत आहे.

उड्डाणपुलाच्या भिंतींवर ठिकठिकाणी झाडे उगवली असून, कॉँक्रिट प्लेटमध्ये गॅप निर्माण होत आहे. सौंदर्यीकरणाच्या नावाखाली लाखो रुपये खर्चून वृक्षारोपण करण्यात आले, मात्र त्या झाडांची देखभाल कंत्राटदार कंपनीने केलीच नाही. नियमांनुसार पुढील सहा वर्षे उड्डाणपुलाची देखरेख करणे कंत्राटदारावर बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात मात्र संपूर्ण दुर्लक्ष दिसून येत आहे.



या उड्डाणपुलाचे काम जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने केले आहे. बांधकामाच्या दर्जावर आता उघडपणे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुलाची तातडीने सखोल तांत्रिक तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे. कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीचे अध्यक्ष विभाकर ढोले यांनी पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून दोषी आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली आहे.

दरम्यान, बसस्थानक समोरील उड्डाणपुलाला पडलेले तडे अत्यंत धोकादायक असून, सिमेंट कॉँक्रिटचा भाग कधीही कोसळू शकतो, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर जसूतकर यांनी दिला आहे. अपघात झाल्यावर चौकशी समित्या बसवण्याऐवजी प्रशासनाने आताच जागे व्हावे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

एकंदरीत, विकासाच्या नावाखाली निकृष्ट काम, कंत्राटदारांची बेफिकिरी आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे कारंजावासीयांचे प्राण धोक्यात आले आहेत. उड्डाणपुलाची तात्काळ दुरुस्ती, मजबुतीकरण आणि दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर जनतेचा उद्रेक अटळ असल्याचा इशारा आता दिला जात आहे.

## भरधाव कारची दुचाकीला धडक; दोघांचा दुर्दैवी मृत्यू, भुगाव टी-पॉईंटवर भीषण अपघात

**वर्धा जनमाध्यम :** भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना भुगाव परिसरातील टी-पॉईंटजवळ घडली. या अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला असून रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवी घनश्याम जयराजे (वय ४८, रा. आनंदनगर, वर्धा) आणि पिंकी जयसिंग तोमर (रा. इतवारा बाजार, वर्धा) अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रवी जयराजे हे पिंकी तोमर यांना दुचाकीवरून घेऊन एम.एच. ३२ एस. १९२६ क्रमांकाच्या वाहनाने वर्धेकडे जात होते. दुचाकी भुगाव येथील टी-पॉईंट परिसरात येताच समोरून भरधाव वेगात येणाऱ्या के.ए. ३५ पी. ६७११ क्रमांकाच्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की रवी जयराजे यांचा जागीच मृत्यू झाला, तर पिंकी तोमर या गंभीर जखमी झाल्या. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी पिंकी यांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले तसेच सावंगी पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. मात्र उपचार सुरू असतानाच पिंकी तोमर यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. अपघातास कारणीभूत ठरलेल्या कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून टी-पॉईंटसारख्या धोकादायक ठिकाणी वेगावर नियंत्रण आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मांडगावात घराला भीषण आग; चंदनखेडे कुटुंबाचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील मांडगाव येथे अचानक लागलेल्या आगीत एका घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र घरातील सर्वच संसारोपयोगी व शेतकामाचे साहित्य जळून खाक झाले असून चंदनखेडे कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे.

प्राप्त माहितीनुसार, मांडगाव येथील मनोज त्रंबकराव चंदनखेडे यांच्या घराला अचानक आग लागली. सुरुवातीला किरकोळ वाटणारी ही आग काही क्षणातच भडकल्याने घराला भीषण स्वरूप प्राप्त झाले. आगीचे लोळ आकाशात उठताना पाहून परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पाणी, वाळू व उपलब्ध साधनांच्या मदतीने ग्रामस्थांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या तत्परतेमुळे आग इतर घरांपर्यंत पसरण्यापूर्वीच आटोक्यात आली आणि मोठा अनर्थ टळला.



या आगीत घरात ठेवलेले कुलर, फ्रिज, लाकडी व लोखंडी पेट्या, तिनपत्रे फाटे तसेच विविध शेतोपयोगी साहित्य पूर्णतः जळून गेले. आगीमुळे घरातील जीवनावश्यक वस्तू नष्ट झाल्याने कुटुंब उघड्यावर येण्याची वेळ आली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.

दरम्यान, या घटनेनंतर गावकऱ्यांनी चंदनखेडे कुटुंबाला धीर देत मदतीचा हात पुढे केला आहे. प्रशासनाकडून पंचनामा करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून शासनाकडून तातडीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शिवसेनेच्या वर्धा शहरातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

### -मध्यवर्ती जिल्हा कार्यालयात बैठक; संघटन बळकटीकरणावर भर

**वर्धा जनमाध्यम :** शिवसेनाच्या मध्यवर्ती जिल्हा कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत वर्धा शहरातील संघटनात्मक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. वर्धा लोकसभा संपर्क प्रमुख राज दीक्षित यांच्या सूचनेनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीला लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, सह संघटक गणेश इखार, जिल्हाप्रमुख राजेश सराफ व प्रशांत शहागडकर तसेच महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर उपस्थित होते. शहरातील प्रभागनिहाय संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. उपशहर प्रमुख म्हणून संतोष लांगोरे, शरद आडे, मनोज भुतडा,अजय बालावे, सुयोग नवघरे, यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

वर्धा विधानसभा मतदारसंघासाठी तक्रार निवारण समिती प्रमुख म्हणून सुरेश पट्टेवार यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. शहर समन्वयक म्हणून धरम शेंडे,वैभव तिजारे, सूरज भारती,सचीन चांडक,कन्हैया यादव यांची निवड करण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमुळे वर्धा शहरातील संघटनात्मक कामकाजाला गती मिळणार असून, नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि पक्षकार्य तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांकडून सक्रिय भूमिका अपेक्षित असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील नागरिकांचा एसटी प्रवास सुखकर करण्याचा प्रयत्न - पालकमंत्री

## -पालकमंत्री ई-बसने पोहोचले सामान्य रुग्णालयात

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस अजूनही लाखो सर्वसामान्य नागरिकांचे प्रवासाचे प्रमुख साधन आहे. खेड्यापाड्यातील हजारो नागरिक आपल्या कामासाठी बसचा प्रवास करतात. जिल्ह्यातील अशा प्रवाशांचा प्रवास सुखकर, समाधानी करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागास १४ ई-शिवाई वातानुकूलित बसेस प्राप्त झाल्या असून या बसेसचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते वर्धा बसस्थानक येथे झाले?. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्र्यांसह नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, एसटी महामंडळाने प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभने, विभाग नियंत्रक भगवान जगनोर, यंत्र अभियंता प्रताप राठोड, आगार प्रमुख युधिष्ठीर रामचवरे, सुनील गफाट, नगरसेवक अभिषेक त्रिवेदी, श्रीमती आडे, गणेश इखार, संजय लाभे, दामोदर राऊत आदी उपस्थित होते.

एसटी बसेस जून्या झाल्याने नवीन वातानुकूलित बसेस मिळण्याची विनंती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना केली होती. त्यांनी १४ ई-बसेस उपलब्ध करुन



दिल्या. पुन्हा किमान ५० वातानुकूलित बसेस उपलब्ध करुन घेण्याचा माझा प्रयत्न आहे. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या परिवहन सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा सातत्याचा प्रयत्न आहे.मागील काळात तत्कालीन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वर्धा बसस्थानकासाठी निधी उपलब्ध करुन दिला. वर्धासह सेलू येथे देखील नवीन बसस्थानक झाले. पवनार मेन रोडवर देखील बसस्थानक होत असून जवळजवळ १०० प्रवासी निवारे मतदारसंघात पुर्ण केले आहे. बसेस देखील उत्तम दर्जाच्या आणी आरामदायी असल्या पाहिजे. बसस्थानक परिसरात देखील प्रवाशांसाठी चांगल्या सोई-सुविधा असल्या पाहिजे, असे पालकमंत्री डॉ.भोयर म्हणाले.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय वाहतूक अधिकारी स्वाती तांबे यांनी केले. सुरुवातीस पालकमंत्र्यांनी फित कापुस बसेसचे लोकार्पण केले. पालकमंत्र्यांनी वर्धा बसस्थानकापासून जिल्हा सामान्य रुग्णालयापर्यंत नवीन ई-बसने प्रवास देखील केला.

या मार्गावरुन धावतील ई-बसेस वर्धा आगारात दाखल झालेल्या बसेस वर्धा-आर्वी-वरुड, वर्धा-राळेगाव-नागपूर, वर्धा-यवतमाळ-नागपूर-वर्धा, वर्धा-अमरावती-वर्धा, वर्धा-नांदेड-वर्धा, वर्धा-अकोला-वर्धा, वर्धा-हिंगणघाट-नागपूर या मार्गावर धावणार आहे.

## युरीया खत नाही, शेतकरी त्रस्त

**सेलु जनमाध्यम :** गव्हाची पेरणी जोरात सुरू असतानाही शेतकऱ्यांना युरीया खत मिळवण्यात मोठा त्रास होत आहे. तालुक्यातील अनेक कृषिकेंद्रांत खत उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना परतवून लावले जात असल्याची तक्रार आहे.




शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, नियमानुसार २६६ रुपयात मिळणारे खत काही ठिकाणी ३५० ते ३७५ रुपयांना विकले जात आहे. आमच्या गरजेप्रमाणे खत मिळत नाही, तर उत्पादनावर परिणाम होईल, असे शेतकरी सांगतात. क्रषी विभागाचे अधिकारी म्हणतात की, खताचा तुटवडा नाही. तरीही शेतकऱ्यांना खत वेळेत उपलब्ध होत नाही. शेतकऱ्यांचा आरोप आहे की काही संचालक काळाबाजारात खत विकून नफा कमावतात.

स्थानिक शेतकरी यावर लक्ष देण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. शेतकऱ्यांचा आग्रह आहे की, युरीया खत निर्धारित दरात आणि वेळेत उपलब्ध करून द्यावे.

## सेलू तालुका पर्यटनाचा सोनेरी सुवर्णसंधी, पण पालकमंत्र्यांची दुर्लक्षाची फटकेबाजी

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुका पर्यटनाची संपत्ती असूनही विकासाच्या दिशेने पाऊल टाकण्यात सरकार उदासीन बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्याची संधी असूनही, पालकमंत्र्यांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी डोळे मिटले आहेत, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**पर्यटनाची फुलं परंतु विकासाच्या पिकास पाणी नाही**

सेलू तालुक्यातील सेवाग्राम आश्रम, पवनार, घोराड, केळझर येथील सिद्धीविनायक गणेश मंदिर, खडकी हनुमान मंदिर, बृहस्पति मंदिर, बोरधरण व बोर व्याघ्र प्रकल्प, टाकळीतील लक्ष्मी माता मंदिर, पंचधारा व महाकाली धरण हे पर्यटन स्थळे असूनही शासनाकडून कोणतीही मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. लोकप्रतिनिधींना तालुका विकासाचा भास नाही, असा प्रश्नी परिस्थितीचं दर्शन घडत आहे.

**बोरधरण: पर्यटकांचा दुःखाचा डोंगर-**बोरधरण हे तालुका पर्यटनाचं प्रमुख केंद्र आहे, परंतु येथे येणाऱ्या पर्यटकांना पार्किंग नाही, राहण्याची सुविधा नाही, बालकांसाठी उद्यान नाही, त्यामुळे एकदा आलेले पर्यटक पुन्हा परत येत नाहीत. बेरोजगार युवकांसाठी रोजगारनिर्मितीचा स्वप्न फक्त कागदावरच राहत आहे.

**घोराड: प्रती पंढरी तर सरकारने विसरलं-**प्रती पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र घोराडमध्ये शासनाचा विकास आराखडा नाही. लाखो रुपये निधी असूनही, मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष, हे सरकारी दुर्लक्षाचे दुष्परिणाम ठरत आहेत.

**सुरक्षा व सुविधा नसल्यामुळे पर्यटक परतत नाहीत-**

बोरधरण परिसरात शासकीय विश्रामगृह, बगीचा, लहान मुलांसाठी खेळणी, वाहनतळ, पाऊस आल्यास आश्रय यांसारख्या सुविधा निर्माण केल्या तर येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आकर्षित होतील. मात्र, आतापर्यंत सुरक्षा आणि सुविधा निर्माण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे.

# एसटीच्या 'ई बस' लोकार्पण पत्रिकेतून केचे OUT

## -विसर नव्हे, तर राजकीय डाव? जिल्ह्यात खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** एसटी महामंडळाच्या नव्याने दाखल झालेल्या 'ई बस'च्या लोकार्पण सोहळ्याने जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण केले असतानाच, एका धक्कादायक बाबीने राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडवली आहे. गावोगावी वाटण्यात आलेल्या लोकार्पणाच्या पत्रिकेत सर्व आमदार-खासदारांची नावे झळकत असताना, विधानपरिषदेचे आमदार दादाराव केचे यांचे नाव मात्र रहस्यमयरित्या गायब आहे. हा साधा विसर की जाणीवपूर्वक केलेले डावलणे, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

पत्रिकेत नाव नसल्याचे समोर येताच गावात संतापाची लाट उसळली. जिल्ह्याच्या विकासात ज्यांचे योगदान महत्त्वाचे, त्यांनाच बाजूला काढायचे असा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. विशेष म्हणजे अलीकडेच नगरपालिका निवडणुकीदरम्यान दादाराव केचे यांना काही महिलांनी रस्त्यात अडवून शिवीगाळ केल्याची बातमी प्रसारमाध्यमांत झळकली होती. या घटनेचा राग मनात ठेवूनच एसटी महामंडळाने केचे यांचे नाव पत्रिकेत टाळले का, अशी दबक्या आवाजातील चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. एसटी महामंडळाकडून मात्र या गंभीर प्रकारावर अद्याप मौन बाळगण्यात आले आहे. पण हे मौनच संशयाला खतपाणी घालणारे ठरत आहे. राजकीय मतभेद असले तरी शासकीय कार्यक्रमात लोकप्रतिनिधींना डावलणे म्हणजे लोकशाहीची गळचेपी असल्याची भावना व्यक्त होत आहे.



पुर्वीची पत्रिका

बदल केलेली पत्रिका

जिल्ह्याच्या हितासाठी नेहमी आक्रमक भूमिका घेणाऱ्या आमदाराला अशा पद्धतीने बाजूला काढणे हे केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यावर अन्याय करणारे कृत्य असल्याचा आरोप होत आहे. ही चूक नसेल, तर थेट अपमान आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, एसटी महामंडळाने तातडीने खुलासा करावा, अन्यथा हा मुद्दा आणखी पेटणार, हे मात्र निश्चित आहे,

**सोशल मीडियावर झळकताच पत्रिका बदल-** सोशल मीडियावर बातमी झळकताच ई-बस लोकार्पण कार्यक्रमाच्या पत्रिकेचा वाद चव्हाट्यावर आला. रविवारी दुपारी चार वाजता बस स्थानक परिसरात पालकमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. मात्र मूळ पत्रिकेत विधान परिषदेचे आमदार दादाराव केचे यांचे नाव नसल्याने सोशल माध्यमांत टीका झाली. त्यानंतर दुसरी 'नवी' पत्रिका व्हायरल करण्यात आली. विशेष म्हणजे ही पत्रिका पत्रकारांना कार्यक्रम संपल्यानंतर सायंकाळीच देण्यात आली. पत्रिका बदलाचा हा प्रकार चर्चेचा विषय ठरला आहे.

बांगलादेशमधील अराजकता आणि सतत वाढणाऱ्या हिंसाचारामुळे तिथल्या हिंदू अल्पसंख्याक समुदायाचे जीवन संकटात सापडले आहे. गेल्या आठवड्यातील एका घटनेचे पडसाद भारतातही उमटले. बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यातील भालुका येथे घडलेली ही घटना. दीपूचंद्र दास नावाच्या हिंदू तरुणाची जमावाने क्रूरपणे हत्या केली. मृत्यूनंतर त्याचा मृतदेह झाडाला लटकवून जाळून टाकण्यात आला. या घडलेल्या घटनेनंतर भारतातील हिंदूमध्येही संतापाची लाट पसरली. मुंबई, दिल्लीसह देशातील अनेक भागांत बांगलादेश सरकारविरोधात निदर्शने झाली. पण, हे कधी थांबेल? या आशेवर बांगलादेशातील अल्पसंख्याक समाज जीव मुठीत घेऊन जगत आहे. अलीकडेच ढाका येथे शेख हसीना गटाचे कट्टर विरोधक 'इन्किलाब मंच'चे नेते शरीफ उस्मान हादी यांची अज्ञात लोकांनी हत्या केल्यानंतर भीषण हिंसाचार उसळला. या हिंसाचारात हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांना लक्ष्य केले गेले. लुटमार, त्यांच्या घरांची जाळपोळ आणि त्यांच्यावर सामूहिक अत्याचाराच्या घटनेमुळे हिंदू समाज भयभीत झाला. तसे पाहू गेल्यास बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांची जी आकडेवारी समोर आली, ती तिथल्या अल्पसंख्याक समाजाची चिंता वाढवणारी आहे. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत अल्पसंख्याक; विशेषतः हिंदू महिलांवरील बलात्काराचे ३४२ गुन्हे नोंदवले गेले. मैमनसिंगमधील दीपू दास याच्या घृणास्पद हत्येच्या घटनेनंतर भारत सरकारने गंभीर दखल घेत बांगलादेश सरकारला सुनावले. रणधीर जयस्वाल यांनी एका धक्कादायक आकडेवारीचा दाखला दिला. बांगलादेशातील अंतरिम सरकारच्या कार्यकाळात हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचाराच्या तब्बल तीन हजारांहून अधिक घटनांची नोंद झाली, असे जयस्वाल यांनी सांगितले. बांगलादेशात अल्पसंख्याकांविरुद्ध पसरलेली शत्रुत्वाची भावना आणि हिंसाचार हा केवळ चिंतेचा विषय नसून तो गंभीर आंतरराष्ट्रीय प्रश्न बनत चालला आहे, हे यावरून दिसून येते.बांगलादेशाच्या निर्मितीला भारत

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## हे कधी थांबेल?

कारणीभूत असल्याने गेल्या ५० वर्षांपासून भारताचे बांगलादेशसोबत मैत्रीचे संबंध होते. भारताला पूरक असलेली शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी बांगलादेशातील आंदोलकांना चीनकडून छुप्या पद्धतीने रसद पुरवली गेली होती, याचे पुरावे आता समोर येत आहेत. त्यामुळे, विद्यमान सरकारच्या पदराआडून चीनच्या कुरघोड्या सुरू आहेत, हे उघड आहे. भारताबद्दल सहानुभूती बाळगणारा मोहम्मद युनूस यांच्यासारखा नेता सध्या बांगलादेशचा हंगामी पंतप्रधान आहे, असा समज सुरुवातीला होता. पण, शेख हसीना सरकारचे पतन झाल्यापासूनच दोन्ही देशांतील संबंधात कटुता येणे सुरू झाले होते. पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम यशस्वीरीत्या राबवली. परंतु, शेजारी असलेल्या बांगलादेशाने भारतासोबत व्यापार युद्ध सुरू केले. भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर शुल्क लावण्याची घोषणा करून बांगलादेशानेच या व्यापार युद्धाची सुरुवात केली. भारताने त्याला प्रत्युत्तर म्हणून बांगलादेशात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर निर्यातशुल्क लावण्याची घोषणा केली. बांगलादेशाचे एवढ्यात समाधान झाले नाही म्हणून की काय, भारताशी झालेला १८० कोटींचा संरक्षण करार रद्द केला. त्यामुळे, बांगलादेशातील बहुसंख्याक मुस्लीम समाजाचाच नव्हे; तर सरकारचा भारतविरोधी द्वेष जगासमोर आला आहे.बांगलादेशच्या २०२२ च्या जनगणनेनुसार, बांगलादेशात हिंदू धर्मीय हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे धर्मीय आहेत. बांगलादेशातील ६४ पैकी ६१ जिल्ह्यांमध्ये हिंदू धर्मीय राहतात. बांगलादेशातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७.९५ टक्के लोक हिंदू आहेत. भारत आणि नेपाळनंतर बांगलादेशमध्ये जगातील तिसऱ्या क्रमांकाची हिंदू लोकसंख्या असल्याचे मानले जाते. बांगलादेशात पसरलेल्या अत्याचारांच्या सर्वाधिक बळी अल्पसंख्याक हिंदू महिला आहेत. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी बांगलादेशमध्ये सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. त्यापूर्वी, हिंदूसह धार्मिक अल्पसंख्याकांना जिवंत जाळण्यासारखे भयानक प्रकार वारंवार घडत आहेत, हा चिंतेचा विषय आहे. बांगलादेशातील ढासळलेली कायदा-सुव्यवस्था हेसुद्धा त्यातील एक कारण आहे. हसीना यांनी भारतात आश्रय घेतला असल्याचा राग म्हणून बांगलादेशातील हिंदूंना टार्गेट केले जात आहे का? या मुद्द्यावर मतांतरे असू शकतात; परंतु, हसीना यांच्याविरोधातील मुख्य राजकीय पक्ष बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे कार्यवाहक अध्यक्ष तारिक रहमान यांनी 'हिंदू-मुस्लीम करू नका, ते सगळे बांगलादेशचे नागरिक आहेत,' असे केलेले वक्तव्य आशादायक आहे. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे रहमान हे ज्येष्ठ पुत्र असून १७ वर्षांनी लंडनहून मायदेशी परतले आहेत. 'हा देश डोंगराळ आणि मैदानी भागातील लोकांचा, मुस्लीम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांचा आहे. आम्हाला एक सुरक्षित बांगलादेश निर्माण करायचा आहे; जिथे प्रत्येक महिला, पुरुष आणि मूल घराबाहेर पडू शकेल आणि सुरक्षितपणे परत येऊ शकेल', असे रहमान यांचे बांगलादेशी नागरिकांना संबोधून केलेले भाषण चर्चेचा विषय ठरला आहे. बांगलादेशींच्या मनात भारताविरोधातील आणि हिंदू धर्मीयाविरोधातील शत्रुत्वाचा वाढलेला भाव ते कितीपत कमी करतात, हे येणाऱ्या काळात दिसून येईल. बांगलादेशातील हिंसाचाराच्या घटनांना केवळ माध्यमाची अतिशयोक्ती किंवा राजकीय हिंसा म्हणून दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही, हे बांगलादेशाला पुन्हा ठणकाऊन सांगण्याची हीच वेळ आहे.

# बंडोबांची भीती, अशी ही पळवापळवी!

**मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांचा रणसंग्राम सध्या धुमसतो आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्षआणि नेत्यांकडून युत्या-आघाड्या आणि जागावाटपांचे प्रश्न अंतिम टप्प्यात आले आहेत. मात्र या रमीच्या डावात पहिल्यांदा शो करायला कुणी तयार नसल्याचे दिसत आहे. काहीनी अजून चर्चा सुरू आहेत, वाटाघाटी होत आहेत असा माहोल ठेवला आहे तर काहीजणांकडून मुले पळवणा-या टोळीचे कारण सांगून गुप्तता पाळली जात आहे. या मागचे खरे कारण मात्र 'बंडोबांची भिती' आणि 'अशी ही पळापळ किंवा पळवापळवी' हेच आहे. सगळ्याच पक्षांमध्ये इच्छुकांची गर्दी आहे. जागावाटपांच्या गोंधळात अनेकांचा भ्रमनिरास होत आहे. मग बंडाची उर्मी, दुसरीकडे जागा शोधण्याची धावपळ केली जात आहे. काही सत्ताधारी पक्षांकडून विरोधकांच्या अश्या इच्छुकांना गळाला लावले जात आहे.**

### नेत्यांच्या आप्तेष्टाच्या उमेदवारीचे पेव

या सा-या अबकड महानगरांचा कारभार गेल्या पाच ते तीन वर्षापासून 'रामभरोसे' झाला होता. आता त्याला स्थानिक जनतेच्या सहभागाची ऊब देण्याचा लोकशाही साज चढविण्यासाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. स्थानिक जनतेला गेली काही वर्ष आपल्या नागरी प्रश्नांसाठी कुणाला दाद मागायची हा प्रश्न होता. तसे पाहिले तर सध्या प्रत्येक गावचा गाडा हा त्या त्या गावच्या पै पुढारी आणि त्यांचे बगलबच्चे असलेल्या गल्ली, मोहल्ला, आळी- लेन प्रभागातील भाई-भाऊ, नाना, दादा, तात्या, ताई-माई-अक्का यांच्या हाती असतो. त्यांच्यात देखील सोयीची भांडणे आणि एकोपा असतो. पण सामान्य माणसाला वेळप्रसंगी त्यांच्याच आधाराने आपल्या आडी-अडचणी घेवून जगावे लागते. यावेळच्या निवडणूकांची गंमत म्हणजे सगळ्याच पक्षांतल्या नेत्यांच्या मुलाबाळांच्या उमेदवारीचे पेव फुटले आहेत. त्यामुळे वर्षानुवर्ष कार्यकर्ता राहिलेल्यांना आणि त्यांच्या नातलग मुलाबाळांना यामध्ये फारसा 'चान्स' राहिला नाही. त्यांनी फक्त. . . 'आगे बढो हम तुम्हारे पिछे (कायमचे) है' म्हणायचे! ही लागण सगळ्याच पक्षात आहे. गेल्या चार पाच वर्षापासून सर्वात मोठ्या पक्षात इनकमिंग मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे मुळच्या पक्षाच्या निष्ठावंताचा कुणीच वाली राहिलेला नाही. राजकीय विचारसरणी? वगैरे सध्या काहीच नसल्याने (म्हणजे काय रे भाऊ?) कुणीही कुठेही उड्या मारून झेंडा बदलायला मोकळा आहे. या गडबडीत अनेकांच्या घरात बाप-आई मुलगा–मुलगी काका-मामा वेगवेगळ्या पक्षांत गेल्याचे पहायला मिळत आहे. जनसेवेची तळमळ असलेल्या या मंडळींना फक्त एक संधी,एक तिकीट हवे आहे! ते कोणत्याही पक्षाचे का असेना? त्यासाठी सर्वाधिक गर्दी महायुतीच्या पक्षांमध्ये आहे. काहिशी तशीच स्थिती महाआघाडीतही आहे. पण महायुतीच्या उमेदवारांकडे 'साधनशुचिता'? (सध्या खुंटीला टांगली) असली तरी निवडणूकांची 'साधनसामुग्री' मुबलक प्रमाणात उपलब्ध केली जात आहे, असे काही इच्छुकांनी खाजगीत सांगितले!

### लोकांना मतदानाच्या दिवशी काय हवे?

महाआघाडीच्या पक्षांकडे देखील काही प्रमाणात हे सारे आहे पण तेथे गाजावाजा नाही '. . . मामला हळूहळू बोंबला' असा तिथला 'माहौल' आहे म्हणे! 'निवडून येण्याची शक्यता' हा सध्या सर्वच उमेदवार आणि पक्षांसाठी परवलीचा शब्द झाला आहे. त्यासाठी काय निकष असतात? असा सहजप्रश्न पडतो म्हणून काही इच्छुकांना विचारले तर 'नांव सांगू नका म्हणत ते म्हणाले 'सर्वात महत्वाचे आहे लोकप्रियता, त्यानंतर क्षमता त्यात स्थानिक राजकीय सामाजिक आणि आर्थिक वगैरे सगळे आले. त्यानंतर ज्या पक्षासाठी उमेदवारी हवी तेथील नेत्यांशी घसट किंवा/ आणि त्याशिवाय वजन टाकण्याची तयारी हवी! खर्चासह व्हिजन आणि लोकांच्या प्रश्नांची जाण हवी! जसे की कोणत्या गल्लीतल्या लोकांना मतदानाच्या दिवशी काय हवे? किती हवे? त्यावर खर्चासाठी काय करावे?इत्यादी. काही जणांकडे तर अशी गल्लगल्ली स्वत:ची पॉकेट तयार आहेत म्हणे! म्हणजे वरच्या आळीतले २००, खालच्या आळीत ४००, एका इमारतीत आपली शंभर हक्काची आणि ५० खर्चाची आहेत,इत्यादी हिशेब तोंडपाठ असायला हवेत!

### मतदारांचा कुणी विचार करणार?

तर अश्या या ख-या खु-या लोकोत्सवाच्या तयारीसाठी यंदा आणखी एक मजेशीर गोष्ट आहे. स्थानिकांच्या मताने म्हणे युती किंवा आघाडीचे निर्णय घेतले जात आहेत. दोन भावांची वीस वर्षांनी पुन्हा एकत्रित लढायची तयारी मुंबईत झाली आहे, याचे कारण पुन्हा फडण 'वीस' आहेत म्हणे! म्हणजे चांगल्या आणि वाईट अर्थानेही! अंधभक्तांना वाटते आहे की भावांच्या एकत्रीकरणा मागे 'देवाची लींला' आहे! तर भाजप विरोधकांना वाटते आहे की बाळासाहेबांच्या नंतर ठाकरेब्रॅण्ड ला जिवंत करण्यामागे 'एका' राजकारणाचा अंत करण्याचा प्रयत्न आहे. त्याशिवाय अन्य अनेक शहरात ठाकरे+ठाकरे +पवार आहेत, त्यांच्याकडून 'हम साथ साथ है' ची ग्वाही देण्यात येत आहे. तर काही



शहरात 'पवार अॅण्ड पवार' चा नवा राजकारणाचा अध्याय लिहिला जात आहे! हे झाले कौंटुबिक राजघराण्याचे राजकारण याशिवाय महाआघाडीचे तीन पक्ष काही ठिकाणी एकत्र लढणार आहेतच! आणि महायुतीचे पक्ष सुध्दा काही ठिकाणी एकत्र आहेत त्यात पुन्हा 'मोठा भाऊ छोटा भाऊ' अश्या व्याख्या आहेत! तरीही 'भय इथले संपत नाही' अशी स्थिती आहे. कारण एकत्र आलो म्हणजे कुणाच्या चिन्हावर लढायचे? असा संभ्रम काहींना आहे. गंमत म्हणजे त्याच चिन्हाच्या लढाईत त्यांच्यातील वाद सर्वोच्च न्यायालयात अद्याप सुटायचा बाकीच आहे! पण ते निवडणूकीत एकत्र आहेत?! एकंदर मतदारांच्या मेंदूचा काही कुणीच विचार करायला तयार नाही!

### मतदानाचा दिवस लॉटरीचे तिकीट काढण्यासारखा?

मतदार याद्यांचा गोंधळ असाच गमतीचा विषय आहे, कुणाच्या मयत झालेल्यांना केवळ मतदानाच्या दिवशी यावे लागत आहे, कारण त्यांचे मतदान होताना दिसत आहे! तर कुणाच्या गैरहजेरीतही त्यांचे मतदानांचे कर्तव्य आपोआप पार पाडले गेल्याचे दिसत आहे! कुणाची नावे दुबार तिबार चार पाच ठिकाणच्या प्रभागात दिसत आहेत, त्यांच्यासाठी मतदानाचा दिवस लॉटरीचे तिकीट काढण्यासारखा आहे! घरोघरी मतांचा दर ठरवला जात आहे, कोण काय देणार? यांची माहिती घेवून त्यासाठी मांडवाली केली जात आहे. लोकशाहीच्या उत्सवाला लक्ष्मीच्या दर्शनाची आस आहे! सगळ्यांना माहिती आहे की, ही 'आस नव्हे आपणच लोकशाहीच्या म्हणजे स्वत:च्या गळ्याला लावून घेतलेला फास आहे'. पण अशी संधी पुन्हा-पुन्हा येत नसते! हे कारण देखील खास आहे! काही ठिकाणी म्हणे मतदानाच्या दिवशी बरेच पाहुणे येवू लागले आहेत. आदल्या दिवशी मुक्कामी येणारे हे पर राज्यातील, जिल्हयातील पावणे आल्यासारखे मतदान वगैरे नीट करून जात आहेत! याच पाहुण्यांचा 'पाहुणचार' आता 'वोटचोरी' शोधणारांकडून केला जाणार आहे म्हणे त्यासाठी त्यांच्याकडून तेल-सोटे आणि रश्शी- दो-या जमवल्या जात आहेत!

### लोकशाहीचा राजाचे राज्य येणार ?

गंमत म्हणजे राजकीय पक्षांकडून जागावाटप तिकीट वाटप युती-भिती-प्रिती-माती असे काही बोलले जावू लागले असले तरी या निवडणूका ज्यांच्यासाठी होणार आहेत (म्हणे?) त्यांच्या सध्याच्या स्थितीकडे कुणाचेच लक्ष नाही. शहरांना सुज आली आहे,कच-याचे ढिग झाले आहेत, रस्त्यांच्या चाळणी वाहतुकीच्या कोंडीने डोकी सुन्न झाली आहेत. पिण्याचे पाणी नाही, आरोग्य शिक्षण सुविधा नाहीत, रोजगाराच्या संधी नाहीत, लोकांना खेळायला मैदाने नाहीत, चालायला पदपथ नाहीत, भाजी मंडया स्मशानभुमी समाजमंदीरे शौचालयांच्या सुविधा नाहीत. करांच्या ओझ्याने नागरिक झुकले, कर्जांच्या ओझ्याने स्थानिक स्वराज्य संस्था वाकल्या आहेत. योजनांचा बोजवारा, भ्रष्टाचाराच्या ढिगा-यांच्या सोबतीला आता पर्यावरणाच्या समस्या आहेत. तरीही राजकीय पक्षांना बहुमताच्या सत्तेची ओढ आहे त्यासाठी सारी चढाओढ आहे.

२९ पैकी वीस ठिकाणी फडणवीस जिंकणार आहेत. पाच ठिकाणी ठाकरें आणि कंपनी येणार आहे अन्य ठिकाणी स्थानिक नेत्यांचा करिश्मा दिसणार आहे. पण त्यात लोकशाहीचा राजा मतदार त्यांचे राज्य येणार आहे की नाही? याचे भाकीत कुणालाच करता येत नाही! हीच या लोकशाहीची शोकांतिका आहे! तुर्तास इतकेच!

**किशोर आपटे**

# तारिक रेहमान:एक आशेचा किरण !

बांगलादेशचे माजी राष्ट्रपती झिया उर रेहमान आणि माजी पंतप्रधान बेगम खलेदा झिया यांचे सुपुत्र तारिक रेहमान हे लंडन मधील प्रदीर्घ वास्तव्यानंतर नुकतेच मायदेशी परतले आहेत.२००८ साली मेडिकल ट्रिटमेंटसाठी, तारिक रेहमान हे लंडनला गेले होते.त्यानंतर १७ वर्षांनी ते बांगलादेशात परतले आहेत.२००४ साली अवामी लीगच्या ढाका येथील एका रॅलीवर ग्रेनेड हल्ला करण्यात आला होता.त्या हल्ल्यात २४ जणांचा मृत्यू झाला होता.त्या शिवाय अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना वाजेद यांच्यासह अवामी लीगचे अनेक कार्यकर्ते त्या हल्ल्यात जखमी झाले होते.त्या हल्ल्याच्या कटाचे प्रमुख सूत्रधार तारिक रेहमान हे असल्याचे चौकशीअंती आढळून आले होते.त्यानंतर तारिक रेहमान यांच्यावर खटला दाखल करण्यात आला होता.२००७ साली न्यायालयाने तारिक रेहमान यांना दोषी ठरवले आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.तारिक रेहमान यांच्यावर भ्रष्टाचार, पैशांची अफरातफर इत्यादी प्रकरणी ८४ गुन्हे दाखल करण्यात आले होते.२००८ साली मेडिकल ट्रिटमेंटसाठी त्यांना लंडनला जाण्याची अनुमती देण्यात आली मात्र त्या बदल्यात त्यांनी बांगलादेश मधील राजकारणापासून दूर रहावे,असे त्यांच्याकडून वदवून घेण्यात आले.

तारिक रेहमान यांनी कायद्याची पदवी प्राप्त केल्यानंतर १९९० च्या आसपास राजकारणात प्रवेश केला. आई बेगम खलेदा झिया यांना ते मदत करू लागले.त्यावेळी एच.एम.इर्शाद हे बांगलादेशचे राष्ट्रपती होते.त्यांच्या जुलूमी राजवटी विरोधात बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या नेत्या बेगम खलेदा झिया आणि अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना वाजेद यांनी मोठे आंदोलन उभे केले होते.त्यानंतरच्या काळात वरील दोन्ही बेगमा एकमेकांच्या कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी बनल्या, परंतु इर्शाद यांच्या राजवटी विरोधात त्या दोघी एकत्र लढल्या होत्या.ही गोष्ट अनेकांना माहीत नसेल.इर्शाद यांनी दोन बेगमांनी चालवलेल्या प्रखर आंदोलनासमोर नमते घेऊन आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर १९९१ मध्ये बांगलादेशात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत बेगम खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचा विजय झाला आणि बेगम खलेदा झिया या बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या. त्यानंतर २०२४ पर्यंत बेगम खलेदा झिया आणि शेख हसीना वाजेद या आलटून पालटून बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या.

१९९६ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग हा पक्ष बांगलादेशमध्ये सत्तेवर आला.या दरम्यान तारिक रेहमान यांनी पक्षबांधणीवर विशेष लक्ष पुरविले.त्यांनी पक्षाने दिलेली उमेदवारी नाकारून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मेहनत घेतली.२००१ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत बेगम खालेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला विजय मिळाला आणि बेगम खलेदा झिया या पुन्हा एकदा बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या.खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये तारिक रेहमान यांनी सहभागी व्हावे म्हणून त्यांना पक्षातर्फे आग्रह करण्यात आला, परंतु त्यांनी मंत्रीपद स्विकारण्यास नकार दिला.

२००८ साली लंडनला गेल्यानंतर त्यांची इच्छा असूनही ते मायदेशी परतू शकले नाहीत.कारण त्याचवर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत अवामी लीग या पक्षाचा विजय झाला आणि शेख हसीना वाजेद या पंतप्रधान बनल्या.तारिक रेहमान यांच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले



असल्याने बांगलादेशमध्ये परतल्यास, अटक करण्यात येईल या भीतीने, तारिक रेहमान यांनी मायदेशी परतण्याचा धोका पत्करला नाही.२००८ मध्ये सत्तेवर आलेल्या शेख हसीना वाजेद या नंतर ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रदिर्घ काळ सत्तेवर राहिल्या.या दरम्यान २०१३,२०१८ आणि २०२४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुका या केवळ फार्स ठरल्या.कारण त्यांवर प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी आणि इतर पक्षांनी बहिष्कार घातल्याने अवामी लीगने त्या निवडणुका एकतर्फी जिंकल्या.

बांगलादेश मधील विद्यार्थ्यांनी जुलै २०२४ मध्ये आरक्षण विरोधात प्रखर आंदोलन पुकारल्यानंतर ते आंदोलन चिरडण्यासाठी शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पाशवी बळाचा वापर केला. त्यामध्ये अनेक आंदोलक मारले गेले.आंदोलन हाताबाहेर जात असल्याचे शेख हसीना यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी बांगलादेशचा त्याग केला आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या.शेख हसीना यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर बांगलादेशची सूत्रे नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांच्याकडे सोपविण्यात आली.मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेख हसीना यांच्या अवामी लीग या पक्षावर पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांत भाग घेण्यास बंदी घातली आहे.काही दिवसांपूर्वी बांगलादेश मधील न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे.विद्यार्थी आंदोलन पाशवी बळाचा वापर करून चिरडल्याप्रकरणी शेख हसीना यांना दोषी ठरवून, न्यायालयाने त्यांना वरील शिक्षा सुनावली आहे.

मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तारिक रेहमान यांच्या विरोधातील सर्व खटले मध्यंतरी मागे घेतल्यानंतर त्यांचा बांगलादेशमध्ये परतण्याचा मार्ग सुकर झाला.नुकतेच ते मायदेशी परतले आणि त्यांचे मायभूमीत जे जंगी स्वागत झाले.ते पाहता पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांत, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचा विजय झाला तर तारिक रेहमान हेच बांगलादेशचे पुढील पंतप्रधान असतील याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.तारिक रेहमान यांनी मायदेशी परतल्यानंतर आपल्या समर्थकांसमोर जे भाषण केले त्यामध्ये,ते म्हणाले की हा देश (बांगलादेश) मुस्लीम, हिंदू , बौद्ध आणि ख्रिश्चन या सर्वांचा आहे.याचा अर्थ बांगलादेशात सर्वांना समान वागणूक दिली जाईल.तारिक रेहमान यांचे हे वक्तव्य अतिशय महत्त्वाचे आहे.कारण बांगलादेशातील मोहंमद युनूस यांच्या राजवटीत हिंदू समाजाविरोधातील हिंसाचार प्रचंड प्रमाणात वाढला आहे.तारिक रेहमान यांनी तो हिंसाचार रोखल्यास बांगलादेशमध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकेल.अर्थात तारिक रेहमान यांची आई बेगम खलेदा झिया या जेंव्हा जेंव्हा बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या. तेंव्हा बांगलादेश मधील हिंदू समाज हा धार्मिक हिंसाचाराचा बळी ठरला होता.थोडक्यात,तारिक रेहमान हे ज्या पक्षाचे (बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी ) कार्याध्यक्ष आहेत.त्या पक्षाचा इतिहास हिंदू समाजाला अन्यायकारक वागणूक देण्यासाठी प्रसिद्ध आहे. लंडनमध्ये इतकी वर्षे राहिल्याने त्यांच्या विचारसरणीत आमुलाग्र बदल झाला असेल तर तो स्वागतार्ह आहे.

पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात बांगलादेशमध्ये होणारी सार्वत्रिक निवडणूक तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी या पक्षासाठी सोपी असणार नाही.शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग हा पक्ष निवडणूक रिंगणात नसला तरी कट्टरपंथी जमाते इस्लामी या पक्षाकडून बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला कडवे आव्हान मिळण्याची शक्यता आहे.तसेच आंदोलनकारी विद्यार्थी नेत्यांनी स्थापन केलेल्या नॅशनल सिटिझन्स पार्टीकडूनही तारिक रेहमान यांच्या पक्षाला आव्हान मिळण्याची शक्यता आहे.अशा परिस्थीतीत तारिक रेहमान हे पक्षाला निवडणुकीत विजय मिळवून देण्यात यशस्वी होतील का,ते पहावे लागेल .बांगलादेशमधील जनतेच्या दृष्टिकोनातून तारिक रेहमान हे आशेचा किरण आहेत.ते बांगलादेशचे पुढील पंतप्रधान बनल्यास भारतासाठीही ते फायदेशीर ठरेल.

**अभय गोखले**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आंतरराज्यीय अवैध गुटखा तस्करीवर मोठी कारवाई

## ६५.९८ लाखांचा बंदीस्त पानमसाला व तंबाखू जप्त, दोन आरोपी ताब्यात

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यात वाढत्या अवैध गुटखा तस्करीला आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी मोठी आणि निर्णायक कारवाई करत आंतरराज्यीय गुटखा तस्करी उघडकीस आणली आहे. या कारवाईत तेलंगणा राज्यातून महाराष्ट्रात अवैधरित्या वाहतूक होत असलेला सुमारे ६५ लाख ९८ हजार रुपयांचा बंदीस्त सुगंधित पानमसाला व तंबाखू जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिता यांच्या आदेशानुसार अवैध गुटखा कारवाईसाठी विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, पांढरकवडा-वणी उपविभाग पथकाने गुप्त खबऱ्यांना सतर्क केले होते.दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे तेलंगणा राज्यातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ मार्गे पांढरकवडाकडे येणाऱ्या आयशर वाहन (क्रमांक UP-94-AT-2305) वर ढोकी गावाजवळ सापळा रचण्यात आला. तपासणीदरम्यान सदर वाहनातून महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला सुगंधित पानमसाला व तंबाखू मोठ्या प्रमाणात आढळून आला. वाहन चालक मोहन सियाराम यादव (वय २६, रा. पिचोड, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश) व क्लिनर बुध्दा बाबुसिंग परीयार (वय ३५, रा. अमोला, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेण्यात आले. वाहनातून सागर पानमसाला व SR-1 Sended Tobacco चे एकूण १८० पोते, अंदाजे ४५,९२,००० रुपये किमतीचे, एक मोबाईल (६,०००) व आयशर वाहन (२०,००,०००) असा एकूण ६५,९८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिता व अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्था. गु. शा. यवतमाळ) यांच्या नेतृत्वाखाली सपोनि दत्ता पेंडकर, पोउपनि धनराज हाके, पोउपनि गजानन राजामलु, पोहवा सुनील खंडागळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, सुधीर पिदुरकर, पोशि सलमान शेख व चापोहवा नरेश राऊत यांनी पार पाडली.

# "तळागाळातील विद्यार्थ्यांना व्यासपीठ देणारा कला, वाणिज्य महाविद्यालयाचा संस्कार केंद्राचा उपक्रम"- प्रचार्य डॉ. बी.एम. सावरकर





राळेगाव - माजी विद्यार्थी संघटना व राष्ट्रीय सेवा योजना कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राळेगाव तालुक्यात चालविल्या जाणाऱ्या विविध संस्कार केंद्रास प्रत्येक शनिवारी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शैक्षणिक भेट देण्यात येते. राळेगाव येथिल गवारीपुरा समाज मंदिरात चालणारे संस्कार केंद्र हे केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे ठिकाण नाही, तर समाजाशी महाविद्यालयाला जोडणारा एक सेतू आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भेटीत त्यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. या भेटीत संस्कार केंद्रात लहान मुलांनी सादर केलेल्या नाटिकेतून त्यांच्या कल्पकतेचा आणि आत्मविश्वासाचा प्रत्यय आला. सहावीतील कु पूर्वी येंगडे हिने केलेले संचालन आणि दुसरीतील मानवी डायरे हिने केलेले आभार प्रदर्शन हे दाखवते की, योग्य संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही किती सुंदरपणे आपली क्षमता दाखवू शकतात. राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकार व माजी विद्यार्थी संघटना अध्यक्ष विनोद दादा देवतळे व सुशील दांदडे यांच्या मार्गदर्शनात माजी विद्यार्थी अजय गजबे यांची सेवाभावी वृत्ती या केंद्राला आधार देते. ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत तर करतातच, पण त्यांच्या जीवनमूल्यांना दिशा देतात. याप्रसंगी माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल दौलतकर यांनी दिलेला ग्रीन मॅट हा छोटा पण महत्त्वपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी उपयुक्त ठरला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकार यांनी व्यक्त केलेला मानस "संस्कार केंद्राची चळवळ संपूर्ण तालुक्यात प्रसारित करायची" हा समाजपरिवर्तनाचा दीपस्तंभ आहे. या उपक्रमामुळे महाविद्यालय समाजाशी जोडले जाते, विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळते आणि ग्रामीण भागात शिक्षणाची नवी ऊर्जा निर्माण होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुरेशजी फुलकर व रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३.६० लाखांचा मुद्देमाल जप्त ; घरफोडीचे सहा गुन्हे उघड

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - शहरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी मोठी कारवाई करत ०१ आरोपी व ०२ विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेऊन ३,५९,८८४ रुपये किमतीचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल व दुचाकी जप्त केली आहे. या कारवाईत शहरातील व परिसरातील एकूण सहा घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवतमाळ शहरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती प्राप्त झाली की, प्रितेश ऊर्फ दादु संजय गेडाम (वय १९, रा. अंबिका नगर, सुराणा ले-आऊट, यवतमाळ) व त्याच्यासोबत दोन विधीसंघर्षग्रस्त बालक हे घरफोडीतील चोरीचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल विक्रीसाठी सोनार लाईन परिसरात फिरत आहेत. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने शाम टॉकीज परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी पोलीस स्टेशन लोहारा हद्दीतील शुभम कॉलनी, राधाकृष्ण नगरी तसेच पोलीस स्टेशन अवधुतवाडी हद्दीतील दांडेकर ले-आऊट, स्वप्नील नगर व सुभाष नगर (बडगाव) येथे घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून २५.१०० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत २,५१,००० रुपये), २८०.४०० ग्रॅम चांदीचे दागिने (किंमत ५८,८८४ रुपये) तसेच गुन्ह्यात वापरलेली सुझुकी ॲक्सेस दुचाकी (क्र. MH-29 BY-9301, किंमत ५०,००० रुपये) असा एकूण ३,५९,८८४ रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. या कारवाईत पोलीस स्टेशन लोहारा येथील ३ व पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथील ३ असे एकूण ६ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकांना पोलीस स्टेशन लोहारा अप.क्र. ४५१/२०२५, कलम ३०५ (a), ३३१ (३), ३३१ (४) भा.न्या.सं. अन्वये ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी लोहारा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनिष गावंडे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# वेचक

## प्रभाग क्रमांक १४ मधील विजयी नगरसेवकांचा बसपातर्फे भव्य सत्कार



यवतमाळ - स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून भरघोस मतांनी विजय मिळविणारे नवनिर्वाचित नगरसेवक विपुल पदमजी खोब्रागडे यांचा बहुजन समाज पार्टीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला. या सत्कारप्रसंगी बहुजन समाज पार्टीच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाभिमुख कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बहुजन समाजाच्या हितासाठी निष्ठेने कार्य करताना पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि जनतेशी सातत्याने संवाद ठेवण्याचा सल्ला यावेळी मान्यवरांनी दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष गुंणवंत गणवीर उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तिरंकर, माजी नगरसेवक गणेश धवणे, माजी नगरसेविका पुष्पाताई राऊत, सुनील पुनवटकर, ॲड. प्रशांत किर्दक, प्रकाश राऊत, संजय तागडे, महेंद्र ढेपे, लक्ष्मण पाटील, शिवा राऊत, राजेंद्र देशमुख यांच्यासह पक्षाचे अनेक ज्येष्ठ व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना नगरसेवक विपुल खोब्रागडे यांनी जनतेने दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत, प्रभागातील मूलभूत सुविधा, सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. हा सत्कार कार्यक्रम पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचे व एकजुटीचे दर्शन घडविणारा ठरला.

## गावठी कट्टा बाळगणारा तरुण जेरबंद वसंतनगर पोलिसांची धडक कारवाई



पुसद - अवैधरित्या गावठी बनावटीचा देशी कट्टा (रिव्हॉल्वर) बाळगणाऱ्या एका तरुणास वसंतनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने रंगेहाथ पकडून अटक केली आहे. ही कारवाई मंगळवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली.वसंतनगर पोलीस ठाण्याच्या अधिनस्त पथकास गोपनीय माहिती मिळाली होती की, गायमुख नगर ते हेलीपॅड मैदान परिसरात एक इसम देशी कट्ट्यासह संशयास्पद अवस्थेत बसून आहे. सदर खात्रीशीर माहितीच्या आधारे पंचासह छापा टाकण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक सुगत पुंडगे व पथकाने सरकारी वाहनाने घटनास्थळी धाव घेतली. हेलीपॅड मैदानाजवळ लपत-छपत जाऊन पाहणी केली असता, एक इसम मैदानात बसलेला आढळून आला. पंचांच्या उपस्थितीत त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव हजरत बिलाल शेख मुसा (वय २१ वर्षे), रा. मधुकरनगर, ता. पुसद, जि. यवतमाळ असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे गावठी बनावटीचा देशी कट्टा (रिव्हॉल्वर) व एक जिवंत काडतूस मिळून आले. सदर इसमाकडे अग्निशस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध वसंतनगर पोलीस ठाणे, पुसद येथे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणे या गुन्ह्याखाली गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंतामणि व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात (यवतमाळ) यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी.जे. (पुसद) व पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

## पारध येथिल शेतातील विहिरीत बिबट्या आढळून आला




पुसद - २७ डिसेंबर रोजी तालुक्यातील पारध शिवारामधील एका शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची घटना सकाळी उघडकीस आली. अचानक बिबट्या दिसुन आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरणही पसरले आहे. मौजा पारध येथील अल्पभूधारक शेतकरी नारायण राठोड यांच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची माहिती पुसद वनविभागाच्या बचाव पथकाला मिळताच तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बिबट्याचे नियोजनबद्ध पद्धतीने रेस्क्यू करण्यात आले.

# ऑनलाइन बनावट औषध विक्रीचा पर्दाफाश

## फ्लिपकार्टसह दिग्रसच्या औषध विक्रेत्यावर गुन्हा

जनमाध्यम प्रतिनिधी




दिग्रस - औषधाच्या नावाखाली मानवी आरोग्यास घातक ठरणारी बनावट औषधे ऑनलाइन विक्री करून सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा अन्न व औषध प्रशासनाने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दिग्रस येथील औषध विक्रेता, सुरतचा पुरवठादार आणि नामांकित ई-कॉमर्स कंपनी 'फ्लिपकार्ट' यांच्याविरुद्ध दिग्रस पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे औषध क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

श्री महावीर मेडिकलचे नयन नवीनचंद गडडा रा. दिग्रस, फ्लिपकार्ट इंटरनेट प्रा. लि. (बेंगळुरू, कर्नाटक आणि सूरत येथील अज्ञात पुरवठादार असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अन्न व औषध प्रशासन, यवतमाळचे अधिकारी मनिष विश्वासराव गोतमारे यांनी ३ मे २०२५ रोजी दिग्रस येथील महावीर मेडिकल अँड जनरल स्टोअर्समध्ये अचानक तपासणी केली होती. या तपासणी दरम्यान औषध साठ्याबाबत संशय आल्याने त्यांनी मालक नयन नवीनचंद गडडा यांच्याकडे औषध खरेदीच्या बिलांची मागणी केली. त्यावेळी ही औषधे अधिकृत वितरकाकडून न घेता ऑनलाइन 'फ्लिपकार्ट' ॲपद्वारे खरेदी केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. प्रशासनाने संशयास्पद औषधांचे नमुने नागपूर येथील शासकीय प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठवले होते. या औषधांच्या विश्लेषणाचा अहवाल नुकताच प्राप्त झाला असून, त्यात ही औषधे 'बनावट' असल्याचे सिद्ध झाले आहे. कोणत्याही वैध परवान्याशिवाय आणि गुणवत्तेची खात्री न करता बनावट औषधे विकून जनतेची फसवणूक केल्याचा ठपका ठेवत हा गुन्हा नोंदवण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास दिग्रस पोलीस करत असून, यामध्ये आणखी मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तीळ उत्पादक शेतक-यांची नुकसानभरपाईसाठी मुख्यमंत्र्यांकडे धाव

## राणी अमरावतीतील 150 शेतकरी वंचित ; तहसील कार्यालयासमोर करणार उपोषण

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव - तालुक्यातील राणी - अमरावती येथील सुमारे दीडशेहून अधिक शेतकरी उन्हाळी तीळ पिकाच्या नुकसानभरपाईपासून प्रशासकीय दिरंगाईमुळे वंचित राहिले आहेत. बाभूळगाव तालुक्यात एप्रिल-मे 2025 मध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीने उन्हाळी पिकांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. पंचनामे होऊनही तत्कालीन तलाठी आणि कृषी सहाय्यकांच्या निष्काळजीपणामुळे एकही शेतकरी मदतीच्या यादीत समाविष्ट होऊ शकला नाही. या अन्यायाविरोधात संतप्त शेतकऱ्यांनी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दि. २४ रोजी निवेदन पाठवून नुकसानभरपाई आणि दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे, अन्यथा उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी नायब तहसीलदार सय्यद यामीन यांनी निवेदन स्वीकारले.

बाभूळगाव तालुक्यातील बहुतांश गावांना शासनाची मदत मिळाली आहे. अगदी राणी - अमरावती लगतच्या गावांमध्येही नुकसानभरपाई जमा झाली आहे. मात्र, राणी - अमरावती येथील शेतकऱ्यांवर अन्याय का, असा सवाल निवेदनातून विचारण्यात आला आहे. जानेवारी 2025 मध्ये या गावातील सुमारे 150 शेतकऱ्यांनी उन्हाळी तिळाची लागवड केली होती. पीक जोमदार असतानाच एप्रिल-मे महिन्यात नैसर्गिक आपत्ती ओढवली. मात्र महसूल व कृषी विभागाने घटनास्थळी उशिरा भेट देऊन पंचनामे केले. याबाबत शेतकऱ्यांनी तत्कालीन पटवारी श्री. कापसे आणि कृषी सहाय्यक श्री. पाटील यांच्याकडे रीतसर तक्रारीही दिल्या होत्या. परंतु, संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करत अहवाल वेळवर तहसील कार्यालयात सादर केला नाही. या हलगर्जीपणाचा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसला असून, शासनाच्या मदतनिधीपासून ते पूर्णपणे वंचित राहिले आहेत. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शासकीय आदेश आणि अंमलबजावणी

शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन धोरणानुसार, नैसर्गिक आपत्तीत 33 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यास शेतकरी मदतीस पात्र ठरतात. पंचनामे वेळेत सादर करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी असते. मात्र येथे कर्मचाऱ्यांनी उशिरा पाहणी केली. तो पर्यंत राहिलेले पिक हातचे जावू नये म्हणून शेतकऱ्यांनी पिकाची कापणी केली होती. या सर्व प्रकारात स्पष्टपणे कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा दिसून येत असल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत.

शेतकऱ्यांचा निर्वाणीचा इशारा : 'वारंवार विनंत्या करूनही न्याय मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी अखेर मुख्यमंत्र्यांकडे दाद मागितली आहे. शासनाने याची तत्काळ दखल न घेतल्यास आम्ही कुठल्याही क्षणी बाभूळगाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करू,' असा इशारा कलीमोद्दीन काझी, आरिफ खान, सोनाली दोडके, श्रीकृष्ण परोपटे, इमरान काझी, विजय हाडेकर, रामभाऊ उमरतकर, ज्ञानेश्वर कुंडे, शुभम तीखे, सतीश मेंढे आदीसह दीडशे शेतकऱ्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,पालकमंत्री संजय राठोड, आमदार डॉ. अशोक उईके, जिल्हाधिकारी विकास मीना आणि तहसीलदार मीरा पागोरे यांनीही देण्यात आल्या आहेत.

# आदिवासी शेतक-यांच्या हक्कावर जेसीबीचा घाव !

## मंत्रिपदाच्या बळावर जमीन बळकावल्याचा आरोप, पोलिसांची बघ्याची भूमिका उघड

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ – ज्या आदिवासी समाजाच्या मतांवर निवडून येत त्यांच्या विकासाची शपथ घेतली, त्याच समाजातील एका गरीब शेतकऱ्याच्या संसारावर थेट जेसीबी चालविण्यात आल्याचा संतापजनक प्रकार यवतमाळ जिल्ह्यात उघडकीस आला आहे. राळेगाव तालुक्यातील देवधरी येथील आदिवासी शेतकरी भुरबा कोवे यांच्या हक्काच्या शेतजमिनीवर आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी पद व सत्तेचा गैरवापर करून जबरदस्तीने ताबा मिळवल्याचा गंभीर आरोप ॲड. सीमा तेलंगे यांनी पत्रकार परिषदेत केला.

ॲड. सीमा तेलंगे यांनी सांगितले की, भुरबा कोवे यांच्या शेतात कापसाचे उभे पीक असताना मंत्री उईके यांच्या आदेशावरून काही भाडोत्री गुंड व कार्यकर्त्यांनी जेसीबीच्या सहाय्याने संपूर्ण पीक उद्ध्वस्त केले. शेतकऱ्याने विरोध केल्यावर त्याला व त्याच्या कुटुंबीयांना अमानुष मारहाण करण्यात आली. हा प्रकार केवळ जमिनीच्या वादापुरता मर्यादित नसून, सत्तेच्या बळावर गरीब आदिवासी शेतकऱ्याला चिरडण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, तलाठ्याशी संगनमत करून संबंधित जमिनीची कागदपत्रे फिरवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. वादग्रस्त जमिनीवर घाईघाईने 'बिरसा सूत गिरणी'चे उद्घाटन करून सर्व प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. पीडित शेतकरी न्याय मागण्यासाठी वडकी पोलीस ठाण्यात गेला असता, मंत्र्यांच्या दबावाखाली पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिला, एवढेच नव्हे तर शेतकऱ्यालाच पोलीस ठाण्यातून हाकलून लावल्याचा गंभीर आरोप आहे.

सत्तेच्या बळावर जमीन बळकावणे, उभे पीक उद्ध्वस्त करणे आणि पोलिस यंत्रणेला हाताशी धरून गरीब आदिवासी कुटुंबाला बेघर करण्याचा हा प्रकार लोकशाही व सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना काळीमा फासणारा असल्याचे ॲड. तेलंगे यांनी नमूद केले. या घटनेमुळे संपूर्ण आदिवासी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, दोषींवर तात्काळ कारवाई करून पीडित शेतकऱ्याला न्याय देण्याची जोरदार मागणी होत आहे.

# आर्णीमध्ये रस्त्याला लागले पाण्याचे खळखळ झरे, नगरपरिषदेची किमया

## रोडच्या मधोमध खड्ड्यांमुळे किरकोळ अपघात, मोठ्या अपघाताची शक्यता, नगरपरिषदेचे इंजिनियर नदारत

जनमाध्यम प्रतिनिधी



आर्णी : नगरपरिषद नेहमीच विचित्र कारणांमुळे चर्चेचा विषय ठरते. नगर परिषदेच्या मेहेरबानीने मुख्य रस्त्याला मोठमोठे खळखळणारे झरे लागल्याने नवल व्यक्त केल्या जात आहे. पाणीपुरवठ्याची मुख्य पाईपलाईन फुटल्याने आरोग्याचा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे. शहरात सगळीकडेच अशी परिस्थिती असताना, पोलीस स्टेशन चा रस्ता लक्ष वेधून घेत आहे. मुख्य रस्त्याला पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे खड्ड्यांमधून खळखळून पाणी वाहत आहे, मात्र या खड्ड्यांमुळे किरकोळ अपघात रोजच घडत आहे, तसेच मोठ्या अपघाताची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मुख्य रस्त्याला पडलेले मोठमोठे खड्डे आणि त्यातू खळखळून वाहणारे पाणी, हा काही एक-दोन दिवसांचा विषय नसून दोन महिन्यांच्या वर उलटत असूनही नगर परिषदेमार्फत कोणताही उपाय योजला जात नाही. त्यामुळे नागरिकात चिड निर्माण झाली असल्याची दिसून येत आहे.

नेहमीच वर्दळीच्या मुख्य रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने दररोज वाहनधारकांचे किरकोळ अपघात होत आहे तसेच खड्डे खूपच मोठे झालेले असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. असे चित्र असूनही दोन महिने उलटून सुद्धा नगरपरिषद व त्यांचे इंजिनियर तसेच त्यांचे कर्मचारी यावर कोणताही उपाय योजत नाही यामुळे नगर परिषदेचे दुर्लक्षित धोरण नागरिकांना नाकिनव आणत आहे. दुसरीकडे आर्णी नगर परिषदेला सेवा कर वाढवण्यात प्रचंड रस आहे, मात्र जीवनावश्यक सेवा सुद्धा नागरिकांना मिळत नाही. ही वास्तविक स्थिती आहे. आर्णी नगर परिषदे कडून नागरिकांना होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईन रस्त्याच्या मधोमध जागोजागी फुटल्याने रस्त्यातून खळखळणारे झरे वाहत आहेत, त्यामुळे पिण्याचे पाणी वाया तर जात आहेच याशिवाय मुख्य रहदारीच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली आहे.

महत्त्वाचे म्हणजे आर्णी शहरात अशी स्थिती सगळीकडेच झाली आहे. त्यातही आर्णी पोलीस स्टेशन चा रस्ता लक्ष वेधून घेत आहे, याच रस्त्यावर सदर ठिकाणी पोस्ट ऑफिस, कंट्रोलचे दुकाने, पोलीस स्टेशन रोड, मोठे धार्मिक स्थळ असून लोकांची ये जा व वाहनांची प्रचंड वर्दळ आहे.

# स्वयंघोषित देशभक्तच ख-या देशभक्तांना ठरवत आहेत खोटे !

## राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज व संविधानाचा अवमान करणारे आज देशभक्तीचे वाटत आहेत प्रमाणपत्रे– डॉ.झटाले यांचे परखड मत

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - स्वातंत्र्यापासून राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि राज्यघटनेचा कायम अपमान करणारे स्वयंघोषित देशभक्तच आज खऱ्या देशभक्तांना राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि संविधानाचा सन्मान कसा करावा हे शिकवत आहेत, देशभक्तीचे 'सर्टिफिकेट' वाटत आहेत. आपण त्यांचे वास्तव समाजासमोर आणले पाहिजे, असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत डॉ. चंद्रकांत झटाले यांनी व्यक्त केले.

येथील समतापर्व प्रतिष्ठान तर्फे २७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या स्मृतिपर्वात मुख्य वक्ते म्हणून ते 'स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव' या विषयावर बोलत होते.

पुराव्यांसह मांडले स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव 'मजबुती का नाम महात्मा गांधी' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक असलेले डॉ. चंद्रकांत झटाले यांनी आपल्या व्याख्यानात स्वयंघोषित देशभक्तांचे आजवरचे कार्य आणि वास्तव पुराव्यांसह मांडले. त्यांनी यावेळी त्यांच्या बहुचर्चित 'स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव' या पुस्तकाचा संदर्भ दिला. या पुस्तकात आरएसएस-भाजपच्या स्थापनेपासून ते पेगॅसस-राफेल घोटाळ्यांपर्यंतच्या वाटचालीची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. 'संघ परिवाराच्या पोटसंस्था कोणत्या, त्यांचे कार्य, स्वयंसेवक निर्मिती आणि संघाच्या देशविघातक कारवायांवर उपाययोजना काय?' अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात आहेत. वैचारिक लढा लढण्यासाठी हे पुस्तक वैचारिक दारुगोळ्या प्रमाणे असून, वर्षभरात या पुस्तकाच्या ९ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत, असे झटाले यांनी स्पष्ट केले. 'होय नेहरूच जबाबदार' कॅलेंडरद्वारे आक्षेपांचे खंडन यासोबतच, डॉ. झटाले यांनी यावर्षी काढलेल्या 'होय नेहरूच जबाबदार' या कॅलेंडरचा उल्लेख केला. या कॅलेंडरमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावरील आक्षेपांचे १३ लेखांद्वारे पुराव्यानिशी खंडन करण्यात आले आहे. सत्काराने गौरव आणि 'क्रांती गीतें'चे सादरीकरण : ार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समतापर्वच्या अध्यक्षा माधुरी वाळके होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच समतापर्व प्रतिष्ठान कला मंच द्वारा नंदकिशोर निमगडे व संच यांनी 'क्रांती गीतें' सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी, महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार घरांपर्यंत पोहोचवण्यासोबतच 'महात्मा ज्योतिबा फुले नाट्यगृह' निर्मितीच्या प्रक्रियेत सातत्याने पुढाकार घेतलेले डॉ. दिलीप घावडे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

उपस्थित मान्यवर - या प्रबोधनाच्या कार्यक्रमाला रामदास राऊत (माजी अध्यक्ष, समता पर्व), नारायण थुल (सचिव), जनार्दन मनवर, पल्लवीताई रामटेके, जयश्री भगत, डॉ. चंद्रकांत सरदार, चंद्रकात वाळके, सुनिता कापसीकर, पल्लवी कांबळे, प्रा. प्रियदर्शिनी वाकडे, शुभांगी मालखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन व नियोजन कार्यक्रमाचे संचालन काजल तायडे यांनी केले, प्रास्ताविक ॲड. सिमा तेलंगे यांनी तर परिचय प्रमोदिनी रामटेके (कोषाध्यक्ष) यांनी करून दिला. आभार अभि. भिमराव गायकवाड आणि प्रकाश देवपारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रीना वानखडे, प्रतिभा दातार, वृंदा कांबळे, जितेंद्र ढाणके, धर्मपाल भितकर, सुरज खोब्रागडे, सुबोध वाळके, सुबोध मेश्राम, शुभम वाळके, वंदना राऊत, विजय मालखेडे, हर्षा बोडखे, विजय डोंगरे, ज्योत्स्ना गौरकार, स्नेहा डोंगरे, विशाखा डोंगरे आणि सुनिता वंजारी यांनी परिश्रम घेतले. स्मृतिपर्वाचे आयोजक डॉ. ज्ञानेश्वर गोरे, डॉ. विलास काळे आणि वसीम खान यांनी मुख्य वक्ते डॉ. चंद्रकांत झटाले यांना मंगल भेट दिली.

# डॉ.पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न देण्याची मागणी ; जयंतीनिमित्त यवतमाळात अभिवादन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - कृषी क्रांतीचे प्रणेते,देशाचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री तथा सहकार चळवळीचे शिल्पकार डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आज दिनांक २७ डिसेंबर (शनिवार) रोजी यवतमाळ शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख चौक येथे मराठा सेवा संघ व समकक्ष संघटनांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमात मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड व शेतकरी चळवळीचे प्रा.पंढरी पाठे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ.पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी,ग्रामीण विकास व शिक्षण क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य हे आजही देशासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे,अशी ठाम मागणी केली. या कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड,स्वातंत्र्यसैनिक पाल्य समितीचे नंदकुमार बुटे,जिल्हा सचिव शशिकांत खडसे,घनश्याम दरणे, नीरज डफळे, सतीश काळे, अरविंद देशमुख, शेतकरी चळवळीचे प्रा.पंढरी पाठे,अशोक महाले, महेंद्र वेरुळकर, भैय्यासाहेब आगलावे, तुळशीराम लांडगे, किशोर चव्हाण, बाबाराव इंगोले, कैलास भोयर, किशोर राऊत, विशाल चुटे, सुधाकर वाघमारे, प्रविण आडे,दत्तू पारधी, आशा काळे, शोभा पारधी, अर्चना देशमुख,अनिता गरड, अर्चना होनाडे, वनिता वेरुळकर, स्नेहा निंबाळकर आदी मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अं.सुर्जी नगरपरिषदमध्ये थेट निवडलेले नगराध्यक्ष,पण सत्ता दुसऱ्याच पक्षाची!

## नगर परिषदांचा खरा कारभारी कोण?

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून आता शहर वासियांचे नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष पदाकडे लक्ष लागले आहे. नगराध्यक्षपदाची निवड ही थेट जनतेतून झाली आहे. मात्र, थेट जनतेतून निवडून आलेले नगराध्यक्ष आणि नगरसेवक हे वेगवेगळ्या पक्षांचे असल्याने नगर परिषदांचा खरा कारभारी कोण, असा पेच अंजनगाव नगरपरिषद मध्ये निर्माण झाला आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद मध्ये नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि सभागृहातील बहुमत दुसऱ्या पक्षाकडे गेलेले असल्याने पुढील पाच वर्षांचा कारभार आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. तर या ठिकाणी निर्णयप्रक्रियेत अडथळे, राजकीय संघर्ष आणि अस्थिरतेचे वातावरण कायम राहण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणूक प्रचारात दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरवताना नगराध्यक्षांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.नगर परिषदेत कोणताही निर्णय घेण्यासाठी सभागृहात ठराव मांडून तो मंजूर करून




घेणे आवश्यक असते. मात्र, येथे भाजप पक्षाचे नगराध्यक्ष निवडून आले तर सभागृहात भाजप ची संख्या अपुरी पडत आहे त्यामुळे पक्षाकडे बहुमत नसेल तर ठराव मंजूर होणे कठीण ठरणार आहे. परिणामी, कारभार सुरळीत चालवण्यासाठी नगराध्यक्षांना विरोधी पक्षाशी समन्वय साधावा लागणार आहे.

नगर परिषदेत प्रत्येक दहा नगरसेवकांमागे एक स्वीकृत नगरसेवक नियुक्त केला जातो. अंजनगाव सुर्जी नगरपरिषद मध्ये बहुमत नगराध्यक्षांच्या पक्षाकडे नसल्याने स्वीकृत नगरसेवकांची संख्या विरोधी पक्षाकडे अधिक जाण्याची दाट शक्यता आहे. यामुळे सत्तासंतुलन अधिकच नगराध्यक्षांच्या विरोधात झुकू शकते.

### अविश्वास ठराव?

येथिल नगरपरिषद मध्ये काँग्रेस ९ तर शिवसेना ठाकरे गटाचे ७ भाजप ६ शिवसेना शिंदे गटाचे ३ तर समाजवादी पक्षाचे २ आणि १ अपक्षासह एकुण २८ उमेदवार निवडून आले आहेत.नगरविकास विभागाच्या कायद्यानुसार नगराध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव आणण्याची तरतूद आहे. त्यासाठी दोन-तृतियांश नगरसेवकांचा पाठिंबा आवश्यक आहे.येथिल नगरपरिषद निवडणूकीत एकाही पक्षाला बहूमताचा व दोन -तृतियांश आकडा कोणत्याही पक्षाकडे नसल्याने अविश्वासची शक्यता कमीच आहे.

### नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष वेगवेगळ्या पक्षांचे?

स्थायी समितीच्या अध्यक्षपदी उपनगराध्यक्ष असतो. नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून आले आहे, तर उपनगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून होणार आहे. त्यामुळे येथील नगर परिषदांमध्ये नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि उपनगराध्यक्ष दुसऱ्या पक्षाचा असे चित्र दिसण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत प्रशासन आणि राजकारणातील ताणतणाव अधिक वाढण्याची चिन्हे आहेत.

## भाऊसाहेब देशमुख जयंतीने दुमदुमला स्टेशन परिसर

**अमरावती-** स्थानिक रेल्वे स्टेशन स्थित श्री शिवाजी मराठा हायस्कूल स्टेशन ब्रँच अमरावती तर्फे भाऊसाहेबांच्या १२७ व्या जयंती उत्सवाच्या निमित्त रेल्वे स्टेशन परिसरात बेलपुरा, हमालपुरा, विवेकानंद कॉलनी रुक्मिणी नगर, परिसरात भाऊ साहेबांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त 'मुली वाचवा मुली शिकवा' या उद्देशाला घेऊन भाऊसाहेबांच्या जयंती पर्वावर जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले.

या फेरीमध्ये विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम शिस्तीचेचे प्रदर्शन शिक्षण महर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या गौरव गीतांचे सहभिनय सादरीकरण चौका-चौकात करण्यात आले. या शाळेच्या शिस्तबद्ध, तालबद्ध, आणि समाज हितार्थउद्देशाचे कौतुक परिसरातील सर्व नागरिकांनी केले. थोर समाज सुधारक संत गाडगेबाबा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी आपल्या भूमिका सादर केल्य. या रॅलीमध्ये विद्यालयातील वर्ग ५ ते १० च्या सर्व विद्यार्थ्यांचा उस्तुर्फ सहभाग होता.

## चित्रकार सारंग नागठाणे यांनी फडणवीसांना दिली अनोखी भेट

**अमरावती/का.प्र.**

भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्यासोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बालपणीचा विशेष फोटो अमरावती शहरातील चित्रकार सारंग नागठाणे यांनी स्वतः चित्राकृतीत रंगवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट दिला.बालपणीच्या आठवणीला उजाळा देणारा हा फोटो पाहून मुख्यमंत्री चक्क भारावून गेलेत.

शहरात शनिवारी कॅन्सर हॉस्पिटलच्या उद्घाटनाकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता चित्रकार सारंग नागठाणे



यांनी सभा मंचावर जाऊन त्यांना अनोखी भेट दिली. बालपणी आपल्या घरी आलेल्या अटल बिहारी वाजपेयी यांच्यासोबत काढलेल्या फोटोचे सुंदर असे चित्र रेखाटलेले पाहून मुख्यमंत्री अवाक झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी चित्रकार सारंग नागठाणे यांचं कौतुक करत त्यांच्या या कलेसाठी मुख्यमंत्र्यांनी भरभरून शुभेच्छा देखील दिल्या कार्यक्रम प्रसंगी आमदार रवि राणा , माजी खासदार नवनीत रवि राणा, युवा स्वाभिमान पार्टीचे संस्थापक सुनील राणा,माजी नगरसेवक सुनील काळे, सचिन रासने, रवी खांडेकर, अधिवक्ता प्रशांत देशपांडे, किरण महल्ले, माजी नगरसेवक प्रशांत वानखडे, अधिवक्ता वासुदेव नवलानी, संपादक नानक आहुजा, बिट्टू सलुजा,मंत्री पंकज भोयर,, प्रवीण तायडे, सचिन भेंडे,अमोल इंगळे,उमेश यावलकर, डॉ. राजेंद्र सिंह अरोरा, डॉ. नीता अरोरा, डॉ. डी.जी. अडवाणी, अनिल तरडेजा, गगनदीप सहानी आणि नरेंद्र सिंह अरोरा व्यासपीठावर उपस्थित होते.

## अ.भा.ग्राहक पंचायत ग्राहकांच्या रक्षणासाठी- कमल केजडीवाल

**अचलपूर/वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षापासून अखिल भारतीय ग्राहक पंचायत कार्यरत असून सातत्याने ग्राहकांच्या हितासाठी व त्यांच्या रक्षणाकरिता कार्य करीत आहे. आणि या पुढेही ग्राहकाच्या रक्षणाकरीता कटिबध्द राहणार असलयाचे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुका अध्यक्ष कमल केजडीवाल यांनी केले.

अचलपूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाने शहरातील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमात कमल केजडीवाल बोलत होते.याप्रसंगी मंचावर निरिक्षण अधिकारी राहुल केदारे, नायब तहसिलदार मनिष देशमुख, अँड .माथुरी भवाळकर, सामाजिक कार्यकर्ते , डॉ.दिपक गुल्हाने , साहेबराव दामोदरे, सपेश वाजपेयी सह आदी मान्यवर उपस्थित होते.निरिक्षण अधिकारी राहुल केदारे यांनी ग्राहक दिनाचे महत्व, ग्राहकांचा अधिकारी आणि त्यांचे कर्तव्य यावर मार्मिक विवेचन करुन



ग्राहक पंचायतने सांगितलेल्या सर्व सुचणांची दखल घेतल्या जाणार असल्याचे सांगितले. तद्वतच नायब तहसिलदार मनिष देशमुख, रूपेश वाजपेयी, साहेबराव दामोदरे यांची सुध्दा प्रभावी भाषणे झालीत. कार्यक्रमास अनिल तायडे, डॉ. उमाकांत ठाकरे, मधुकर ठाकरे, विधळे, रविंद्रसिंह बघेल, लिलाधर शेवतकर, गौरव दिक्षित या ग्राहक पंचायतच्या कार्यकर्त्याची विशेष उपस्थितीती होती. कार्यक्रमांचे प्रास्ताविक अँड .माधुरी भवाळकर यांनी तर संचालनासह आभार कैलाश गुळसुंदरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल भोंगे, अमोन मनोहरे, राजु झोड, बाळासाहेब डोडवानी, चेतन माथने यांनी कशोसीचे प्रयत्न केले.

## घरफोडी करताना तरुण रंगेहात पकडला

### ५,६२० रुपयांची नगदी जप्त; फ्रेजरपुरा पोलिसांची तत्पर कारवाई

**अमरावती/का.प्र.**

कुलूप तोडून चोरी करण्यासाठी घरात शिरलेल्या तरुणाला नागरिक व पोलिसांच्या मदतीने रंगेहात पकडण्यात आले. ही घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. आरोपीकडून चोरी केलेली ५,६२० रुपयांची नगदी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

फिर्यादी तेजस रघुनाथ इंगळे (वय ३२, व्यवसाय – नोकरी, रा. आदर्श नेहरू नगर, मालटेकडीजवळ, फ्रेजरपुरा, अमरावती) यांनी २६ डिसेंबर रोजी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास ते घरी परतले असता त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळून आले, तर दार आतून बंद असल्याचे दिसले. संशय आल्याने त्यांनी खिडकीतून घरात डोकावून पाहिले असता आत एक इसम असल्याचे निदर्शनास आले. यावेळी फिर्यादीने आरडाओरड केली, त्यामुळे परिसरातील नागरिक जमा झाले. तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलीस दाखल झाल्यानंतर नागरिकांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. घराच्या आत तपासणी केली असता आरोपी शौचालयाच्या वर लपून बसलेला आढळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव तेजस पंडित गणवीर (वय २१, रा. नगिना मशिदीजवळ, फ्रेजरपुरा, अमरावती) असे सांगितले. पोलिसांनी फिर्यादीच्या समक्ष आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून फिर्यादीच्या घरातून चोरी केलेली ५,६२० रुपयांची नगदी रक्कम जप्त करण्यात आली. या रकमेतील नोटा विविध चलनातील असल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. आरोपीने रात्रीच्या वेळी घराचे कुलूप व कोंडा तोडून घरात प्रवेश करून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मुलांना सुसंस्कारासोबतच शस्त्र आणि शास्त्राचे ज्ञान द्या- शेलोटकर

**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी तालुक्यातील दापोरी येथे श्रीमद् भागवत ग्रामगीता तत्त्वचिंतन सोहळा दापोरी येथे मोठ्या उत्साहात झाले.. वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव तसेच सर्व संत स्मृतिदिन साजरा करण्यात येत आहे. याच निमित्ताने दहा ते अठरा वर्षा पर्यंतच्या दापोरी गावातील मुला मुलींचे सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये शिकवण्यात येणारे विषय योगा, प्राणायाम, सूर्यनमस्कार, लाठीकाठी, कराटे



मानवी मनोरे, हललाबोल, लाटीबंधिष इत्यादी मैदानी व मर्दानी खेळ शिकवल्या जात आहे.

ग्रामगीतचार्य ह .भ. प. श्री रायजीप्रभू शेलोटकर महाराज यांनी भागवत कथेचे वर्णन करत असताना म्हटले जेवढी शास्त्राची गरज आहे तेवढीच शास्त्राची गरज आहे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज ग्रामगीते मध्ये वर्णन करतांना आजचे छान छान बाल ! उद्याचे तरुण कार्यकर्ते होतील ! देशाचा पांग फेडतिल ! ऊतो मत्तम गुणांनी !! अशे प्रतिपादन केले. शेलोटकर महाराजांनी गेल्या पंचवीस वर्षामध्ये शेकडो गावांमध्ये श्रीमद् भागवत कथेच्या आणि ग्रामगीतेच्या माध्यमातून पन्नास हजार मुलांना सुसंस्काराचे धडे दिले त्यांना शस्त्र आणि शास्त्रचे ज्ञान दिले आज ती काळाची गरज असल्याचे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

### विश्वमांगल्य सभा अमरावती मार्फत

## 'मातृत्वाचे समकालीन परिमाण,आव्हाने आणि समाजाची भूमिका' विषयावर चर्चा

**अमरावती/का.प्र.**

विश्वमांगल्य सभा, ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्रिय महिला संघटना असुन, गेल्या १५ वर्षांपासून अर्थपूर्ण, मूल्य-आधारित आणि सामाजिकदृष्ट्या फायदेशीर कार्यात सतत गुंतलेली आहे.'मातृ-निर्माण' ही संकल्पना गाभ्याला घेऊन, सभा विविध वयोगटातील आणि विविध व्यावसायिक पार्श्वभूमीच्या महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी पद्धतशीर पुढाकार घेत आहे. याच श्रृखंलेतून मणिबाई गुजराती हायस्कूलच्या सभागृहात 'मातृत्वाचे बदलते स्वरूप, सध्याची आव्हाने आणि सामाजिक जबाबदाऱ्या' यावर चर्चा करण्यासाठी परिसंवाद



आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अधिवक्ता, प्राध्यापक, डॉक्टर आणि उद्योजकांसह एकूण ६७ महिलांनी भाग घेतला.

परीसंवादचे अध्यक्षपद विश्वमांगल्य सभेच्या राष्ट्रीय सह-संघटन मंत्री डॉ. पूजा देशमुख यांनी भूषवले. अखिल भारतीय बाल सभेच्या सह-संघटक अंजली देव, विदर्भ प्रांत संघटक पूजा चव्हाण, विदर्भ प्रांत संपर्क प्रमुख डॉ. वसुधा बोंडे, विदर्भ प्रांत विद्यार्थी सभा अध्यक्षा डॉ. स्मिता देशमुख आणि विदर्भ प्रांत उपाध्यक्षा रश्मी जाजोदिया यांच्या उपस्थितीत परिसंवाद संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन आणि तुळशी पुजनाने करण्यात आली. त्यानंतर सीमा पेलागडे आणि माधुरी जोशी यांनी शक्तिगान सादर केले. विश्वमांगल्य सभेच्या विदर्भ प्रांत संघटिका पूजा चव्हाण यांनी विश्वमांगल्य सभेकडून केले जाणारे कार्य, विभाग आणि संघटनेचे उद्दिष्टे तसेच आगामी २८ व २९ मार्च रोजी शेगांव येथे होणाऱ्या विदर्भ प्रांत अधिवेशनाची माहिती दिली.

डॉ. पूजा देशमुख यांनी 'युगानूकुल मातृत्व' या विषयावर प्रेक्षकांशी चर्चा केली. आजच्या महिलांना काम आणि कुटुंबाचे संतुलन साधताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते, परंतु त्या अहिल्याबाई आणि माता जिजाऊं इतक्याच सक्षम आहेत. सभेच्या भविष्यातील दृष्टिकोन आणि धोरणात्मक अंमलबजावणी वरही चर्चा झाली. छोटा परिवार सुखी परिवार हे विमर्श बाजूला सारत त्यांनी बडा परिवार समृध्द परिवार हा मूलमंत्र दिला. महिला भारताच्या लोकसंख्येचा अर्धा भाग आहे, मातृत्वाच्या सक्षमीकरणात त्यांना सहभागी करून घेणे आणि मूल्यांवर आधारित, सुसंस्कृत आणि सुसंवादी समाज निर्माण करण्यात महिलांची भूमिका बळकट करणे ही काळाची गरज असल्याचे डॉ. पूजा देशमुख यांनी सांगितले.

याप्रसंगी, डॉ. पूजा देशमुख यांनी पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.संचालन विश्वमांगल्य सभा, अमरावती बाल-सभा समन्वयक सिद्धी सेठिया यांनी केले. माधुरी जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विदर्भ प्रांत कार्यालय प्रमुख रश्मी इटकीकर, प्रकल्प प्रमुख सुनिता बालेकर,अमरावती महानगर संपर्क प्रमुख निकिता शुक्ला, अमरावती महानगर संयोजिका श्रुती बिरे, सहसचिव हितेष्णी देवरणकर,सह प्रकल्प प्रमुख माधुरी जोशी, विदर्भ प्रांत बालसभा संयोजिका सीमा पेलागडे, कल्पना देशमुख, अस्मिता बालेकर, शिवानी चौधरी, सविता पांडे, रेवती देशपांडे, मनीषा देशपांडे, अनुराधा रघुवंशी, रोहिणी डोरले व विश्वमांगल्य सभेच्या समस्त महिला शक्तीने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता जयघोषाने झाली.मार्च रोजी होणाऱ्या विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत अधिवेशनाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

## संक्षिप्त

### नवभारत गुरुकुलम् शाळेला देणगी जाहीर



**अमरावती-**श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरण नगर अमरावती या संस्थेद्वारे सुरू होणाऱ्या वर्ग १ ते १२ वी पर्यंतची मराठी माध्यमाची महाराष्ट्रातील पहिली सीबीएसई शाळा 'नवभारत गुरुकुलम' च्या इमारतीचा भूमिपूजन समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.समारंभाच्या वेळी श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्टतर्फे प्रस्तावित असलेल्या या महत्वकांक्षी प्रकल्पासाठी देणगी देण्याचे आवाहन करण्यात आले होते.या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देऊन अजय पिंपळगावकर यांनी या महत्वकांक्षी प्रकल्पासाठी रुपये एक लक्ष देणगी देण्याचे जाहीर केले. याप्रसंगी अजय पिंपळगावकर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला व संस्थेने त्यांचे आभार मानले.कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठित नागरिक, पालकवृंद तसेच श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सरस्वती प्राथमिक शाळा व सरस्वती शिशुवाटिका येथील शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती.

### जिल्ह्यात एकाच दिवसात चार जणांनी आत्महत्या

**अमरावती-** अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात चार जणांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी तिघांनी गळफास घेऊन आणि एकाने विष प्राशन करून आत्महत्या केली. या घटना अंजनगाव सुर्जी, धारणी, कुऱ्हा आणि मोर्शी पोलीस स्टेशन परिसरात घडल्या.अंजनगाव सुर्जी येथील एका २० वर्षीय महिलेने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अंजनगाव सुर्जी पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. धारणी तहसीलमधील एका गावात १८ वर्षीय महिलेनेही घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या महिलेच्या आत्महत्येचे कारण देखील स्पष्ट झालेले नाही. धारणी पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. गळफास घेऊन तिसरी आत्महत्या मोर्शी तहसीलमधील पाला गावात घडली. कमलेश पंढरी कडू (२८) नावाच्या तरुणाने गळफास घेतला. कमलेशच्या आत्महत्येचे कारणही अस्पष्ट आहे. मोर्शी पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. कुऱ्हा पोलीस स्टेशन परिसरातील अमरावती रोडवरील पाण्याच्या टाकीसमोर सिरसाणा येथील रहिवासी विलास विष्णू राठोड (३५) या तरुणाने विष प्राशन करून आत्महत्या केली. त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात कुऱ्हा पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

### पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेती शाळेचे आयोजन



**अमरावती -** येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय तर्फे रब्बी पीक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर अमरावती तालुक्यातील मौजे शिराळा येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालयातर्फे कृषी विद्या विभागाचे प्रा. हेमंतकुमार वि. पवार यांनी शेतकऱ्यांना हरभरा व तूर पिकातील खत व कीड व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन हरभरा व तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांच्या शंकांचे निरसन केल. सदर शेती शाळा व प्रक्षेत्र भेटी मधील मार्गदर्शना बाबत उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात देखील पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पिक उत्पादन, संरक्षण, काढणी पश्चात तंत्रज्ञान व शेतमालाचे विपणन यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी नीता कवाणे, सहाय्यक कृषी अधिकारी मारुती जाधव, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण

**कुऱ्हा-**विदर्भाची पंढरी जगत जननी आई रूक्मिणी माता व



रूख्मीणी हरण मंदीर श्री.अंबिका माता व सकल संताच्या असिम कृपेने व सर्व भक्तांच्या सहकार्याने कौंडण्यपूर येथे अखंड हरिनाम सप्ताह भागवत कथेचे आयोजन २५ डिसेबर ते १ जानेवारी २०२६पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची तिर्थस्थापना, नरेंद्र पुरी महाराज श्री.अंबिका संस्थान कौंडण्यपूर, प्रदीप पंडीतराव देशमुख (अमरावती) यांचे हस्ते, तर विणापुजन भैय्यासाहेब ठाकरे विश्वस्त व दिप पुजन दिनेश वानखडे विश्वस्त यांच्या उपस्थितीत करण्यात आले कार्यक्रमाची दैनंदिनी रुपरेषा काकडा आरती पहाटे ५ ते ७ वा.अभिषेक चहा नाश्ता स. ७ ते ८ वा. ज्ञानेश्वरी पारायण सकाळी ८ ते ११, भोजन ११.२० ते १२.३०, भागवत कथा दुपारी १ ते ४, महीला भंजनी मंडळाचे भजन दुपारी ४ ते सायं. ६ वा. हरीपाठ सायं. ६ ते रात्री ७ वा. पुरुषांचे भजन मंडळ रात्री ८ ते ११ वा.होईल. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण व्यास पीठ ह.भ. प.सौ. चंदाताई मारोतराव काटे बोरगांव (मेघे) यांचे तर, संगीतमय श्रीमद् भागवत कथा भागवताचार्य ह.भ.प.संजय ठाकरे महाराज (कौंडण्यपूर) यांचे अमृतवाणीतून कथा भागवत होईल.तर भागवत संच व गायक ऑरगन वादक गजानन मुरके, तबला वादक निखिल ठाकरे, गायक- गजानन गायकवाड, झाकी मास्तर वानखडे बाबा, हरीपाठ किर्तना करिता मंडळी वारकरी भजनी मंडळ कौंडण्यपूर, वारकरी भजनी मंडळ भारसवाडी, महारूद्र वारकरी भजनी मंडळ मारडा, यांचा सहभाग राहील. तसेच सप्ताह भर महीला भजनी मंडळ सायं. ६ ते ४ वा.तर पुरुष भजनी मंडळ रात्री ९.३० ते ११.३० वा. पर्यंत होईल. तसेच उपस्थित वारकरी भजनी मंडळ आयोजक अमरावती,वर्धा,यवतमाळ, अकोला, येथील भाविक यांचा सहभाग तरी भाविक भक्तांनी वरील कार्यक्रमांचा अवश्य लाभ द्यावा असे कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक प्रदीप पंडीतराव देशमुख यांनी केले आहे.

# अशांततेचे वर्ष सरले, नववर्षाचे काय?

**काल**चक्र ही अव्याहत, निरंतन चालणारी क्रिया असून विश्वात घडणाऱ्या असंख्य उलथापालथींनंतरही ती सुरू असते. काळ कुणासाठी थांबत नाही. काळाच्या आकलनासाठी आपण सेकंद, मिनीट, तास, दिवस, महिने अशी परिमाणे आणली. त्यांच्या आधारे आपण फक्त जाणाऱ्या काळाची गणना करत असतो. ती करत असतानाच मर्त्यमानव विशिष्ट टप्प्यांवर सरून गेलेल्या काळातील घडामोडींचा धांडोळा घेऊन चिंतनही करत असतो. वर्षअखेरीचा दिवस हा त्यासाठीची एक संधी मानली जाते. आज माहितीच्या प्रस्फोटाच्या जगात 'इन्फर्मेशन ओव्हरलोडिंग'ची समस्या निर्माण झाली आहे; पण याच तंत्रज्ञानाच्या शब्दांत सांगायचे, तर सरत्या वर्षात घडलेल्या घटनांचा साकल्याने वेध घेतला असता जागतिक पटलावरील घडामोडींमागे काही तरी 'अल्गोरिदम' आहे की काय, अशी शक्यता निश्चितपणे वाटून जाते. विशेषतः एक बलशाली राष्ट्र म्हणून भारताचा होत असलेला प्रवास जागतिक शक्तींना खुपत चालल्यामुळे हे अल्गोरिदम नियोजनबद्धरीत्या राबवले जात असल्याचे सरत्या वर्षातील घटनांनी स्पष्ट केले आहे.

दुसरीकडे, कोरोना महामारीनंतर जगाचा सुरू झालेला जागतिकीकरणाच्या विरुद्ध दिशेचा प्रवास जानेवारी महिन्यामध्ये डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर एका नव्या वळणावर आहे. खरे पाहता गतवर्षात जागतिक पटलावर घडलेल्या जवळपास प्रत्येक ठळक घटनेच्या मुळाशी कुठे ना कुठे ट्रम्प यांचे अमेरिकेतील दुसरे पर्व कारणीभूत असल्याचे दिसून येईल. २० जानेवारी २०२५ रोजी या महाशयांनी द युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आणि त्यानंतर थेट जगाचे अर्थशास्त्र, व्यापारशास्त्र, भूगोल, इतिहास, सामरिक समीकरणे, सत्ता समीकरणे, तंत्रज्ञानाचे विश्व अशा प्रत्येक महत्त्वाच्या क्षेत्रावर आपल्या निर्णयांनी प्रभाव टाकण्यास सुरुवात केली. यामुळे भारतासह जगभरात प्रचंड मोठी अस्वस्थता निर्माण झाली. कारण, ज्या अमेरिकेने नव्वदीच्या दशकामध्ये जागतिकीकरणाचे गोडवे गाताना अनेक विकसनशील राष्ट्रांना प्रसंगी दबाव आणून त्यांच्या बाजारपेठा खुल्या करण्यास सांगितले, तीच अमेरिका आता आयातीवर ६० ते २०० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारण्याबाबत बोलू लागली, ही बाब जगाला अचंबित करणारी होती. वर्ष सरतासरता मेक्सिकोनेही ट्रम्प यांच्या पावलावर पाऊल टाकत टॅरिफमध्ये वाढ करण्याचा कित्ता गिरवत पुढील वर्षासाठीची तरतूद करून ठेवली आहे. वास्तविक ट्रम्प यांच्या आगमनानंतर रशिया-युक्रेन युद्ध आणि इस्रायल-हमास युद्ध तत्काळ रोखले जाणार अशाप्रकारच्या सर्वांच्या अटकळी होत्या. कारण, २०२४ च्या अखेरीस जेव्हा ट्रम्प यांच्या विजयाची दुमदुमी झाली तेव्हा त्यांनीच दिलेल्या आश्वासनांमुळे जगाने २०२५ हे वर्ष युद्धाकडून शांततेकडे जगाला घेऊन जाणारे ठरेल अशी अपेक्षा ठेवली होती. तथापि, रशिया-युक्रेन युद्ध रोखण्यात आतापर्यंत तरी ट्रम्प यांना यश आलेले नाही. इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी हे ट्रम्प यांच्या धोरणांचे यश म्हणून पाहता येईलही; पण ही शांतता किती काळ टिकणार, या प्रश्नाची टांगती तलवार २०२६ च्या डोक्यावर असणारच आहे. ट्रम्प यांनी इराणची अणुकेंद्रे नष्ट केल्यामुळे अमेरिका आनंदात असली, तरी २०२६ मध्ये याचा बदला इराणकडून घेतला जाऊ शकतो.

२०२५ हे वर्ष आशिया खंडासह युरोपियन देशांसाठी घुसळणीचे आणि अस्वस्थता, अशांतता तसेच नागरी उठावांच्या हलकल्लोळाने प्रस्थापित व्यवस्थांना आत्मचिंतन करावयास भाग पाडणारे ठरले. नेपाळ, फ्रान्स ही याची ठळक उदाहरणे ठरली. हिमालयाच्या कुशीत

> **‘‘ मावळतीला निरोप देत असताना उद्याच्या सूर्योदयाच्या आकाशाकडे जगाचे लक्ष लागून राहिलेले असले, तरी मनातील हुरहूर, भीतीचे काहूर संपलेले नाही; पण येणारे नवीन वर्ष तरी शांतता, सलोखा, सौहार्द यांची पेरणी करणारे ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त करत जग या नव्या पर्वात सहभागी होणार आहे. ’’**

वसलेल्या नेपाळमध्ये २०२५ मध्ये जी क्रांती झाली, ती जगभरातील समाजशास्त्रज्ञांसाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. ही क्रांती पारंपरिक राजकीय पक्षांनी नाही, तर 'झेन-जी' म्हणजेच नव्या पिढीतील तरुणांनी घडवून आणली. पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या सरकारने फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्ॲप आणि यूट्यूब यांसारख्या २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. डिजिटल युगात श्वास घेणाऱ्या पिढीसाठी हा त्यांच्या मूलभूत अधिकारांवर आणि उपजीविकेवर केलेला हल्ला होता. 'नेपोकिड' मोहिमेद्वारे तरुणांनी राजकीय नेत्यांच्या मुलांची आणि त्यांच्या चैनीच्या आयुष्याची पोलखोल केली. भ्रष्टाचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी यामुळे संतापलेल्या तरुणांनी काठमांडूच्या रस्त्यांवर धाव घेतली. या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १९ तरुणांचा मृत्यू झाला. या हिंसाचाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून गृहमंत्री रमेश लेखक आणि त्यानंतर खुद्द के. पी. शर्मा ओली यांना पदाचा त्याग करावा लागला. नेपाळच्या इतिहासात पहिल्यांदाच सरन्यायाधीश सुशीला कार्की यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन झाले असून, या सरकारची निवड ऑनलाईन मतदानाद्वारे करण्यात आली. याच जेन-झेडच्या एकजुटीने फ्रान्समध्येही उठाव झाला. या उठावाची कारणे वेगळी असली, तरी त्यामध्ये आर्थिक धोरणांचा मुद्दा सामायिक आहे. युरोपियन देशांच्या दृष्टीने चिंतेचे ठरलेले रशिया-युक्रेन युद्ध अद्यापही संपण्याचे नाव घेत नसल्याने २०२६ मध्येही या देशांपुढील आर्थिक, व्यापारी आव्हाने कायम राहतील, असे दिसते. सरत्या




वर्षात युरोपियन महासंघातील अनेक देशांमध्ये झालेल्या निवडणुकांमधून मतदारांचा उजव्या विचारसरणीकडे किंवा राष्ट्रवादाकडे वाढत चाललेला कल स्पष्टपणाने दिसून आला आहे. ही स्थिती युरोपात पुढील वर्षीच नव्हे, तर आगामी काळातील नव्या बदलांचे संकेत देणारी आहे.

दक्षिण आशियाचा विचार करता मावळत्या वर्षातील काही ठळक घडामोडींनी येणाऱ्या काळातील चिंता वाढवल्या आहेत. यातील सर्वांत प्रमुख घडामोड म्हणजे बांगला देशातील अराजक. शेख हसीना यांच्या १५ वर्षांच्या सत्तेचा अंत झाल्यानंतर बांगला देशात लोकशाहीचा नवा सूर्योदय होईल, अशी अपेक्षा होती; मात्र २०२५ मध्ये हा देश एका अशा वळणावर येऊन उभा आहे, जिथे भविष्याचा मार्ग धूसर झाला आहे. नोबेल विजेते डॉ. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार देशाला स्थिर करण्याचा प्रयत्न करत असले, तरी जमिनीवरची परिस्थिती अत्यंत स्फोटक आहे. नोव्हेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने शेख हसीना यांना त्यांच्या अनुपस्थितीत फाशीची शिक्षा सुनावली. हसीना यांनी या निकालाला 'राजकीय प्रेरित' म्हटले असले, तरी यामुळे अवामी लीगच्या समर्थकांमध्ये आणि विरोधकांमध्ये संघर्षाची नवी ठिणगी पडली. दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी झालेली युवा नेते शरीफ उस्मान हादी याची हत्या हा बांगला देशातील अस्थिरतेचा कळस ठरला. हादी हा 'इन्कलाब मंच'चा प्रवक्ता होता आणि २०२४ च्या विद्यार्थी चळवळीतील एक महत्त्वाचा चेहरा होता. त्याच्या हत्येनंतर ढाका आणि इतर प्रमुख शहरांमध्ये दंगली उसळल्या. अवामी लीगच्या कार्यालयांना आगी लावण्यात आल्या. माध्यमांनाही यामध्ये लक्ष्य करण्यात आले. या अराजकतेमध्ये अल्पसंख्याक समुदायाला विशेषतः हिंदूंना लक्ष्य केले जाणे ही सर्वांत चिंतेची बाब आहे. मैमनसिंग जिल्ह्यात दीपू चंद्र दास या हिंदू तरुणाची धर्मांधांनी केलेली निर्घृण हत्या ही युनूस सरकारची कायदा-सुव्यवस्थेवरील पकड ढिली झाल्याचे निदर्शक आहे. जेव्हा एखाद्या देशात 'कायद्याचे राज्य' संपून 'टोळ्यांचे राज्य' सुरू होते, तेव्हा त्या समाजाचे पतन अटळ असते, हा राजकीय सिद्धांत बांगला देशच्या सध्याच्या स्थितीला तंतोतंत लागू पडतो. वर्ष संपेपर्यंत बांगला देशातील अराजक शमलेले नसून पुढील वर्षी पार पडणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांबाबतही आता अनिश्चितता निर्माण झाली आहे. बांगला देशातील ही स्थिती भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' पॉलिसीपुढील सर्वांत मोठे आव्हान ठरली असून २०२६ मध्ये भारतासाठी प्राधान्यचिंतेचा विषय राहणार आहे.

पाकिस्तानच्या दृष्टीनेही मावळते वर्ष अराजकाचे ठरले. डोनाल्ड ट्रम्प यांनी भलेही पाकिस्तानी पंतप्रधान आणि लष्करशहांना मांडीवर घेतले असेल; पण अफगाणिस्तानातील तालिबानने सुरू केलेला एल्गार, सिंध-बलूच-पीओके भागातील फुटिरतावादी आंदोलने यामुळे पाकिस्तानचे तुकडे होण्याची वेळ जवळ येत चालली आहे. पाकिस्तानच्या इतिहासात हे वर्ष आणखी एक नामुष्कीजनक वर्ष म्हणून नोंदवले जाईल. याचे कारण, भारताने 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत दिलेला महादणका. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर मस्तवाल बनलेल्या पाकिस्तानने पूर्वीच्या भूमिकेनुसार भारताला घेरण्याचा प्रयत्न चालवला होता; परंतु यावेळी भारताने पीओकेमधील दहशतवादी तळांवरच नव्हे, तर थेट कराची, इस्लामाबादपर्यंत घुसून पाकिस्तानला त्यांची लायकी आणि आपली क्षमता दाखवून दिली. भारताच्या दृष्टीने विचार करता ट्रम्प यांच्या टॅरिफ तडाख्यांमुळे आणि डावपेचांमुळे मावळत्या वर्षात काहीशी कोंडी झाल्याचे चित्र निर्माण झाले होते; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत मुत्सद्दीपणाने आणि चाणाक्षपणाने या संकटाचा ज्या खुबीने सामना केला, त्याची इतिहासात नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. एकीकडे ट्रम्प यांच्यापुढे शेती, दुग्धोत्पादन, फिशरीज यांसाठी भारतीय बाजारपेठ खुली करण्याबाबत जराही नमते न घेता दुसरीकडे अमेरिकन टेरीफमुळे झळा बसणाऱ्या क्षेत्रांसाठी निर्यातीच्या नव्या संधी उपलब्ध करून, जीएसटी सुधारणांचे रामबाण औषध अर्थव्यवस्थेला देऊन मोदी सरकारने महासत्तेचा गेम पलटवून लावला. वर्ष सरता सरता इंग्लंड, ओमान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडसह विविध देशांसोबत मुक्त व्यापार करारांचा सपाटा लावून भारताने अमेरिकेसोबतच्या चर्चांमध्ये आपला आवाज बुलंद केला आहे. भारताच्या आर्थिक विकास दराने ८ टक्क्यांपल्याड उडी घेत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने सुरू असलेले मार्गक्रमण यशस्वीपणाने होत असल्याची साक्ष दिली आहे.

याखेरीज २०२५ मध्ये घडलेल्या भूकंप, चक्रीवादळे, भूस्खलन, अतिवृष्टी, विमान अपघात यांसारख्या घटना जगाला अस्वस्थ करणाऱ्या ठरल्या.अर्थकारणाच्या दृष्टीनेही ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अनेक तडाखे जगाला बसले. जागतिक पटलावरील या असुरक्षित वातावरणामुळे सोने आणि चांदीच्या भावांनी ऐतिहासिक भरारी घेतली आहे. जगभरात विविध राष्ट्रे सोन्यातील गुंतवणूक वाढवत चालली आहेत. २०२६ मध्येही फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात कपातीचे सत्र सुरू राहिले तर डॉलर कमकुवत होऊन सोन्याला नवी झळाळी प्राप्त होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

मावळते वर्ष जसे निवडणुकांचे वर्ष म्हणून ओळखले गेले तशाच प्रकारे आगामी वर्षातही जागतिक पटलावर होणाऱ्या काही निवडणुका महत्त्वाच्या ठरणार आहेत. बांगलादेशात फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुका लोकशाही पुनर्स्थापनेसाठी अत्यंत कळीच्या ठरणार आहेत. नेपाळ आणि थायलंडमधील निवडणुकांमुळे आशियातील प्रादेशिक समीकरणे बदलू शकतात. भारतासाठी या निवडणुकांचे निकाल अतिशय महत्त्वाचे असणार आहेत. सप्टेंबर २०२६ मध्ये रशियात होणारी संसदीय निवडणूक व्लादिमीर पुतिन यांच्या सत्तेवरील पकड अधिक घट्ट करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. युक्रेन युद्ध आणि पाश्चात्य देशांचे निर्बंध या पार्श्वभूमीवर रशियन जनता काय कौल देते, याकडे जगाचे लक्ष असेल. नोव्हेंबर २०२६ मध्ये अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होतील. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील धोरणांना अमेरिकन जनतेचा किती पाठिंबा आहे, याची ही पहिली मोठी परीक्षा असेल. याचा परिणाम जागतिक व्यापार आणि संरक्षण धोरणांवर होऊ शकतो. ममरानींचा न्यूयॉर्कमधील विजय ट्रम्प यांच्यासाठी धोक्याची घंटा ठरला आहे. हा घंटानाद तसाच सुरू राहणार का याकडे जगाचे लक्ष आहे. याखेरीज हंगेरीमध्ये पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांच्यासमोर पहिल्यांदाच प्रबळ विरोधी पक्षाचे आव्हान उभे राहिले आहे. युरोपियन युनियनशी असलेले त्यांचे संबंध आणि लोकशाही मूल्यांवरील चर्चा या निवडणुकीच्या केंद्रस्थानी असतील. भारतासाठी २०२६ हे वर्ष संघटनात्मक आणि स्थानिक पातळीवर महत्त्वाचे असेल. भारत 'आंतरराष्ट्रीय आयडीईए' या ३५ सदस्य देशांच्या लोकशाही संघटनेचे अध्यक्षपद भूषवणार आहे. देशांतर्गत पातळीवर विचार करता या वर्षात तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, आसाम आणि पुदुचेरी या पाच महत्त्वाच्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्याचबरोबर पुढील वर्षी राज्यसभेच्या तब्बल ७५ जागा रिक्त होत आहेत. एप्रिल, जून आणि नोव्हेंबर या तीन टप्प्यांत या जागांसाठी मतदान होईल. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि तामिळनाडू यांसारख्या राज्यांतील जागांचा यामध्ये समावेश आहे. महाराष्ट्रात १५ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार, नांदेड, सांगली आणि जळगाव यांसारख्या मोठ्या महानगरपालिकांच्या निवडणुका पार पडणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांनंतरचा हा सर्वांत मोठा स्थानिक सत्तासंघर्ष असेल.

एकंदरीतच, मावळतीला निरोप देत असताना उद्याच्या सूर्योदयाच्या आकाशाकडे जगाचे लक्ष लागून राहिलेले असले तरी मनातील हुरहूर, भीतीचे काहूर संपलेले नाहीये. पण येणारे नवीन वर्ष तरी शांतता, सलोखा, सौहार्द यांची पेरणी करणारे ठरावे अशी अपेक्षा व्यक्त करत जग या नव्या पर्वात सहभागी होणार आहे. या सर्व घुसळणीपेक्षाही मोठे स्थित्यंतर एआय नावाचा जादुई जिन घडवून आणणार आहे. ते अकल्पित असेल असे या तंत्रज्ञानाचा पितामह जेफरी हिंटन यानेच म्हटले आहे. त्यामुळे त्या परिवर्तनाला अंदाजांच्या चौकटीत बांधणे अशक्य आहे.

**डॉ. योगेश प्र. जाधव**



# हरवलेले पालकत्व!

**मा**गील वर्षी सासऱ्यांना आजारपणामुळे इस्पितळात भरती करावे लागले. आयसीयूमध्ये एक वृद्ध आजी एकट्याच होत्या. त्यांच्या जवळ नात्यापैकी कोणीही नव्हते. ना मुलगा, ना सून, ना नातवंड. मरणासन्न अवस्थेत होत्या, थोडी चौकशी केल्यावर कळले की आजी-आजोबांचे वय नव्वदीच्या पुढे आहे. दोघेही आपल्या घरातच राहण्यावर ठाम होते. मात्र मुले, सुना,नातवंड नोकरीनिमित्त मोठ्या शहरांत स्थायिक झाली होती. परिणामी आजी आजोबांच्या घरी परिचारिका, घरकाम करणारे स्त्री-पुरुष मदतीला असतात. आजी आजोबांच्या सांभाळ होत होता, पण नात्यांची ऊब नव्हती. पालकत्व होते, पण ते पैशाने विकत घेतलेले होते.

काही दिवसांनी सोशल मीडियावर एक प्री-वेडिंग व्हिडीओ पाहण्यात आला. एका तरुण जोडप्याने आपले प्री-वेडिंग शूट थेट वृद्धाश्रमात केले होते. त्यांनी तिथल्या आजी-आजोबांसोबत दिवस घालवला, फळे नेली, आवश्यक वस्तू दिल्या. जे स्वतः जेवू शकत नव्हते त्यांना आपल्या हाताने खाऊ घातल. त्या वृद्धांच्या चेहऱ्यावरचा आनंद मन हेलावून टाकणारा होता. भरभरून आशीर्वाद मिळाले असणार त्या जोडप्याला. व्हिडीओ पाहताना डोळे पाणावले.मात्र त्याच वेळी मनात एक प्रश्न उभा राहिला आज या तरुणांनी काही तासांसाठी पालकत्व स्वीकारले, पण उद्या काय? त्या आजी-आजोबांचे रोजचे आयुष्य पुन्हा एकाकीच असणार.

याच दरम्यान आणखी एक हलवा प्रसंग अनुभवला. एका पाळणा घरात कामानिमित्त जाण्याचा योग आला. मला पाहताच एक सव्वा वर्षाची तान्हुली दुडूदुडू धावत आली. तिला वाटले, आपल्या घरचे कोणी तरी आले आहे. पण समोर अनोळखी चेहरा दिसताच ती रडू लागली. तिच्या डोळ्यांत भीती होती माझे काहीतरी हरवलंय, माझे कोणीच नाही. तेही पालकत्व होते, पण ते सुद्धा पैशावर उभं होतं.

पालकत्व हे आयुष्यातले सर्वांत जिव्हाळ्याचे नाते आहे. जन्म देणे महत्त्वाचे असतेच, पण त्याहून मोठे असते साथ देणे, आधार बनणे. आज मात्र हे नाते हळूहळू व्यवहारात बदलत चालले आहे. यामागची कारणंही अनेक आहेत. बदलती जीवनशैली, वाढत्या गरजा, करिअरचा दबाव, स्थलांतर, नात्यातील अहंकार हे सगळे वास्तव आहे. पण बदल स्वीकारताना नात्यांचा गाभा हरवतोय, ही बाब चिंताजनक आहे.

कुठे आई-वडिलांना नोकरीशिवाय पर्याय नसतो. मनावर दगड ठेवून पाळणाघराचा निर्णय घ्यावा लागतो. कुठे करिअरच्या ओढीपोटी वृद्ध आई-वडील गावी एकटे राहतात. कुठे भावंडांमध्ये वाद होतो पालकत्व मी घेणार की तू? लहानपणी ज्यांनी आपल्याला चालायला शिकवले, त्यांच्यासाठी जबाबदारी घ्यायला मात्र कोणी पुढे येत नाही.

अनेक वेळा वृद्धाश्रमाचा मार्ग स्वीकारला जातो. काही ठिकाणी तर आई-वडील स्वतःच म्हणतात, 'तुम्ही तुमचे आयुष्य आनंदात जगा. आमची काळजी तिकडे घेतली जाईल.' पण हे शब्द उच्चारतानाही त्यांच्या मनावर दगड ठेवलेलाच असतो, हे फार थोड्यांना जाणवते.आज पालकत्व हरवत चाललं आहे. नात्यांमधला ओलावा कमी होत चालला आहे. माणसे जवळ असूनही भावनिक अंतर वाढत आहे.

हे चित्र बदलण्यासाठी थोडेसे मागे वळून पाहिले तरी पुरेसे आहे. पुढे जायचंच आहे, प्रगती करायचीच आहे; पण मागचे सगळंच वाईट होते असे नाही. पूर्वीही स्त्रिया कर्तबगार होत्या. त्यांनी करिअर आणि संसार यांची सांगड कशी घालायची हे शिकून घेतले होते. आजच्या पिढीलाही ते शिकणे गरजेचे आहे.या सगळ्या समस्यांवर एक महत्त्वाचा उपाय म्हणजे एकत्र कुटुंब पद्धतीचा पुनर्विचार. अहंकार बाजूला ठेवून 'मी'पेक्षा 'आपण' महत्त्वाचे मानणे.

आमच्या लहानपणी घरात दोन-दोन आजी-आजोबा असायचे, कुठे आजीची बहीण असायची, तर कुठे आजोबांचे भाऊ. म्हणजे आजी-आजोबां सोबत मावशी आजी, आत्ता आजी, काकु आजी किंवा काका आजोबा, मामा आजोबा असायचे, काही अडले तर भक्कम आधार असायचा. आपोआपच मिळून मिसळून राहणे, मोठ्यांचा आदर करणे, स्वतःच्या दोषांवर नियंत्रण ठेवणे नकळत संस्कार व्हायचे, नात्यांची ओळख आपोआप होत होती. आज मात्र मुलांना स्वतःचे काका-काकूही नीट माहिती नसतात. नाती कमी होत गेली, तसतसे पालकत्वही हरवत गेले.

अजूनही वेळ गेलेली नाही. पालकत्व पूर्णपणे संपण्याआधी ते जपण्याची गरज आहे. कारण पुढील पिढी याच संस्कारांवर उभी राहणार आहे. आदर्श समाज आणि आदर्श राष्ट्र घडवायचं असेल, तर त्याची सुरुवात घराघरांतून, जिवंत पालकत्वातूनच व्हायला हवी. याही पलिकडे आता आई ऐवजी AI कडे पालकत्व जाऊ नये म्हणजे झाल.

**प्रांजली विजय ब्रम्हे,**
**नागपूर**

# मद्यपींकरीता सरकारच्या पायघड्या !

**खि**स्ती नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३१ डिसेंबरला मद्याची दुकाने रात्री १ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी दिली आहे तर बिअर बार्स, पब्स, क्लब्स आणि परमिट रूम्स यांमध्ये पहाटे पाच वाजे मद्य विक्री करण्याची मुभा देण्यात आली आहे . सरकारच्या या निर्णयामुळे मद्यपींमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी सामान्य जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरात दारिद्र्य आले आहे. कित्येक पिढ्या बरबाद झाल्या आहेत. दारूमुळे होणारी हानी लक्षात घेऊन अनेक राज्य सरकारांनी आपल्या राज्यात कायमस्वरूपी दारूबंदी केली आहे, असे असताना राज्याच्या सरकारने मद्यपींसाठी घालून दिलेली मोकळीक महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे. १ जानेवारी हा खरेतर ख्रिस्ती नववर्षारंभ. भारतात इंग्रजांनी अनेक प्रांतांत शेकडो वर्षे राज्य केल्याने आज इंग्रज जाऊन ७८ वर्षे उलटली तरी इंग्रजांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून आपण अद्याप मुक्त झालेलो नाहीत. तरुण वर्गामध्ये साजरे केलेले जाणारे विविध 'डेज' आणि त्यानिमित्ताने चालणारा स्वैराचार ही त्याचीच विषारी फळे आहेत. भारतात दरवर्षी उत्साहात साजरा केला जाणारा ३१ डिसेंबर हे सुद्धा आपल्यातील वैचारिक गुलामगिरीचेच लक्षण आहे. ३१ डिसेंबरच्या एका रात्रीत लाखो लिटर दारू रिचवली जाते. अति मद्यसेवनामुळे या दिवशी कितीतरी ठिकाणी अपघात घडतात. या अपघातात कितीतरी निरपराधांचे बळी जातात तर कितीतरी आयुष्यभरासाठी जायबंदी होतात. या एका रात्री अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडतात त्यामध्ये कित्येकांची डोकी फुटतात. शहरी भागांत ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांमध्ये वर्षागणिक तरुणींचे प्रमाणही वाढू लागले आहे. सध्याच्या तरुण पिढीवर सिनेकलाकारांचा प्रभाव अधिक असल्याने अशा पार्ट्यांमध्ये



कित्येक तरुणी तोकड्या कपड्यांमध्ये वावरताना दिसतात. ३१ डिसेंबरच्या रात्री विनयभंगाचे आणि छेडछाडीचे प्रसंगही मोठ्या प्रमाणात घडतात. ३१ डिसेंबरच्या निमित्ताने शेकडो तरुण अन्य मित्रांच्या हट्टामुळे पहिल्यांदा दारूचा ग्लास ओठाला लावतात आणि त्यातील कितीतरी जण पुढच्या वर्षीच्या ३१ डिसेंबरपर्यंत अट्टल मद्यपी झालेले असतात, अनेक बार आणि पब्समध्ये मद्याच्या नावाखाली अमली पदार्थांचीही विक्री केली जाते. पहाटे पाच वाजेपर्यंत परमिट रूम्स चालू ठेवण्याची शासनाने परवानगी दिल्यामुळे अनैतिक कृत्यांसाठी मोकळे रानच उपलब्ध झाले आहे. या सर्वांचा सर्वाधिक ताण पोलीस प्रशासनावर पडतो. कुणी मद्यपान करून वाहन चालवत नाहीत ना, वाहनांचे वेग मर्यादेत आहेत ना, कुठे अमली पदार्थांची खरेदी-विक्री तर होत नाही ना, हे सर्व पाहण्यासाठी पोलिसांना शहरासारख्या ठिकाणी अधिक कुमक मागवावी लागते. एरव्ही रात्रीच्या वेळी कोणी दारू पिऊन झिंगताना दिसल्यास पोलीस त्याला हटकतात; मात्र आता सरकारनेच पहाटे ५ वाजेपर्यंत झिंगण्याची परवानगी दिल्याने पोलिसांना रात्रीची गस्त वाढवून मद्यपींची भांडणे सोडवण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागणार आहे.

या देशात बहुसंख्य हिंदू असून हिंदूंचे नववर्ष हे गुढीपाडव्याला साजरे होते. गुढीपाडवा हा सृष्टीचाही आरंभ दिन आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी नववर्षाचे स्वागत आपण दारी तोरण आणि दाराजवळ गुढी उभारून करतो. पारंपरिक वेशभूषा करून ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतो अन समवयस्कांना शुभेच्छा देतो. घरी गोडधोड केले जाते. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी नववर्ष स्वागतयात्रा काढल्या जातात. निसर्गही या दिवसांत बहरलेला असतो. ३१ डिसेंबरच्या रात्री मद्यपान करून नववर्ष साजरे करणे ही खरेतर पाश्चात्यांची कुप्रथा. ही कुप्रथा जोपासून आपणच आपला ऱ्हास करून घेत आहोत. आपल्या राज्यातील जनतेला सर्व प्रकारच्या हानिकारक गोष्टींपासून दूर ठेवणे, कुप्रथांना प्रोत्साहन देणाऱ्यांना शासन करणे आणि राज्याच्या संस्कृतीचा पुरस्कार करणे हे राजाचे आद्यकर्तव्य आहे; मात्र सध्याचे सरकार हा 'राजधर्म' विसरले आहेत कि काय अशी शंका येते. मद्यविक्रीतून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. नाताल आणि ३१ डिसेंबरच्या निमित्ताने यामध्ये दरवर्षी विक्रमी वाढ झालेली असते. राज्य सरकारमधील दोन प्रमुख पक्ष हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे संस्कृतीप्रिय पक्ष आहेत त्यामुळे पाश्च्यात्य संस्कृतीच्या या अवडंबराला विद्यमान सरकारकडून देण्यात येत असलेले प्रोत्साहन मनाला खटकणारे आहे. नशेखोरीला आणि अनैतिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हलला मुंबईत परवानगी देऊन सरकारने आधीच जनतेचा रोष ओढवून घेतला आहे आता ३१ डिसेंबरच्या रात्रीकरीता मद्यपींसाठी सरकारने पायघड्या घातल्याने हा नक्की छत्रपती शिवरायांचाच महाराष्ट्र आहे का ? असा प्रश्न कोणी बाहेरच्यांनी विचारला तर आश्चर्य वाटायला नको.

**जगन घाणेकर**

अॅग्रोटेक २०२५

# कृषी गंगोत्रीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा महाकुंभ

## चार लाखांहून अधिक शेतक-यांची उपस्थिती ; शाश्वत शेतीसाठी नव्या वाटा खुल्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शाश्वत शेती–समृद्ध शेतकरी या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवणारे राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन 'अॅग्रोटेक २०२५' सध्या अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर शेतकरी, महिला शेतकरी, ग्रामीण युवक व विद्यार्थ्यांच्या उदंड प्रतिसादासह सुरू आहे. भारतीय कृषी क्रांतीचे प्रणेते व स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनानंतर अवघ्या दोन दिवसांत चार लाखांहून अधिक शेतकरी-भगिनींनी प्रदर्शनाला भेट दिली.*



कृषी यांत्रिकीकरण, संगणक-नियंत्रित सिंचन, ड्रोन फवारणी, उपग्रहाधारित हवामान अंदाज, शीतसाखळी, समूहशेती, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, एकात्मिक अन्नद्रव्य व कीड-रोग व्यवस्थापन आदी कालसुसंगत तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शन येथे घडत आहे. प्रयोगशाळेत विकसित झालेले संशोधनाधारित तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न या प्रदर्शनातून ठळकपणे दिसून येतो.

प्रदर्शनासाठी उभारलेल्या पाच भव्य डोम्समध्ये विविध विद्यापीठीय विभाग, संशोधन प्रकल्प, कृषी विज्ञान केंद्रे, शासकीय व खासगी संस्थांची दालने आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहेत. शोभिवंत पुष्पप्रदर्शने, बोन्साय, तंत्रज्ञान दालने, नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचे मॉडेल्स, एकात्मिक शेती व्यवस्थापन (पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन), फळ-भाजी प्रक्रिया व मूल्यवर्धन तंत्रे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष वेधत आहेत. नैसर्गिक शेती संशोधन केंद्र (डॉ. ए. बी. चोरे) येथे गांडूळखत, जीवामृत, पंचगव्य, जैविक खते-बुरशीनाशके, सापळे व आंतरपीक पद्धतींची प्रात्यक्षिके मांडण्यात आली आहेत. एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प (डॉ. जे. पी. देशमुख) अंतर्गत १ हेक्टरवरील जिवंत मॉडेल शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे नियोजन समजावून सांगत आहे. कोरडवाहू शेती संशोधन (डॉ. अनिता चोरे) मध्ये पाणी साठवण, संरक्षित सिंचन, आंतरपीक व हवामान-लवचिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येत आहे. सोयाबीन, कापूस, ज्वार, कडधान्ये, तेलबिया, गहू आदी पिकांचे उन्नत वाण व लागवड तंत्रज्ञान संबंधित संशोधन केंद्रांच्या दालनांत प्रदर्शित आहे. कापसातील अति-घनता लागवड, गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन, ठिबक सिंचन व जोडओळ पद्धती शेतकऱ्यांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरल्या. उद्यानविद्या विभागात फळे-भाज्यांचे अधिक उत्पादन देणारे वाण, रोपवाटिका व मूल्यवर्धित उत्पादने उपलब्ध आहेत.

कीटकशास्त्र व वनस्पती रोगशास्त्र विभागांनी जैविक कीड-रोग व्यवस्थापन, ट्रायकोडर्मा, सापळे व सुरक्षित फवारणी यावर प्रबोधन केले. औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पांतर्गत विविध वनस्पती, रोपे व प्रक्रिया उत्पादने उपलब्ध आहेत. कृषी विज्ञान केंद्रे (गोंदिया, बुलढाणा, सिंदेवाही, अकोला) यांनी तृणधान्ये, भात तंत्रज्ञान, नैसर्गिक शेती, प्रक्रिया उद्योग व नावीन्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर केली आहेत. पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या दालनात पशु-पक्षी प्रदर्शन, दुग्धजन्य पदार्थ, खाद्य व संगोपन माहिती दिली जात असून कमी उंचीची 'पोंगनूर' गाय शेतकऱ्यांचे लक्ष वेधत आहे. काढणीपश्चात अभियांत्रिकी, सूक्ष्म सिंचन, हवेशीर कांदा साठवणूक संरचना, ड्रोन तंत्रज्ञान व पाणलोट व्यवस्थापनाच्या जिवंत प्रतिकृती विशेष आकर्षण ठरल्या. रविवारी चर्चासत्रांत कृषी निर्यात संधी व सोयाबीन लागवड तंत्रज्ञान यांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. आज शेवटचा दिवस असल्याने शेतकरी, युवक-युवती व विद्यार्थी यांनी आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले आहे.



---

# फ्लायओव्हरवर भरधाव कार अनियंत्रित होऊन पलटी; मोठा अपघात टळला



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील अशोक वाटिका चौक ते नेहरू पार्ककडे जाणाऱ्या उड्डाण पुलावर (फ्लायओव्हर) आज मोठा अपघात घडता-घडता टळला. लाल रंगाची मारुती सुझुकी स्विफ्ट कार (क्रमांक श्प ३०५३१७) भरधाव वेगात जात असताना अचानक अनियंत्रित होऊन डिव्हायडरला धडकली आणि रस्त्याच्या मध्यभागी पलटी झाली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सदर कार अशोक वाटिकेकडून नेहरू पार्कच्या दिशेने जात होती. फ्लायओव्हरवरील वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या पिवळ्या-काळ्या रंगाच्या सुरक्षात्मक डिव्हायडरवर आदळली. धडक इतकी जोरदार होती की कार उजव्या बाजूला पूर्णपणे पलटली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कारचा पुढील भाग तसेच डावीकडील दरवाजा मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाला आहे.दरम्यान, फ्लायओव्हरच्या मध्यभागी कार पलटल्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन वाहन बाजूला हटवले व वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे नेमके कारण तपासले जात असून वाहन चालकांनी फ्लायओव्हरवरून जाताना वेग मर्यादेचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

---

# संतश्री सुधांशुजी महाराज यांच्या भक्ती सत्संग कार्यक्रमाचे आयोजन



■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखो भक्तांचे आराध्य पु सुधांशूजी महाराज यांच्या दिव्य भक्ती सत्संगाचा मंगलमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.विश्व जागृती मिशन अकोला संस्थेच्या वतीने हा दिव्य सोहळा गुरुवार दि १९ फेब्रुवारी २०२६ ते २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत श्री गोरक्षण संस्था प्रांगण, गोरक्षण रोड येथे होणार आहे. या दिव्य सत्संग सोहळ्यात रविवार दि २२ फेब्रुवारी रोजी सर्व भक्तांसाठी मंत्र दीक्षा कार्यक्रम होणार आहे.

या दिव्य भक्ती सत्संग कार्यक्रमाच्या आयोजन संदर्भात स्थानीय आनंद निकेतन सत्संग भवन येथे विश्व जागृती मिशनची नियोजन सभा आचार्य श्री शिवदत्तजी महाराज यांच्या मार्गदर्शनात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सद्गुरूंच्या दिव्य वाणीने आणि मंत्रदीक्षेच्या प्रभावाने मानव जीवनाला योग्य दिशा, श्रद्धा, संयम आणि आत्मविश्वास प्राप्त होतो. तसेच सत्संगामुळे मनाला शांती व स्थैर्य प्राप्त होते व आत्मोन्नतीचा मार्ग प्रशस्त होतो असे आचार्य शिवदत्तजी महाराज यांनी सांगून या दिव्य सोहळ्यास सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.


---

# महायुती–महाविकास आघाडीचा जागावाटपाचा पेच अद्याप कायम

## निवडणूक उंबरठ्यावर; अंतर्गत संघर्षांमुळे इच्छुकांची अस्वस्थता

■ समीर ठाकूर ■

**अकोला : महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असतानाही सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांचा जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. वेळ हातातून निसटत असताना दोन्ही आघाड्यांतील घटक पक्षांमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत तडजोडी, स्थानिक नेत्यांचे दबाव आणि बदलते राजकीय समीकरण यांमुळे इच्छुक उमेदवारांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली आहे.**



राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांची तयारी अंतिम टप्प्यात असली, तरी अकोल्यात मात्र आघाड्यांचा 'फॉर्म्युला' अजूनही धूसरच आहे. त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांनी 'थांबा आणि पाहा'ची भूमिका घेतली असून, काहींनी पर्यायी रणनीती म्हणून अपक्ष किंवा बंडखोर उमेदवारीची चाचपणी सुरू केल्याचे चित्र आहे.

एकूणच, निवडणूक तोंडावर येऊन ठेपली असताना आघाड्यांमधील अनिश्चितता, अंतर्गत स्पर्धा आणि बदलती राजकीय समीकरणे यांमुळे मनपा निवडणूक केवळ पक्षीय लढत न राहता नेतृत्व, संघटन आणि रणनीतीची कसोटी ठरण्याची चिन्हे आहेत. तर आजचा दिवस अनेक इच्छुक उमेदवारांसाठी निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

**महायुतीत 'मोठा भाऊ' तरीही अंतर्गत कुरघोडी :** महायुतीतील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपने मनपा निवडणुकीसाठी सुमारे ६५ जागांवर तयारी पूर्ण केल्याची माहिती आहे. शिंदे गटाच्या शिवसेनेने सुमारे २०, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने १० जागांवर तयारी केल्याचे सांगितले जाते. मात्र, हाच आकड्यांचा खेळ अंतिम निर्णयात अडसर ठरत आहे. भाजप राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला दहा जागा देण्यास तयार असल्याची चर्चा आहे. तर अलीकडील राजकीय घडामोडी, विशेषतः मिश्रा यांच्या प्रवेशानंतर शिंदे सेनेसोबतच्या युतीबाबत भाजपातील काही स्थानिक नेत्यांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे संकेत आहेत. काही प्रभागांतील उमेदवारीवरून मतभेद उघडपणे व्यक्त होत असल्याने 'एकसंघ महायुती' होणार असल्याचा दावा प्रत्यक्षात कितपत टिकेल, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**वंचित–काँग्रेस समीकरणामुळे नवे प्रश्न :** मुंबईत रविवारी वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्यात युतीची घोषणा झाल्यानंतर अकोल्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. त्याच धर्तीवर अकोल्यातही वंचित बहुजन आघाडी काँग्रेससोबत हातमिळवणी करणार का, आणि केल्यास त्यांना किती जागा सोडाव्या लागतील, यावर तर्कवितर्क सुरू आहेत. हे संभाव्य समीकरण प्रत्यक्षात उतरल्यास महाविकास आघाडीतील अंतर्गत गणित आणखी गुंतागुंतीचे होण्याची शक्यता आहे.

**महाविकास आघाडीचा सावध, पण आक्रमक डाव :** दुसरीकडे, महाविकास आघाडीतही जागावाटपाबाबत सावध हालचाली सुरू आहेत. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांनी संघटनात्मक ताकद पणाला लावत काँग्रेसच्या वाट्याला अधिकाधिक जागा मिळाव्यात, यासाठी जोर लावला आहे. अकोला पूर्व मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) ची संघटनात्मक पकड तुलनेने मजबूत असून, त्या प्रभागांवर त्यांचा विशेष दावा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला पश्चिम भागातील काही प्रभागांमध्ये चांगली ताकद असल्याने तेथे उमेदवार उभे करण्याची तयारी सुरू आहे. तर रविवारी सायंकाळी या सर्व विषयांना घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या स्थानिक नेत्यांची चर्चा होऊन युती झाली आहे. त्यामध्ये एका प्रभागाचा तिढा अद्याप प्रलंबित आहे. परिणामी काही ठिकाणी महाविकास आघाडी मैत्रीपूर्ण लढतीचा पर्याय स्वीकारण्याची शक्यता वरिष्ठ सूत्रांकडून व्यक्त केली जात आहे.

---

# भव्य खाटू श्याम संकीर्तनाचे आयोजन

**अकोला :** अकोला शहरात मागील ब-याच वर्षापासून खाटू श्याम दरबार लावून कीर्तन करणारी तसेच शहरात व ईतर राज्यात खाटू श्याम चे श्रृंगार साठी सतत तत्परतेने कार्यरत असलेली श्री श्याम श्रृंगार समितीच्या वतीने दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता अकोला महानगराच्या श्री भगवान परशूराम चौक, खोलेश्वर येथे भव्य श्री श्याम संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. ईटारसीच्या सुप्रसिध्द गायिका कृतिका मालवीय आणि दिल्लीचे सुप्रसिध्द गायक श्री शिवम शर्मा या संकीर्तन मध्ये गायनाची सेवा देणार आहे.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Old Passport My Passport No is (J7756161) OLD NAME **SHRUTI KHANDELWAL** NEW NAME **SHRUTI AJAYKUMAR KHANDELWAL** My Residential Address is :- Shreenath Society Om Shreya Gaurakshan Road Akola Maharashtra 444001

---

# सृजनशील परिवर्तनासाठी युवक शक्तीने पुढे येण्याची गरज

## युवक युवती संमेलनातील मान्यवरांचा सूर

■ प्रतिनिधी | अकोला ■

समाज व राष्ट्र बदलण्याची अभूतपूर्व शक्ती ही युवा विश्वात समाविष्ट आहे. युवक हे देशाचे भक्कम आधारस्तंभ असून देशाला विलक्षण कलाटणी देण्याची शक्ती या युवाशक्तीत आहे. मात्र आजची प्रचलित युवाशक्ती ही भरकटलेली असून दिशाहीन होत आहे. अशा युवाशक्तीला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सारख्या तत्त्ववेत्यांची खरी गरज असून ही गरज अश्या वैचारिक महोत्सवाच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याचा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. स्थानीय जिल्हा परिषद कर्मचारी भवनात सुरू असलेल्या वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यस्मरण महोत्सवात रविवारी युवक युवती संमेलन विचारशील माध्यमातून संपन्न झाले. युवा विचार प्रवर्तक सचिन बुरघाटे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या संमेलनात पाहुणे म्हणून शेतकरी नेते प्रकाश पोहरे, हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ, प्रा नितीन बाठे, धनंजय मिश्रा, प्रा ममता इंगोले, सौ उज्वला देशमुख, शिवाजी ठाकरे, वक्ते, प्रा स्वप्निल इंगोले, डॉ आरतीलता देशमुख, डॉ दिपाली सोसे, डॉ नंदाताई आखरे, वैशाली सावळे, रेहाना शेख, चित्रा काकड, वर्षा म्हैसने, डॉ राम उपाध्याय, प्रदीप गिरे, मुकेश वाकोडे आदी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमापूजन व मान्यवरांच्या स्वागताने या संमेलनाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मान्यवर युवक वक्त्यांनी राष्ट्रसंतांच्या वैचारिक प्रबोधनाचा आपल्या वक्तव्यात वहापोह करीत युवाशक्ती वर आपले विचार व्यक्त केले.




संतांची महिमा विशद करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खऱ्या अर्थाने कर्मयोगी संत असल्याचे सांगितले शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी आपल्या मार्गदर्शनात कर्जबाजारी कास्तकार व कृषी क्षेत्राच्या पीछेहाटीचे अनेक कारणे प्रतिपादित केले मोडकळी झालेल्या कृषी निधी व कास्तकारीला जीवनावश्यक वस्तूचा कायदा कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाचे अन्न आयात निर्यात धोरण हे कास्तकारांच्या आर्थिक कमजोरी ला पोषक ठरले आहे पोरे पुढे म्हणाले तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीता ग्रामव्यवस्थेच्या बदलाचे अनेक संकेत दिले आहेत ग्राम व्यवस्था हे सुरळीत राहिली पाहिजे यासाठी ग्रामीण क्षेत्रात ग्राम गीतेची गरज असल्याचे त्यांनी सांगितले प्राध्यापक स्वप्निल इंगोले यांनी कास्तकारांच्या आत्महत्येच्या संदर्भात वहापोह केला हा देशाला जडलेला कर्करोग असल्याचे त्यांनी सांगितले राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेत कृषीनीतीचा मोठ्या प्रमाणात ऊहापौर केला आहे तुकडोजी महाराजांनी देशाला प्रश्न विचारलेले आहेत हा देश केवळ मातीचा तुकडा नसून याच्यासाठी आम्ही मरणा सहित तयार असल्याचे महाराज सांगतात तरुणांना सशक्त विचार देण्यासाठी असे युवक युवती संमेलन ही काळाची गरज असल्याचे प्राध्यापक स्वप्निल इंगोले यांनी यावेळी सांगितले आपल्या अध्यक्षीय मनोगतात सचिन बुरघाटे यांनी या अभूतपूर्व महोत्सवाची उपलब्धी प्रतिपादित केली. आदर्श भाव हा संपूर्ण जीवनात जैसे थे राहिला पाहिजे यासाठी अशा महोत्सवाची खरी गरज आहे युवकांनी अशा कार्याची इतरांना जाणीव करून देणे हेच युवाशक्तीचे प्रथम कार्य आहे. येणाऱ्या पिढीसमोर हाच आदर्श निर्माण झाला पाहिजे यासाठी प्रत्येक युवकाने काळजी करणे खरी गरज असल्याचे बुरघाटे यांनी एवढे सांगितले ते म्हणाले की घरातील सर्वात जवळ मोबाईल आहे.

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# शहरातील अॅटो व डिव्हायडरवर मतदान जनजागृतीचे स्टीकर

## मनपाचा अभिनव उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी मनपा प्रशासनाने अभिनव उपक्रम राबविला आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये व अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात शहरातील विविध भागांत अॅटो रिक्षा तसेच रस्त्यावरील डिव्हायडरवर मतदान जनजागृतीचे स्टीकर लावून नागरिकांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यात आले.

दि. २८ डिसेंबर रोजी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात नवीन बसस्थानक, अशोक वाटिका चौक, दुर्गा चौक, गांधी रोड, नेहरू पार्क चौक आदी प्रमुख ठिकाणांचा समावेश होता. शहरभर फिरणाऱ्या अॅटो रिक्षांमुळे तसेच मुख्य



रस्त्यांवरील डिव्हायडरवरील स्टीकरमुळे मतदारांपर्यंत थेट संदेश पोहोचत आहे.

अॅटोवर लावण्यात आलेल्या स्टीकरमध्ये 'मी मतदान करणार', 'माझे वोट, माझी जबाबदारी', 'दे दे वोट दे', 'मी मतदान करणारच', 'तुम्ही पण मतदान करावे', 'मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडा', 'माझं मत–माझा हक्क, माझा देश, माझा अकोला' अशा प्रभावी घोषवाक्यांचा समावेश आहे. या वेळी मनपा शिक्षणाधिकारी तथा मतदार जनजागृती नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर यांच्यासह संजय खराटे, कार्यक्रम अधिकारी हबीब शाहिदी, मो. अनवार हुसैन, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, प्रशांत राजुरकर, यशवंत दुधांडे, अब्दूल शफीक अब्दूल रफीक, आकाश बागडे, किशोर गुजर, गौरव श्रीवास, शैलेश पवार आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मनपाच्या वतीने अशा विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन पुढील काळातही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### रिझा इव्हिनिंग स्टार अकोला संघाने पटकविला मॉर्निंग चषक २०२५

# मॉर्निंग चषक २०२५ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**अमरावती** - मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या या मैदानातून राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचावेत असे कार्यक्रमाचे अध्यक्ष हेमंत भाऊ काळमेघ शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी मॉर्निंग चषक २०२५ बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी काढले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित माननीय श्री.जगद्गुरु रामानंदाचार्य राजेश्वर माऊली सरकार म्हणाले की, कौशल्य हे माणसाला सहज प्राप्त होत नाही, त्याकरता त्याला बरेच प्रयत्न करावे लागतात. खेळ हा खेळण्यासाठी नसून भारतीय सभ्यता वाढवण्यासाठी आहे असेही ते यावेळी म्हणाले. यासोबतच त्यांनी दोन्ही संघाच्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.




यावेळी प्रामुख्याने मंचावर बडनेरा मतदार संघाचे आमदार रविभाऊ राणा, माननीय श्री जगद्गुरु रामनंदाचार्य राजेश्वर माऊली सरकार , हेमंत भाऊ काळमेघ श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती,डॉक्टर भूपेश भोंड , सागर गिरासे युवा उद्योजक, प्राध्यापक विलास ठाकरे, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद भटकर काका संदीप सगने, संदीप उर्फ पिंटू देशमुख, प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभाला सुरुवात करताना उत्कृष्ट मालिकावीर तथा अंतिम सामन्यात सामनावीर शारीख खान तर उत्कृष्ट फलंदाज अभी चव्हाण व उत्कृष्ट गोलंदाज अमिद अहमद, उदनमुख खेळाडू सागर उर्फ गोलू हे मॅन ऑफ द मॅचपारितोषिकाचे मानकरी ठरले. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. श्री उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्व. श्री प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदुरकर, स्व. चैतन्य संतोष रामेकर, स्व.रामभाऊ विठोबाजी ठाकरे, स्व.बेबीताई देविदास भोंड, स्व. मधुकरराव सगणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरातील रुरल इन्स्टिट्यूट क्रीडांगण पंचवटी चौक अमरावती येथे दिनांक २१ डिसेंबर २०२५ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान १६ संघात खेळण्यात आलेल्या लीग स्पर्धेत आज अंतिम सामन्यात राजे छत्रपती बुलढाणा विरुद्ध रिझा इव्हिनिंग स्टार अकोला या संघादरम्यान अंतिम सामन्यात रीझा इलेव्हन अकोला या संघाने ४८ धावसंख्येचा पाठलाग करीत विजय मिळविला व स्पर्धेचे प्रथम पारितोषिक एक लक्ष रुपये व मॉर्निंग चषक चे मानकरी ठरले.

तर अंतिम सामन्यात पराभूत झालेला राजे छत्रपती बुलढाणा संघाला द्वितीय पारितोषिक रुपये ५१ हजार व मॉर्निंग चषक प्राप्त केला. यादरम्यान बक्षीस वितरण सोहळ्याला सुरुवात करताना प्रामुख्याने शुभम देशमुख अविनाश बागडे, अजिंक्य देशमुख, समर्थ मारोडकर, बाबुभाई चौधरी, यांना विशेष पुरस्कार देण्यात आले तर, गजानन कळमकर, करण मालविय, विशाल जाधव, पंकज जाधव, अभय कडू, सौरभ राजपूत, निखिल वाघमारे, यांचा विशेष कार्यासाठी स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यामागे सर्व मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या सभासदांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पुंड तर आभार प्रदर्शन निलेश नाईक यांनी केले.

## पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेती शाळेचे आयोजन

**अमरावती** - अमरावती येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय तर्फे रब्बी पीक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर अमरावती तालुक्यातील मौजे शिराळा येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालयातर्फे कृषी विद्या विभागाचे प्रा. हेमंतकुमार वि. पवार यांनी शेतकऱ्यांना हरभरा व तूर पिकातील खत व कीड व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन हरभरा व तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापना बाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर शेती शाळा व प्रक्षेत्र भेटी



मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी सौ. नीता कवाणे , सहाय्यक कृषी अधिकारी श्री. मारुती जाधव, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुलाबी थंडी रब्बी पिकांसाठी संजीवनी

## शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण -हरभरा, गव्हाचे पीक बहरले

**तिवसा** - सध्या तिवसा तालुक्यासह परिसरात गुलाबी थंडीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असून, ही थंडी रब्बी हंगामातील पिकांसाठी संजीवनी ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः हरभरा आणि गहू या प्रमुख रब्बी पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले आहेत. निसर्गाची साथ लाभत असल्याने यंदाचा रब्बी हंगाम उत्पादनाच्या दृष्टीने आशादायी ठरेल, असा विश्वास शेतकरी वर्गातून व्यक्त केला जात आहे. गुलाबी थंडीमुळे हवेत आवश्यक ती आर्द्रता टिकून राहत असून, रात्रीची थंड हवा आणि दिवसा सौम्य उष्णता ही हरभरा व गहू पिकांच्या वाढीस अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या अनुकूल वातावरणामुळे पिकांची जोमदार वाढ होत असून कणसांची भर चांगली येत असल्याचे शेतकरी सांगतात. मात्र केवळ वातावरण अनुकूल आहे, म्हणून निष्काळजीपणा चालणार नाही, असे अनुभवी शेतकरी व कृषी तज्ज्ञांचे मत आहे. पिकांचे योग्य नियोजन, वेळेवर पाणी व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर, कीड व रोगांवर नियंत्रण तसेच खर्चाचे काटेकोर आर्थिक नियोजन हे घटक उत्पादनावर मोठा परिणाम करतात. योग्य शेती पद्धती अवलंबल्यासच निसर्गाची साथ फलदायी ठरते, असे शेतकरी स्पष्टपणे सांगतात. काही शेतकऱ्यांच्या



मते, निसर्ग फक्त साथ देतो; मात्र पीक भरभरून येण्यासाठी शास्त्रीय शेती पद्धतींचे पालन आवश्यक आहे. हरभरा पीक जमिनीत नत्र स्थिरीकरणास मदत करत असल्याने पुढील हंगामातील पिकांसाठी जमिनीची सुपीकता वाढते. त्यामुळे हरभरा हा केवळ चालू हंगामापुरता मर्यादित न राहता पुढील वर्षीच्या शेती नियोजनासाठीही फायदेशीर ठरत आहे. तिवसा तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे म्हणाल्या की , रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकांसाठी कृषी विभागाकडून व्हॉट्सॲपद्वारे वेळोवेळी पीक संगोपन व कीड-रोगांची माहिती दिली जात आहे. शेतकऱ्यांनी या सूचनांचे काटेकोर पालन करून शेतीचे नियोजन करावे. रोगांची लक्षणे दिसताच त्वरित शिफारशीनुसार उपाययोजना कराव्यात .योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यास उत्पादनात निश्चितच वाढ होईल.

### अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५

# मतदान कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण यशस्वी

**अमरावती** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही पूर्णपणे पारदर्शक, निर्भय, मुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिका व निवडणूक प्रशासनाच्या वतीने युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. या तयारीचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून मतदान प्रक्रियेत थेट सहभागी असणाऱ्या मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान केंद्राध्यक्ष १, २ व ३ या पदांवर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आणि सखोल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत शहरातील सांस्कृतिक भवन तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ळघ्) येथे एकाच वेळी आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणात विविध शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर सविस्तर मार्गदर्शन या प्रशिक्षणात मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा अत्यंत सविस्तरपणे समजावून सांगण्यात आला. मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचाऱ्यांच्या




जबाबदाऱ्या, मतदारांची ओळख पटविण्याची अचूक पद्धत, मतदार यादी हाताळणी, मतदान प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची दक्षता, आदर्श आचारसंहितेचे पालन, संवेदनशील परिस्थितीतील कार्यपद्धती, आपत्कालीन प्रसंगी करावयाची कार्यवाही तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कायदेशीर बाबी यावर तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रणांचे प्रत्यक्ष हाताळणीसह प्रात्यक्षिक स्वरूपातील प्रशिक्षण देण्यात आले. मशीन सेटअप, मतदानाची प्रक्रिया, त्रुटी आल्यास करावयाची कार्यवाही, सीलिंग व सुरक्षिततेच्या उपाययोजना याबाबत सखोल माहिती देण्यात आली. यामुळे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यात आला. यावेळी सहा.निवडणूक निर्णय अधिकारी विजय लोखंडे, अक्षय मांडवे यांनी प्रशिक्षण दिले.

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाही मूल्यांची खरी कसोटी आहे. प्रत्येक मतदाराचा मताधिकार सुरक्षित, निर्भय आणि पारदर्शक पद्धतीने बजावला जावा, हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान कर्मचारी हे निवडणूक व्यवस्थेचे कणा आहेत. मतदानाच्या दिवशी त्यांची कार्यपद्धती, सजगता आणि जबाबदारी यावरच संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता अवलंबून असते. त्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा सखोलपणे समजावून सांगण्यात आला असून, नियम, कायदे व आदर्श आचारसंहितेचे पालन किती आवश्यक आहे, यावर विशेष भर देण्यात आला आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक व दक्षतेने वापर होणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षणामुळे मतदान कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि कोणत्याही परिस्थितीत ते प्रभावीपणे कार्य करू शकतील, असा पूर्ण विश्वास आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि निष्पक्ष ठेवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संघभावनेने, प्रामाणिकपणे आणि नियमांचे काटेकोर पालन करून काम केल्यास अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५ ही आदर्श निवडणूक म्हणून नक्कीच ओळख निर्माण करेल, असे मनोगत आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी व्यक्त केले. या प्रशिक्षणामुळे मतदान कर्मचारी अधिक सजग, सक्षम व जबाबदार बनतील, तसेच अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५ ही निष्पक्ष, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास निवडणूक प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### घरफोडी करताना तरुण रंगेहात पकडला

## ५,६२० रुपयांची नगदी जप्त; फ्रेजरपुरा पोलिसांची तत्पर कारवाई

**अमरावती** : कुलूप तोडून चोरी करण्यासाठी घरात घुसलेल्या तरुणाला नागरिक व पोलिसांच्या मदतीने रंगेहात पकडण्यात आले. ही घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. आरोपीकडून चोरी केलेली ५,६२० रुपयांची नगदी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. फिर्यादी तेजस रघुनाथ इंगळे (वय ३२, व्यवसाय - नोकरी, रा. आदर्श नेहरू नगर, मालटेकडीजवळ, फ्रेजरपुरा, अमरावती) यांनी २६ डिसेंबर रोजी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास ते घरी परतले असता त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळून आले, तर दार आतून बंद असल्याचे दिसले. संशय आल्याने त्यांनी खिडकीतून घरात डोकावून पाहिले असता आत एक इसम असल्याचे निदर्शनास आले. यावेळी फिर्यादीने आरडाओरड केली, त्यामुळे



परिसरातील नागरिक जमा झाले. तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलीस दाखल झाल्यानंतर नागरिकांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. घराच्या आत तपासणी केली असता आरोपी शौचालयाच्या वर लपून बसलेला आढळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव तेजस पंडित गणवीर (वय २१, रा. नगिना मशिदीजवळ, फ्रेजरपुरा, अमरावती) असे सांगितले. पोलिसांनी फिर्यादीच्या समक्ष आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून फिर्यादीच्या घरातून चोरी केलेली ५,६२० रुपयांची नगदी रक्कम जप्त करण्यात आली. या रकमेतील नोटा विविध चलनातील असल्याची नोंद पोलिसांनी केली आहे.


### जाहीर सुचना

ज्याअर्थी, निबंधक तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय वाई (रुई) यांनी मौजा वाई (रुई) ता,यवतमाळ येथील **सैय्यद अफसर सैय्यद नवाब** यांची दिनांक २०.०३.१९७३ रोजीची मौजा वाई (रुई) ता.यवतमाळ येथे झालेली जन्माची नोद ग्रामपंचायत कार्यालय वाई (रुई) नोंदवहीमध्ये केलेली/झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सर्वत्र नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, **सैय्यद अफसर सैय्यद नवाब** रा.मु.पो.माऊली, ता.दारव्हा, जि.यवतमाळ यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टरमध्ये घेण्याबाबत कोणालाही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायालयास १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास कोणासही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही असे गृहित धरुन अर्जदार यांचा जन्म नोंदीचा आदेश पारित करण्यात येईल. तद्नंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीना ग्राह्य धरण्यात येणार नाही.

आज दिनांक ०८.१२.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आपला,
**(डॉ.योगेश देशमुख)**
तालुका दंडाधिकारी,
यवतमाळ

**दिनांक २६.१२.२०२५**



जनमाध्यम

जनमाध्यम न्यूज ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि. च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १११**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2017-2020

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com


# डॉ.पंजाबराव देशमुख हे खरे समाजसुधारक : प्रा. हेमंत सावळे

**अमरावती -** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती येथे २७ डिसेंबर रोजी भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त 'डॉ. पंजाबराव देशमुख : जीवन आणि कार्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्री दादासाहेब गवई चॅरिटेबलबल ट्रस्टचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस हे होते. तर तर प्रमुख वक्ता म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक तथा साहित्यिक आणि विचारवंत प्रा. हेमंत सावळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख



प्राध्यापक पी. आर. एस. राव हे उपस्थित होते. यासोबतच विचार मंचावर वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. श्याम तंत्रपाळे, प्रा. बोरकर, प्रा. धोटे यांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्वप्रथम विचार मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख आणि स्मृतिशेष लोकनेते रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. व स्वागत समितीच्या हस्ते मान्यवरांना वृक्ष सस्नेह भेट देऊन झाडे लावा आणि झाडे जगवा असा संदेश देण्यात आला. यानंतर सभागृहाला संबोधित करताना प्रमुख वक्ते प्रा. हेमंत सावळे म्हणाले की, 'पंजाबराव देशमुख एका शेतकरी मराठा कुटुंबात जन्माला आले होते तरीही; त्यांनी सर्व बहुजनांसाठी समाज सुधारण्याचे कार्य केले. बोले तैसा चाले हीच त्यांची वृत्ती होती. त्यांनी स्वतः आंतरजातीय विवाह करून समानतेचा पुरस्कार केला. श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि श्री शिवाजी लोकविद्यापीठ याद्वारे त्यांनी शिक्षणाच्या दरवाजे शूद्रातिशूद्रांसाठी उघडून त्यांना शिक्षण व्यवस्थेत आणण्याचे काम केले. याच शिक्षण संस्थांमधून मोठमोठे व्यक्तिमत्व घडले. याचे सारे श्रेय डॉ. पंजाबराव देशमुख यांना जाते. भाऊसाहेब जेव्हा इंग्रजी सरकारमध्ये वऱ्हाड प्रांताचे मंत्री होते तेव्हा त्यांनी १९३० मध्ये 'हिंदू देवस्थानसंपत्ती बिल' सादर केले. या बिलाचा आशय असा होता की, सरकारने सर्व देवस्थाने ताब्यात घेऊन मंदिरासाठी आवश्यक तो खर्च करावा आणि उरलेला पैसा गोरगरिबांच्या शिक्षणासाठी वापरावा.' परंतु तथाकथित मनुवादी विचारसरणीच्या लोकांनी हे बिल मंजूर होऊ दिले नाही. याचे शल्य भाऊसाहेबांना नेहमीच राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकसंत गाडगेबाबा यांच्यासोबत भाऊसाहेबांचे चांगले संबंध होते. भाऊसाहेबांनी कृषीक्षेत्रात क्रांती घडवून आणली. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यासोबतच त्यांनी लोक सुधारण्याचे काम केले. भाऊसाहेब हेच आधुनिक संत आणि खरे समाज सुधारक होय.' यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर पायस आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये म्हणाले की, 'भाऊसाहेबांचे काम सर्व समाजासाठी होते. परंतु त्यांना एकाच समाजामध्ये अडकून ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य वाचत असतानाच त्या जोडीला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सुद्धा जीवन आणि कार्य अभ्यासणे तेवढेच महत्त्वाचे आहे.' यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. आर. एस. राव यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विषयी महत्त्वाची माहिती दिली आणि आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणी सांगितल्या. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वाणिज्य विभागाच्या प्राध्यापिका ज्योती टाले यांनी केले. तर कार्यक्रमाचे मनमोहक असे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. म्हस्के यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.याप्रसंगी प्रा. पी. आर. एस. राव,डॉ. श्याम तंत्रपाळे ,डॉ. सुनील कुमार, डॉ. शुध्दोधन कांबळे,डॉ. प्रदीप अंबोरे,डॉ. प्रकाश म्हस्के, प्रा. डॉ. राजेश देशमुख, डॉ. प्रशांत खेडकर, प्रा. जी.एच. पांडे,डॉ. एस.बी. सांगोले, प्रा. दिपाली पडोळे, प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. अनिल धोटे, प्रा. प्रवीण विधाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. डोईफोडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. नवलकर मॅडम,प्रा. रुद्रा चोपकर,प्रा. ज्योती टाले, प्रा. मेघा चिमणकर, प्रा. स्वप्नील मानकर,प्रा. एन. डी. आढाऊ, प्रा. महेश बनसोड, प्रा. हेमंत सावळे, प्रा. दिपाली गवई,श्री. विजय इंगळे, श्री. राजेश नाखले, श्री. किशोर बिजवे, प्रफुल धार्मिक, सुशांत युनाते, कु. भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, रोशन वैद्य,समस्त विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाविद्यालय, अमरावती उपस्थित होते.


### जाहीर सुचना

सर्व लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **१) सौ.ललिता प्रशांतराव देशमुख, २) महेश प्रशांतराव देशमुख, ३) ऋतुजा प्रशांतराव देशमुख** नं.१ ते ३ यांचे पत्ता - प्लॉट नं.५, केशर कॉलनी नं.१, नवीन अमरावती रेल्वे स्टेशनजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती, **४) सौ.पल्लवी गौरव देशमुख,** पत्ता - चांदूरबाजार, ता.चांदूर बाजार जि.अमरावती यांनी **सौ.कविता भिमराव भंडारकर** रा.नांदगांव खंडेश्वर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती विरुध्द वि.३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथे न्यायालयीन प्रकरण **विशेष दिवाणी दावा क.१८/२०२५** खालील वर्णन केलेली मालमत्ताबाबत दाखल केलेले असून त्या संपूर्ण मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन** - मौजा मुंडगांव, ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथे असलेले शेती गट नं./सर्व्हे नं.६/३, एकुण जमीन ०.७५ + ०.१२ हेक्टर, जमिनीचा कर रु.१०.०४ खालीलप्रमाणे क्षेत्र आणि वर्णनानुसार सीमा असलेले- पुर्वेला - श्री.वैद्य यांचे शेत, पश्चिमेला - तमीज भाई यांचे शेत, दक्षिणेला - उडबंगले यांचे शेत, उत्तरेला - रस्ता.

सदर वर्णन केलेल्या मालमत्तेबद्दल कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार यांच्यासोबत किंवा त्यांच्यातर्फे कोणीही हक्क, अधिकार सांगणाऱ्या सोबत करु नये व तसे केल्यास सदर व्यवहार न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून ते प्रलंबित वाद (Lis-Pendense) तत्वाच्या अधिन राहील व ते मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या कलम ५२ प्रमाणे आरंभतः शून्य राहून माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २६.१२.२०२५

**(ॲड.प्रशांत विजयराव देशमुख)**
खापर्डे बगीचा, अमरावती
मो.नं.९३७०१०७९०५

# प्रसूती, प्रचार आणि सत्ता १४ दिवसांत तिहेरी विजय

## स्नेहा आकरे यांची धडाकेबाज एन्ट्री, नगरपालिकेत असाही विजय

**वर्धा/ जनमाध्यम**

राजकारणात ताकद दाखवण्यासाठी सत्तेची मक्तेदारी, पैसा किंवा बाहुबल लागतेच असे नाही. हे वर्धा नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १४ मधून नवनिर्वाचित झालेल्या स्नेहा आशीष आकरे यांनी ठणकावून सांगितले आहे. गर्भावस्थेच्या अंतिम टप्प्यात, प्रसूती अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना स्नेहा आकरे घराघरांत फिरल्या, मतदारांशी संवाद साधला आणि माझ्या कमकुवतपणावर राजकारण करणाऱ्यांना' थेट रणांगणात उत्तर दिले. प्रचार सुरू असतानाच डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. मात्र 'निवडणूक लढवायची म्हणजे अर्धवट नाही, तर पूर्ण ताकदीने' या निर्धाराने स्नेहा आकरे मैदानात उतरल्या. शारीरिक थकवा, मानसिक ताण, प्रसूतीची भीती या साऱ्यांवर मात करत त्यांनी मतदारांच्या दारात हजेरी लावली.





**७ डिसेंबरला कन्यारत्न**
**२१ डिसेंबरला सत्ता**

७ डिसेंबर रोजी स्नेहा आकरे यांनी गोंडस कन्येला जन्म दिला. मातृत्वाचा आनंद अनुभवत असतानाच २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाली आणि निकालाने वर्ध्यातील राजकीय समीकरणे हादरली. राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.)च्या उमेदवार स्नेहा आकरे यांनी १,१०६ मते मिळवून भाजपच्या संजीवनी वंजारी यांचा २१५ मतांनी पराभव केला.हा विजय म्हणजे केवळ एका प्रभागाचा निकाल नव्हता तो महिलांच्या जिद्दीचा, आत्मविश्वासाचा आणि राजकीय संघर्षातील नव्या पर्वाचा उद्घोष ठरला. सामाजिक कामाची पार्श्वभूमी, विकासाचा स्पष्ट अजेंडा स्नेहा आकरे व त्यांचे पती आशिष आकरे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यामुळे या विजयाला केवळ भावनिक नव्हे, तर कार्यकर्तृत्वाची किनारही आहे. प्रभागात २४ तास पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही व्यवस्था, महिलांच्या समस्या, मूलभूत सुविधा आणि तळागाळातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा अजेंडा मांडला आहे.

### मातृत्वावर राजकारण करणाऱ्यांना सडेतोड उत्तर

स्नेहा आकरे यांचा हा विजय अनेकांसाठी आरसा ठरला आहे. मातृत्व म्हणजे मर्यादा नाही, तर ती राजकीय लढ्याची नवी ऊर्जा ठरू शकते हे या निकालाने दाखवून दिले आहे. वर्ध्यातील हा निकाल केवळ एका प्रभागापुरता न राहता, राज्यातील राजकारणात महिलांच्या भूमिकेवर मोठी चर्चा घडवून आणणारा ठरला आहे.पोटात बाळ, हातात विकासाचा झेंडा आणि डोळ्यांत लोकसेवेचे स्वप्न

### गर्भावस्था ही कमजोरी नाही, तीच माझी ताकद

प्रचारादरम्यान काही विरोधकांनी गर्भावस्थेचा मुद्दा कमकुवतपणाचा म्हणून पुढे केला. मात्र स्नेहा आकरे डगमगल्या नाहीत. माझ्या पोटात वाढणारा जीव मला थांबवणार नाही, तर लढण्याची ताकद देतो, हा संदेश त्यांच्या प्रत्येक भेटीतून उमटत होता.जी स्त्री प्रसूतीच्या वेदना सहन करून नवीन जीवाला जन्म देते, ती समाजासाठी कोणतेही आव्हान पेलू शकते. मातृत्व सांभाळत प्रभागाचा विकास करणे हेच माझे ध्येय आहे.

**-स्नेहा आकरे,** नवनिर्वाचित नगरसेविका

# सहा वर्षांपासून नादुरुस्त पूल; प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेतकऱ्यांचा जीव धोक्यात

**आष्टी (शहिद)/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील बेलोरा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील राणवाडी गावाजवळील नाल्यावरचा पाईप पूल आज 'पूल' न राहता थेट मृत्यूचा सापळा ठरला आहे. सहा वर्षांपूर्वी आलेल्या पुरात हा पूल वाहून गेला, मात्र त्यानंतर तब्बल सहा वर्षे उलटूनही जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील एकही अधिकारी या पुलाकडे फिरकलेला नाही. परिणामी हा नादुरुस्त पूल शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या जीवावर उठला आहे.



राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या राणवाडी गावासाठी हा पूल दैनंदिन जीवनाचा मुख्य आधार आहे. शेतात जाण्यासाठी, शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांसाठी आणि गावकऱ्यांच्या रोजच्या ये-जा साठी याच पुलाचा वापर केला जातो. मात्र पूरानंतर पुलावरील सर्व साहित्य वाहून गेल्याने आज तो अक्षरशः कड्यावर उभा आहे. पाय घसरला, तोल गेला, तर थेट नाल्यात कोसळण्याची भीती कायम आहे.विशेषतः रात्रीच्या वेळी या पुलावरून जाताना साप, विंचू यांसारखे विषारी सरपटणारे प्राणी दिसतात. अंधार, नादुरुस्त संरचना आणि भीतीचे वातावरण या साऱ्यामुळे प्रत्येक प्रवास जीवावर बेतणारा ठरत आहे. तरीही प्रशासन मात्र डोळ्यावर पट्टी बांधून बसले असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.ग्रामपंचायतीने वेळोवेळी पत्रव्यवहार करून, पाठपुरावा करून या पुलाच्या दुरुस्तीची मागणी केली. मात्र कागदोपत्री नोंदींपलीकडे काहीच घडले नाही. सहा वर्षांपासून केवळ 'पाहू', 'प्रस्ताव आहे', अनुदान नाही' अशी कारणे पुढे करून प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली आहे.कोणता तरी मोठा अपघात घडल्यावरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल राणवाडीकर उपस्थित करीत आहेत. एखाद्या शेतकऱ्याचा किंवा विद्यार्थ्याचा बळी गेल्यानंतर जबाबदारी कोण घेणार? असा थेट इशाराच ग्रामस्थांनी दिला आहे.तात्काळ या पुलाची दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देत प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी राणवाडीतून होत आहे.

## संक्षिप्त




### मनोज आगरकर यांची भाजयुमो जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**आर्वी-** आर्वी शहरातील सामाजिक कार्यकर्ते मनोज आगरकर यांची नगरसेवकपदी तसेच भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याने शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या निवडीमुळे नागरिक व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले असून, तरुण व कार्यक्षम नेतृत्वाला संधी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्याचा अनुभव आणि जनतेशी असलेली नाळ यामुळे विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

### वादातून भावावर चाकूने केले वार

**वर्धा-** जागेच्या कारणातून भावाच्या पायावर भाजी कापण्याच्या चाकूने वार करत त्याच्या पत्नीला जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना हनुमान गड पिपरी (मेघे) परिसरात घडली. अशोक तबाने आणि बाबाराव तबाने यांच्यात जागेवरुन वाद सुरू आहे. अंगणात फ्लोरिंगचे काम करताना अशोकने बाबारावला आपल्या जागेत कर, असे म्हटले असता बाबारावने अशोकच्या पायावर चाकुने वार केले तसेच शकुंतला आणि कोमल यांनी अशोकच्या पत्नीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रामनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

### गळफास घेऊन आत्महत्या

**चाणकी (कोपरा) -** नजीकच्या चारमंडळ येथील गजानन खुशाबराव करडे (वय ४५) यांनी घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही. या घटनेची माहिती दहेगाव पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. पुढील तपास दहेगाव पोलीस करीत आहेत.

### घरासमोरून दुचाकी चोरी

**वर्धा-**घरापुढे ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून दिली. ही घटना नारायणपूर येथे घडली. निलेश जांगळे रा. दुर्गापूर, ह. मु. नारायणपूर यांनी एमएच ३४ सीइ ४५२७ क्रमांकाची दुचाकी घरापुढे उभी ठेवली होती. सकाळी त्यांना दुचाकी दिसली नाही. दुचाकी न मिळाल्याने तक्रार करण्यात आली.

## सात विद्यार्थिनींच्या अपघातानंतर नगरपंचायत जागी

# शहरातील अतिक्रमण हटविण्यास नोटीस; दोन दिवसांत कारवाईचा इशारा

**सेलू/ जनमाध्यम**

शहरातील मुख्य रस्त्यावर बोकाळलेल्या अतिक्रमणांमुळे सात शाळकरी विद्यार्थिनींच्या अपघाताची गंभीर घटना घडल्यानंतर अखेर नगरपंचायत प्रशासन खडबडून जागे झाले आहे. सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी नगरपंचायतीकडून संबंधित दुकानदार व व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, दोन दिवसांत अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. मुदतीत अतिक्रमण न हटवल्यास थेट कारवाई करण्यात येणार असून, त्यावरील खर्च संबंधितांकडून वसूल केला जाणार आहे.




काही दिवसांपूर्वी शहरातील मुख्य रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांमुळे नियंत्रण सुटलेल्या कारने शाळकरी विद्यार्थिनींना जोरदार धडक दिली होती. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली होती. या अपघातानंतरच नगरपंचायतीला शहरातील मुख्य रस्ते, भाजी बाजार आणि चौक-चौरस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याचे लक्षात आले, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.नगरपंचायत कार्यालय ते यशवंत चौकापर्यंतचा रस्ता मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणाने व्यापला आहे. पोलीस स्टेशनसमोरच अवजड वाहनांची गर्दी असते.

मेडिकल चौक परिसरात दोन्ही बाजूंनी अतिक्रमण झाल्याने रस्ता अरुंद झाला असून, वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. काही व्यावसायिकांनी सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांवर पक्के बांधकाम केल्याने नाल्यांची साफसफाई होत नसून, परिसरात दुर्गंधी पसरत आहे.मुख्य रहदारीच्या रस्त्यावर चारचाकी व दुचाकी वाहने उभी केल्याने पादचाऱ्यांना तसेच वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. बसस्थानक परिसरात बसेसच्या ये-जा दरम्यान अतिक्रमण अडथळा ठरत आहे. मेडिकल चौक व को-ऑपरेटिव्ह परिसर कायमस्वरूपी वाहनतळासारखा बनला असून, येथे वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. दीपचंद चौधरी विद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ मुख्य रस्ताच वाहनतळ म्हणून वापरला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याशिवाय मुख्य रस्त्यावरच वाहन धुण्याची केंद्रे सुरू असल्याचेही चित्र आहे.दफ्तरी कॉम्प्लेक्स तसेच स्टेट बँकेसमोरील भागात झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या अपघातानंतर नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत अतिक्रमणाचा मुद्दा चर्चेला आला. त्यानुसार मुख्याधिकाऱ्यांनी दि. २६ डिसेंबर रोजी संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या. दोन दिवसांत अतिक्रमण हटविण्याचा इशारा देत, अन्यथा थेट कारवाई करण्यात येईल, असे नोटिसीत स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, अपघातानंतरची ही कारवाई म्हणजे आधी अपघात, मग प्रशासन जागे, अशीच असल्याची टीका शहरवासीयांकडून होत आहे. आता नगरपंचायत खरोखरच अतिक्रमणमुक्तीची प्रभावी मोहीम राबवते की ही कारवाई कागदापुरतीच मर्यादित राहते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## गुलाब आणि इतर कविता'चा साहित्यिक दरवळ

# कवयित्री सुरेखा बोरकर यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

मराठी काव्यविश्वात संवेदनशीलतेचा नवा सुगंध पसरवणारा कवयित्री सुरेखा बोरकर यांचा गुलाब आणि इतर कविता हा काव्यसंग्रह दुसऱ्या अक्षर साहित्य संमेलनात थाटात प्रकाशित झाला. नागपूर येथील महात्मा फुले सभागृहात झालेल्या या प्रकाशन सोहळ्याला साहित्यप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली.



मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र शासनाच्या अनुदानातून आयोजित अक्षरक्रांती जिल्हा साहित्य महोत्सवांतर्गत हे दुसरे अक्षर साहित्य संमेलन कला गौरव संस्था व अक्षरक्रांती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तर राम गणेश गडकरी प्रतिष्ठान यांच्या प्रायोजकत्वाखाली पार पडले.प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक वसंत वाहोकार होते. उद्घाटन प्रदीप दाते (अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ) यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये उर्मिला देवेन, सुरेश पाचकवडे आणि श्रीपाद अपराजित यांचा समावेश होता.या काव्यसंग्रहास लेखक-समीक्षक राजू गरमडे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली असून, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांनी आस्वादनात्मक पाठराखण केली आहे. शब्दशिल्प प्रकाशन यांनी या काव्यसंग्रहाची देखणी निर्मिती केली आहे.या प्रकाशन सोहळ्यामुळे संमेलन अधिकच संस्मरणीय ठरले असून, सुरेखा बोरकर यांच्या काव्यलेखनाने मराठी साहित्यविश्वात आपली स्वतंत्र ओळख अधिक ठळक केली आहे.

## उमरी-मांडवा रस्त्यासाठी नागरिकांचे खासदारांना निवेदन



**वर्धा-**उमरी ते मांडवा या सुमारे १३ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने परिसरातील नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. या रस्त्याच्या तातडीच्या नूतनीकरणासाठी झाडगाव-दिग्रस व बेलगाव ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांच्या वतीने खा.अमर काळे यांना निवेदन देण्यात आले.

उमरी-मांडवा हा रस्ता परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असून सध्या ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे अपघात वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण तसेच कामानिमित्त दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना या रस्त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णवाहिकांना वेळेत पोहोचणे कठीण होत असून शेतीमाल वाहतुकीवरही परिणाम होत आहे.निवेदनाद्वारे या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून मजबुतीकरण करण्यात यावे, तसेच कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. रस्त्याची दुरुस्ती रखडल्यास नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही अप्रत्यक्षपणे देण्यात आला.यावेळी बेलगाव येथील उपसरपंच अक्षय मानकर, विजय बावणे, दिग्रस येथील ग्रामपंचायत सदस्य कुणाल लोखंडे, झाडगाव येथील ग्रामपंचायत सदस्य अतिश कुचेवार, तसेच अमित बादलमवार व स्वप्नील डंभारे उपस्थित होते.

# सत्ता पोस्टरवर नाही, मतदारांच्या मतावर ठरते

## राजकारणाच्या मस्तकावर मतदारांचा सिंहाचा पंजा

### वर्ध्यात मतदारांचं राज्य

**वर्धा/ जनमाध्यम**

लोकसभा असो, विधानसभा असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असो, कोणाला निवडून आणायचे आणि कोणाला पडायचे हे मतदार आधीच ठरवतो आणि निकालात ठोसपणे दाखवतो. ही प्रथा गेल्या अनेक दशकांपासून चालत आली आहे, आणि आजही तीच प्रथा ९ वर्षांनंतर झालेल्या वर्धा नगरपालिकेच्या निवडणुकीत हीच परंपरा दणक्यात सिद्ध झाली.

या निवडणुकीत जनतेचा कौल अगदी स्पष्ट होता. नगराध्यक्षपदी सुधीर पांगुळ यांची निवड मतपेटीत नव्हे, तर चौकचौकांत, चहाच्या टपऱ्यांवर, घराघरांत आधीच पक्की झाली होती. निकालाच्या दिवशी जे घडलं, ते आश्चर्यकारक नव्हतं, ही जनतेच्या इच्छेची अधिकृत घोषणा होती. वर्ध्याने पुन्हा ठासून सांगितलं की सत्ता पोस्टरवर नाही, मतदारांच्या मतावर ठरते.

**जनतेचा गेम, इतिहास साक्षीदार**

वर्ध्याच्या राजकीय इतिहासात हा 'जनतेचा गेम' नवीन नाही. काळाच्या ओघात अनेक दिग्गजांनी या मैदानावर पराभवाची धूळ चाखली. मोठी पदं, वजनदार ओळखी, प्रभावशाली वलय सगळं काही मतदाराच्या एका निर्णयापुढे निष्प्रभ ठरलं. योग्य वेळी योग्य संदेश न ओळखणाऱ्यांना नागरिकांनी थेट जमिनीवर आणलं, आणि हा धडा वारंवार दिला जातो.

**सत्ता गृहित धरली, तर पराभव अटळ**

या निवडणुकीत काहींनी जनतेच्या मनातील बदल ओळखण्यात चूक केली. सत्ता, पद, प्रतिष्ठा आणि गृहित धरलेली लोकप्रियता या भ्रमात अडकून त्यांनी मतदाराकडे पाठ फिरवली. परिणामी, निकालाने एकच संदेश दिला:

मतदाराला गृहित धरलं, तर पराभव ठरलेला. राजकारणाची इमारत मतदाराच्या पायावर उभी असते, पाया दुर्लक्षित झाला, तर कितीही उंच इमारत कोसळतेच.

**आधी जनता, मग सत्ता**

नगरपालिकेच्या निकालाने पुन्हा सिद्ध केलं की, वर्ध्यात राजकारण नेत्यांच्या इच्छेने नाही, तर नागरिकांच्या ठरावाने चालतं. चेहरे बदलतात, समीकरणं बदलतात, सत्ता येते-जात असते, पण वर्ध्याची परंपरा अढळ आहे. आधी जनता ठरवते, मग सत्ता बसते.

**राजकारणाचा शहाणा खेळ मतदाराने उध्वस्त केला**

या निवडणुकीत काही राजकीय खेळाडूंनी सत्ता गृहित धरून रचलेले प्रयोग, प्रचाराची जोरदार मशीन्स आणि पद्धतशीर रणनीती मतदारांच्या सामर्थ्यापुढे निष्फळ ठरले. निकालातून स्पष्ट झाले की, वर्ध्यात सत्ता कुणाचीही गृहित धरली तर पराभव निश्चित आहे. राजकीय शहाण्या, मोठी ओळख, अनुभव सगळं मतदाराच्या एका निर्णयापुढे बिनसार ठरलं.वर्ध्यातील निकाल पुन्हा एकदा हे स्पष्ट करतो की मतदारांचा दबदबा अखंड आहे आणि मतमोजणी फक्त औपचारिकता आहे. राजकारणातील खेळाडू कितीही प्रयत्न करतील, पण अंतिम सत्ता नेहमी जनतेच्या हातात राहते. वर्ध्यात आजही जनता राजा आहे आणि नेते फक्त त्या राजाच्या निर्णयाचे पिंजरे भरतात.

**दिग्गजांनाही घरचा रस्ता**

वर्ध्याच्या मतदारांनी वेळोवेळी वसंतराव साठे, प्रभाताई राव, दत्ता मेघे आणि रामदास तडस यांसारख्या वजनदार नावांनाही थेट जमिनीवर आणले आहे. वसंतराव साठे

यांना काँग्रेसमध्ये मोठं पद मिळण्याची चर्चा रंगात असतानाच नागरिकांनी वेगळाच कौल देत आपली ताकद दाखवली. प्रभाताई राव, दत्ता मेघे आणि रामदास तडस यांनाही वर्ध्याच्या जनतेने वेळोवेळी घरचा रस्ता दाखवला.

इतकंच नव्हे, तर प्रमोद बाबू शेंडे यांच्या विरोधात जनतेने ठाम भूमिका घेत माणिककाका सबाने यांना संधी दिली. ही उदाहरणं एकच सत्य ठळकपणे अधोरेखित करतात वर्ध्यात मतदार जे ठरवतो, तेच घडतं.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ३४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख जयंती

**खल्लार-**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२७व्या जयंती निमित्त अतिथी व्याख्यान झाले.व्याख्यानाचे प्रमुख वक्तेपदी डॉ. भारत कल्याणकर उपस्थित होते.तर व्याख्यानाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रविण सदार उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.रविंद्र इचे होते.सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे,आभार सोनम आमझरे हिने केले.व्याख्यानमालेला प्रा. अतुल चऱ्हाटे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी रासेयो स्वयंसेवक,विध्यार्थी यांची उपस्थिती होती.

### भिवकुंडी येथील शाळेत स्वेटर वाटप

**मोर्शी -** संत्रा उत्पादक शेतकरी अरुणकुमार पेठे यांनी शनिवारी भिवकुंडी येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत तसेच अंगणवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप केले. यावेळी अरुणकुमार पेठे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकर उईके ग्रामपंचायत सदस्य विजय शिरसाम, शाळेचे मुख्याध्यापक नितीन धुरे, शिक्षिका सोनपराते, कोवडे व दोन्ही अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. यावेळी अतिथींच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापक नितीन धुरे, संचालन चंदा सोनपराते व आभार प्रदर्शन ज्योती कोवडे यांनी केले.

### रामकृष्ण चिखलकर यांना राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**लेहेगाव-**राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा १२ जानेवारी ला जन्मोत्सव सिंदखेड राजा येथे साजरा होणार आहे. या जन्मोत्सवात रामकृष्ण चिखलकर यांना राज्यस्तरीय राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विद्युत भवन, महावितरण अमरावती येथील रामकृष्ण चिखलकर गेल्या



कित्येक वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांचे योगदान आहे .त्यांना १ मे रोजी विज वितरण कंपनीचा उत्कृष्ट कामगार पुरस्कार, महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाचा गुणवंत कामगार पुरस्कार, प्रतिभा साहित्य संघाचा कुशल कामगार पुरस्कार आदी पुरस्काराने ते सन्मानित झालेले आहेत. सदरची नियुक्ती ही राष्ट्रमाता जिजाऊ संस्थेच्या अध्यक्षा शिवश्री उज्वला निवृत्तीभाऊ राजे जाधव यांनी केली आहे. रामकृष्ण चिखलकर यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे मित्रपरिवार, प्रतिभा साहित्य संघ, महावितरणसह महाराष्ट्रभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### मनपात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन

**अमरावती-**शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत झाला. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती निमित्य शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर यांचे हस्ते डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले. यावेळी प्रमोद मोहोड, विनोद मार्वे, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, निखिल तिवारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्य संग्राम सेनानी, जेष्ठ कुष्ठसेवक पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी संख्येने उपस्थित होते.

# निवडणूकच्या पार्श्वभूमीवर मनपाचे ‘हॅपी स्ट्रीट’

**अमरावती/का.प्र.**

सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा, मतदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण व्हावी तसेच आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने ‘हॅपी स्ट्रीट’ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शहरातील प्रमुख रस्त्यावर हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती, महिला, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ‘हॅपी स्ट्रीट’ हा उपक्रम राबविण्यात आला.‘हॅपी स्ट्रीट’ उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी चालणे, योगासन, व्यायाम, मुक्त संवाद यांसह मतदान जनजागृतीवर भर देण्यात आला. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचे महत्त्व, प्रत्येक मतदाराची जबाबदारी, तसेच मतदानाच्या माध्यमातून सक्षम व पारदर्शक शासन घडविण्याची



भूमिका याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने उपस्थित मान्यवरांसह नागरिकांनी मतदान करण्याची शपथ घेतली.यावेळी ‘मी नक्की मतदान करणार’ या संकल्पनेवर आधारित स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. अनेक नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून संकल्पपत्रावर स्वाक्षरी केली. या माध्यमातून आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदानाचा संदेश प्रभावीपणे समाजात पोहोचविण्यात आला.या उपक्रमादरम्यान आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत सकाळच्या वेळेत नियमित चालणे, व्यायाम व सकारात्मक सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेण्याचे आवाहनही करण्यात आले. निवडणूक जनजागृतीसोबतच आरोग्य आणि सामाजिक सलोखा या दोन्ही बाबींना स्पर्श करणारा हा उपक्रम नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरला. महानगरपालिकेच्या या अभिनव आणि लोकाभिमुख उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढविण्यास ‘हॅपी स्ट्रीट’ उपक्रम मोलाची भूमिका बजावेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.या उपक्रमात शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, कैलास कुलट, झीन विजयालक्ष्मी यादव, झीन मोहनिश मिसाल ,योगगुरू डॉ. अश्विनी राऊत, योगशिक्षीका सुषमा देऊळकर ( शिरभाते ), शुभम पंदे , नुतन निघोट, दिक्षा वानखडे, अभिजीत,अखिलेश अहिर, शुभांगी मोहिते, योगेश, रविंद्र घुगरे, विलोचना , मेघा, प्रणिता कोलते, हरीश यादव, महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# पथनाट्याच्या माध्यमातून मतदान जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. मनपा आयुक्त माननीय सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप विभागामार्फत शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी जाऊन मतदार जनजागृती केली जात आहे.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून बडनेरा मधील आठवडी बाजारात उपस्थित ग्राहक,व्यापारी, नागरिक व मतदार यांच्यासाठी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्यात



आली.तसेच उपस्थित नागरिकांना मतदानची शपथ देण्यात आली.पथनाट्याच्या माध्यमातून मतदान का आवश्यक आहे, लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे महत्त्व काय आहे, तसेच मतदान न केल्यास होणारे परिणाम याविषयी प्रभावी सादरीकरण करण्यात आले.मतदानाच्या दिवशी सुट्टी असली तरीही प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावणे का गरजेचे आहे, याचे प्रात्यक्षिक देखील यावेळी सादर करण्यात आले. या उपक्रमाला उपस्थित नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास सहा. आयुक्त धनंजय शिंदे, उपअभियंता श्रीरंग तायडे,स्वीप नियंत्रण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, उज्वल जाधव, कैलास कुलट, सोमेश वानखडे, संजय बेलसरे, निजामउद्दीन काझी, सुषमा दुधे, शुभांगी सुने,ज्योती बनसोड, अर्चना रडके, चेतना बोंडे, प्रियंका हंबर्डे, चंचल दातीर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अमरावती महानगरपालिका व स्वीप विभागाच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण होऊन आगामी निवडणुकीत मतदानाचा टक्का निश्चितच वाढेल.

## विद्यापीठात दोन दिवसीय आविष्कार संशोधन

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेल तर्फे ३० व ३१ डिसेंबर, दरम्यान विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी संशोधन संमेलन आविष्कारचे आयोजन करण्यात आले आहे. सदर संमेलन विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात होणार आहे.३० डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता संमेलनाचे उद्घाटन सत्र होणार आहे. सत्राचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावतीचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे उपस्थित राहतील. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व दक्षिण कोरिया येथील कोअर टेक्नॉलॉजी आर. ॲन्ड डी. सेंटर ॲक्टिव्हन कंपनीचे मुख्य संशोधन शास्त्रज्ञ डॉ. प्रवीण उपारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ३१ डिसेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता समारोपीय सत्र होईल. सत्राचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून औद्योगिक आणि अभियांत्रिकी रसायनशास्त्र विभाग, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई मराठवाडा परिसर, जालनाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गावंडे उपस्थित राहतील. सदर द्विदिवसीय संमेलनात विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी आपले संशोधन प्रकल्प सादर करणार आहेत. तरी विद्यापीठाच्यावतीने आयोजित द्विदिवसीय आविष्कार संमेलनाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे.

# नेरपिंगळाई ग्रामपंचायत कडून ५०टक्के करसवलत अभियान सुरु

**लेहेगाव/वार्ताहर**

नेरपिंगळाई हे गाव मोर्शी तालुक्यातील सर्वात मोठे गाव असून या ठिकाणी मुख्यमंत्री पंचायतराज अभियान या अंतर्गत ५० टक्के कर सवलत अभियान मोठ्या प्रमाणात सतर्क राहून राबविण्यात येत असून सदर अभियानाकडे ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. खातेदारांकडे असलेल्या एकूण मागील कराच्या ५०% कर सवलत देण्यात येत असून चालू कर १००% भरावा लागेल म्हणजेच मागील ५०% व चालू संपूर्ण कराचा भरणा करून अनेक खातेदार सदर सवलतीचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत.

गावाचा मोठा व्यास पाहता क्षेत्रफळ मोठे असल्याने गावांमध्ये बाजार चौक झेंडा चौक गणेश चौक इंदिरा गांधी चौक यासह वेगवेगळ्या ठिकाणी ग्रामपंचायत नेरपिंगळेद्वारा स्टॉल उभारून सदर सवलत योजनेचा प्रचार केल्या जात आहे विशेष म्हणजे सकाळीच साडेसात ते आठ च्या दरम्यान स्टॉल उभारून सदर स्टार टोल १२ एक वाजेपर्यंत राहतो ग्रामपंचायतच्या कचरा गाडी द्वारे त्याचा प्रचार सुद्धा सुरू आहे. सदर स्टॉलवर लाभार्थ्यांची गर्दी असून अनेक लाभार्थी आपला कर भरत आहेत



ग्रामपंचायत अधिकारी विनोद मनवर यांचे सह ग्रामपंचायत चे सर्व कर्मचारी रवींद्र पवार, सचिन बर्डे, अमोल पोटे, प्रवीण वानखडे, ज्योती लंगडे, सुनंदाताई मुंडे, विनय भोपळे यांचे सह गावचे सरपंच उपसरपंच सर्व सदस्य व ग्रामपंचायत चे सर्व हितचिंतक ग्रामस्थ यांच्या सहकार्याने हे अभियान सुरू आहे. या अभियानामध्ये या अभियानामध्ये कर सवलती बरोबरच गावाची स्वच्छता शुद्ध पाण्याचा पुरवठा परिसर स्वच्छता समशानभूमीसौंदरीकरण वृक्ष लागवड सौर ऊर्जेचा वापर अंगणवाडी शाळा यांचा विकास सार्वजनिक स्थळांचा विकास देवालय व मंदिर परिसर सौंदर्यकरण महान पुरुषांचे पुतळा परिसरात चौधरी करण याबरोबरच गावातील रस्ते नाल्या बांधकाम इत्यादी कामे येतात ते सुद्धा मोठ्या प्रमाणात सुरू आहेत, गावचे ग्रामपंचायत अधिकारी विनोद मनवर हे सतर्क राहून काम करून घेत आहेत त्यांना गावातील सर्वांचे सहकार्य लाभत आहे. त्याचबरोबर सर्व पत्रकार महोदय हे सुद्धा अतिशय तन-मन-धनाने सहकार्य करत आहेत. दररोज स्टॉल लावल्या जात आहेत सर्वप्रथम जो लाभार्थी या सवलतीच्या लाभाच्या अनुषंगाने कर भरणा करेल त्यांचे पुष्पगुच्छ हार देऊन प्रशासनातर्फे स्वागत सुद्धा केल्या जात आहे.

# २ व ३ जानेवारीला १५६ गावे व २ शहरांचा पाणीपुरवठा बंद

**अंजनगाव सुजी-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या महत्त्वाच्या जलशुद्धीकरण व दुरुस्ती कामांमुळे २ जानेवारी २०२६ ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत १५६ गावे व २ शहरांचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार असल्याची माहिती उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन उपविभागीय अभियंता विजय शेंडे यांनी दिली आहे. जलशुद्धीकरण केंद्रातील आवश्यक कामे, तसेच ६०० मि.मी. व्यासाच्या पाईप लाईनला साठवण टाकीशी जोडण्याचे काम आणि मुख्य लाईनवरील आवश्यक बदल करण्यात येणार असल्याने या कालावधीत पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित १५६ गावांतील व २ शहरांतील नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.सदर कामे पूर्ण झाल्यानंतर नियमित पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जनता विद्यालयात डॉ.पंजाबराव देशमुख जयंती साजरी

**अंजनगाव बारी -** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य विनोद मुगल प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक गजेंद्र अवघड, विनोद चिचोंळकर, हरीभाऊ रामटेके हे होते. सर्व प्रथम फोटोचे पूजन व हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास ब्राह्मणे यांनी केले. पर्यवेक्षक गजेंद्र अवघड



यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना त्यांनी घडवून आणलेल्या कृषी क्रांती विषयी माहिती दिली. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद मुगल यांनी विद्यार्थ्यांना पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रात तसेच शेतकऱ्याकरिता केलेल्या कार्याविषयीची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अर्चना पोकळे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अमरावतीत ३२ बैलजोडींचे मोफत वाटप



**अमरावती/का.प्र.**

शेतकरी व पशुपालकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एकल विद्यालय चिखलदरा व श्री गौरक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ३२ बैलजोडींचे मोफत वाटप करण्याचा भव्य व लोकोपयोगी उपक्रम आज गोसदन, दस्तूर नगर, अमरावती येथे मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकल विद्यालयाचे ओमप्रकाश नावंदर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून एकल विद्यालयाचे सचिव सुमित कलंत्री, श्री गौरक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. अटलजी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. कावरे, व्हीएमडीडीपी योजनेचे संयोजक डॉ. आडे, संस्थेचे सचिव दीपक मंत्री, उपाध्यक्ष श्यामबाबू, तसेच सदस्य ओम बाबू लड्डा, किशोर लाहोटी, हेडा आदी मान्यवरांची उपस्थिती होती.मार्गदर्शनपर भाषणात डॉ. कावरे यांनी पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना व व्हीएमडीडीपी योजनेची सविस्तर माहिती देत शेतकरी व पशुपालकांनी या योजनांचा लाभघ्यावा, असे आवाहन केले. यावेळी भविष्यातही अशाच उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले.कार्यक्रमाचे प्रभावी शेतकरी सक्षमीकरणाचा आदर्श उपक्रम सूत्रसंचालन डॉ. दीपक कर्हे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री गौरक्षण संस्थेचे सचिव दीपक मंत्री यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उत्पादनक्षम साधन उपलब्ध करून देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला असून ग्रामीण विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## सैन्यदलातील त्याग गाथा शैक्षणिक क्षेत्रात

# शासकीय नोकऱ्या नाकारून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी २० लाखांचा त्याग

**अमरावती/का.प्र.**

देशाच्या सीमांचे रक्षण केल्यानंतर नागरी जीवनातही निस्वार्थ सेवेचा आदर्श कसा असावा, याचे ज्वलंत उदाहरण अमरावती जिल्ह्यात समोर आले आहे. सैन्यदलातून निवृत्त झाल्यानंतर MPSC लिपिक आणि ऑर्डनन्स फॅक्टरीमधील सुपरवायझर यासह तब्बल ६ महत्त्वाच्या शासकीय नोकऱ्या नाकारून, केवळ विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी तुटपुंज्या मानधनावर अध्यापन कार्य करणाऱ्या प्राध्यापक डॉ. दिनेश सुरोशे यांचा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष




सत्कार करण्यात आला.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे आयोजित ‘सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५’ निधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळाव्याप्रसंगी हा गौरव सोहळा पार पडला .विद्यार्थ्यांच्या तळमळीपोटी ६ मोठ्या नोकऱ्यांचा त्याग डॉ. दिनेश सुरोशे यांनी सैन्यदलातून निवृत्त झाल्यानंतर आपल्या गुणवत्तेच्या जोरावर एकापाठोपाठ एक अशा ६ महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती मिळवली होती. यामध्ये प्रामुख्याने:MPSC - लिपिक (Clerk), ऑर्डनन्स फॅक्टरी - सुपरवायझर,रयत शिक्षण संस्था - शिक्षक/प्राध्यापक, जलसंपदा विभाग - कालवा निरीक्षक ,आरोग्य विभाग - आरोग्य सेवक , पुरातत्व विभाग - असिस्टंट आर्किओलॉजिस्ट एवढ्या मोठ्या संधी उपलब्ध असतानाही, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याच्या तळमळीपोटी त्यांनी या सर्व नोकऱ्या नाकारल्या. या निर्णयामुळे त्यांचे सुमारे २० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले, परंतु विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी त्यांनी हा त्याग आनंदाने स्वीकारला. प्रशासनाकडून दखल व मान्यवरांची उपस्थिती डॉ. सुरोशे यांच्या या निस्पृह कार्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर (सेना मेडल, निवृत्त) यांना मिळाली. त्यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमाला प्रामुख्याने फ्लाईट लेफ्टनंट चरडे साहेब, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. प्रमोद ठाकरे साहेब राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक

अधिकारी आणि जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर सर यांनी डॉ. सुरोशे यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, डॉ. सुरोशे यांनी सीमेवरील शौर्याची गाथा आता शैक्षणिक क्षेत्रातही सुरू ठेवली असून, त्यांचा हा त्याग तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

# अल्पवयीन मुलाची दगडाने ठेचून हत्या

## हत्येमागे जुन्या वादाची ठिणगी

## क्रिकेट मैदानातील भांडण, अन् सूडाचा थरारक कट

## बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरातील खून प्रकरण दोन तासांत उघड

**अमरावती /प्रतिनिधी::** बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात एका अल्पवयीन मुलाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना २८ डिसेंबर रोजी उघडकीस आली. या हत्येने शहर हादरले असतानाच, अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या दोन तासांत या खुनामागील थरारक कारणमीमांसा उघड करत चार आरोपींना जेरबंद केले आहे. क्षुल्लक वाद, सोशल मीडियाची धमकी आणि सूडाची आग यातून हा खून घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



२८ डिसेंबर रोजी बडनेरा रेल्वे स्टेशनच्या मागील मोकळ्या मैदानातील झुडपांमध्ये एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी तपास सुरू करताच मृतकाची ओळख कुणाल विनोद तेलमोरे (वय १७ वर्षे ६ महिने, रा. पवारवाडी तेलीपुरा, बडनेरा) अशी पटली. कोणतेही प्रत्यक्ष साक्षीदार नसताना गुन्हे शाखेने अत्यंत कौशल्यपूर्ण तपास सुरू केला. तपासात उघड झाले की, सुमारे पाच महिन्यांपूर्वी क्रिकेट खेळताना कुणाल आणि आरोपी दिपेश लक्ष्मण समुद्रे (वय २१) यांच्यात जोरदार वाद झाला होता. याच दरम्यान एका लग्नसमारंभात आरोपीच्या नातेवाइकावर झालेल्या चाकू हल्ल्याचा व्हिडीओ कुणालने मोबाईलमध्ये ☞(पान २ वर)

# तिवसा शहरात अज्ञात चोरट्यांचा धुडगूस

# एकाच रात्री चार घरे फोडली - दागिन्यासह रोकड लंपास

**तिवसा/प्रतिनिधी:-** सध्या सर्वत्र गुलाबी थंडी असल्याने रात्रीच्या अंधारात गृहस्थ हे गाढ झोपेत असतात,ही संधी साधून तिवसा शहरात काही अज्ञात चोरट्यांनी शनिवारच्या मध्यरात्रीनंतर कुलूपबंद घरांना लक्ष्य करून एकाच रात्री चार घरे फोडली.यात एका घरातून सोन्याचे दागिने तर अन्य तीन घरातून रोकड लंपास केली.दुसरीकडे बाहेर हॅन्डल लॉक असलेली दुचाकी चोरुन





नेण्याचा प्रयत्न करण्यात आला.शनिवारच्या रात्रीतून चोरट्यांनी केलेल्या या चोऱ्यांमुळे तिवसा शहरात एकच खळबळ उडाली आहे. शनिवारी मध्यरात्री नंतर तिवसा शहरातील कमल कॉलनी येथील जाधव यांच्या घरी भाड्याने राहणारे डॉ मुरारी विश्वास हे परिवारासह बाहेरगावी गेले होते.ही संधी साधून त्यांच्या घराला अज्ञात तीन चोरट्यांनी लक्ष्य करून दाराचा कुलुपकोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील दिवाण,कपाट पूर्णपणे हुसकून काढत ५ ग्राम सोन्याचे दागिने चोरून पळ काढला.त्याच ठिकाणी श्री लढे यांच्या घरी भाड्याने राहणारे जीवन घागरे हे सुद्धा बाहेरगावी गेल्याची संधी साधून तेथे सुद्धा चोरट्यांनी हात साफ केला.तेथून कपाटातील नगदी १० हजार रुपये चोरून नेले,त्यानंतर तेथून काही अंतरावर शिवनगरी येथे राहणारे श्यामराव पखाले यांच्या घरी सुद्धा चोरट्यांनी प्रवेश करून तेथून नगदी ३५०० रुपये चोरून नेले तर त्याच परिसरात असलेल्या इंगळे यांच्या घरात प्रवेश करून अंदाजे १० हजार रुपये लंपास केले.एवढयावरच चोरटे थांबले नसून त्याच परिसरात राहुल टावरी यांनी घरासमोर उभी करून ठेवलेले हॅन्डल लॉक मोपेड गाडी समोर काही अंतरावर घासत नेली.मात्र ते चोरून नेता न आल्याने तेथेच सोडून पळ काढला.एकूणच १ लाखापर्यंतचा अंदाजे मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. तिवसा शहरात अज्ञात चोरट्यांनी गुलाबी थंडीचा ☞(पान २ वर)

### तीन चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद.

कमल कॉलनी येथे झालेल्या घरफोडीसाठी तरुण वयातील तीन अज्ञात चोरटे,तोंडाला बांधून जात असताना तेथिलच एका सीसीटीव्ही कॅमेरात मध्यरात्रीला कैद झाले असून नेमका याचा छडा आता तिवसा पोलीस कश्याप्रकारे लावतात,याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

# भाजपा शहराध्यक्षाच्या गाडीचा काचा फोडून ऐवज लंपास

**तिवसा -** शहरात अज्ञात चोरट्यांनी चांगलाच धुडगूस घातला.एकीकडे चोरट्यांच्या एका अज्ञात टोळीने चार घरे फोडली तर दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचे तिवसा शहराध्यक्ष अजय गुल्हाने यांच्या ब्रिझ्झा चारचाकी गाडीला देखील लक्ष्य करण्यात आले. त्यांच्या गाडीत रोकड असल्याची माहिती ठेवून असलेल्या अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गाडीच्या मागील बाजूच्या काचा फोडून आतील लॉक उघडून गाडीतील ड्रॉवरमध्ये



असलेले ५० हजार रुपयाची रोकड व नवीनच खरेदी करून आणलेले ४ हजार रुपये किमतीचे २ ☞(पान २ वर)

# शोरूमसमोरून सीडी डिलक्स दुचाकी चोरीला

## अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती : कार लोनच्या कामानिमित्त मारुती शोरूम परिसरात गेलेल्या फायनान्स कर्मचाऱ्याची सीडी डिलक्स दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हर्षल विजय भागवत (वय ४४, रा. शेगाव) हे महिंद्रा फायनान्स कंपनीत कार्यरत असून, कार



लोन प्रकरणांच्या कामासाठी ते २४ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजता सातुर्णा–बडनेरा रोडवरील अस्पा बंडसन्स ऑटो प्रायव्हेट लिमिटेड (मारुती शोरूम) येथे ☞(पान २ वर)

# शेतीच्या वादाने घेतला जीव; पिता-पुत्राने केले विषप्राशन

## उपचारासाठी नेत असताना तरुणाचा अंत

**दर्यापूर (ता. प्र.) :** तालुक्यातील माहुली (धांडे) या शांत गावात एका क्षुल्लक कौटुंबिक वादाने भीषण रूप धारण करत एका तरुणाचा जीव घेतल्याची हृदयद्रावक घटना घडली. शेतीच्या कारणावरून झालेल्या वादानंतर हातमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या पिता-पुत्राने विष प्राशन केले. उपचारासाठी अमरावती येथे नेत असताना ३२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

उमेश रामप्रसाद सोळंके (वय ३२) असे मृत तरुणाचे नाव असून, वडील रामप्रसाद चंद्रभान सोळंके (वय ६५) यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. दोघेही माहुली (धांडे) येथील रहिवासी असून, गुरुवारी (दि. २५) दुपारी घरातील शेतीच्या वादातून त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. क्षणार्धात परिस्थिती हाताबाहेर गेली आणि दोघांनीही टोकाचे पाऊल उचलत विष प्राशन केले. प्रकार लक्षात येताच कुटुंबीयांनी तातडीने दोघांना दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचारानंतर गंभीर अवस्थेमुळे त्यांना अमरावती येथे हलविण्यात आले.☞(पान २ वर)

# अंबापेठ - गौरक्षण प्रभागाच्या रश्मी घनश्याम नावंदर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधी:-** संपूर्ण राज्यभरात महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची रनधुमाळी दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने केंद्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार - अजितदादा पवार यांचे नेतृत्वात व मार्गदर्शनात पक्षाची संघटनात्मक पकड, संघटनात्मक विस्तार मजबूत करीत आमदार - संजय खोडके व आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी विकासविषयक प्रश्न गांभीर्याने हाताळत मतदार विकासाच्या



मुद्द्यावर मतदान करणारच, ही खूणगाठ ध्यानीमनी बाळगून जनतेशी संवाद - संपर्क - चर्चा - समन्वय साधित आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या निवडणुकीत स्थानिक कामगिरी, विकासाची दिशा आणि उमेदवाराची स्वीकारर्हता अधिक महत्वाची ठरत आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारेचा अंगीकार करीत सद्यस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सर्व समाज घटकांना सोबत घेऊन वाटचाल सुरु आहे.संघटनात्मक एकजुटीचा परिचय देत आगेकूच करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आमदार - सुलभाताई खोडके यांच्या नेतृत्वात प्रवेश घेणाऱ्यांचा ओघ सातत्याने सुरु आहे.अशातच रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पक्षाच्या अंबापेठ - गौरक्षण प्रभागाच्या ☞(पान २ वर)

# सततच्या छळाला कंटाळून अल्पवयीन मुलीने घेतला गळफास

### दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

**धारणी (ता. प्र.) :** धारणी तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीने सहनशक्तीच्या पलीकडे गेलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात मुलीला सातत्याने मानसिक छळ देत बदनामी केल्याचा आरोप असलेल्या अनिल श्यामलाल जावरकर व रविंद्र ऊर्फ केंडे धांडे या दोघांविरुद्ध धारणी पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

ही अल्पवयीन मुलगी धारणी तालुक्यातील एका शाळेत शिक्षण घेत होती. आयुष्य उज्वल करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या या निष्पाप ☞(पान २ वर)

# धामणगावात काँग्रेसला खिंडार

## कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, प. स. माजी सभापती सह काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**धामणगाव रेल्वे / प्रतिनिधी:** - मागील पाच वर्षापासून धामणगाव विधानसभा मतदार संघात सुरू असलेल्या विकास कामाच्या झंझावातामुळे धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक, प च्या माजी सभापती, माजी सरपंच, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी रविवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार प्रतापदादा अडसड यांच्या



नेतृत्वात भाजपात प्रवेश घेतला. तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर प स सर्कलचे माजी सदस्य , धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे काँग्रेसचे विद्यमान संचालक ☞(पान २ वर)

# अचलपूर नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यांसाठी काँग्रेस पक्षाकडून नाव चर्चेत

## तर अपक्ष नगरसेवकाचा कौल निल माहेश्वरी की गौरव बंसल यांच्या पैकी कोणाला?..

**अचलपूर (प्रतिनिधी )-** अमरावती जिल्हयात सर्वाधिक सदस्य संख्या असणाऱ्या अचलपूर नगर परिषदेच्या ४१ सदस्यांच्या माध्यमातून चार स्वीकृत सदस्यांची निवड केल्या जाणार आहे. अचलपूर नगर परिषदेत काँग्रेस पक्षाचे १५, अपक्ष १०, भाजपा ९, एमआयएम ३, प्रहार २, राष्ट्रवादी काँग्रेस २ असे एकुण ४१ सदस्यांची संख्या आहे. नगराध्यक्ष पदावर भाजपाच्या सौ. रूपाली माथने विराजीत झाल्या आहे. भाजपाच्या ९ सदस्यांच्या वतीने आ. प्रविण तायडे व भाजपा पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात स्वीकृत सदस्यांकरीता अभय माथने यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.काँग्रेस



पक्षाकडून स्वीकृत नगरसेवक पदासाठी आबिद खान बशीर खान,सागर व्यास ,अजीज खान,माजी नगरसेवक एहतेशाम नबिल यांचे नाव चर्चेत आहे तर दुसरीकडे अपक्ष व इतर सदस्यांच्या माध्यमातून गौरव बंसल, निल माहेश्वरी यांचे नाव आघाडीवर आहेत. जवळपास स्वीकृत सदस्य म्हणून ही चार नांवे निश्चीतच झाल्याचे समजते . मात्र यावर अधिकृत शिक्कामोर्तब निवड प्रक्रियेनंतरच होईल.

# दारूच्या नशेत पत्नीवर पतीचा क्रूर हल्ला

## मारहाणीत कानाची कातडी फाटली, रुग्णालयात दाखल

**अमरावती /प्रतिनिधी::** दारूच्या नशेत घरात आलेल्या पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या हल्ल्यात पत्नीच्या कानाला गंभीर दुखापत झाली असून, उपचारासाठी तिला रुग्णालयात दाखल करावे लागले. याप्रकरणी



दत्तापूर पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शहापूर, जुना धामणगाव येथे वास्तव्यास असलेले बंडू संजय वासेकर (वय ३४) व फिर्यादी महिला हे पती-पत्नी आहेत. १३ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास आरोपी दारूच्या नशेत घरी ☞(पान २ वर)

# शहरात अवैध दारूविक्रीला लगाम; चार आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

## शहरात अवैध देशी दारूविक्रीविरोधात पोलिसांची धडक

**अमरावती /प्रतिनिधी::** शहरात अवैधरीत्या सुरू असलेल्या देशी दारूविक्रीला आळा घालण्यासाठी अमरावती पोलिसांनी २७ डिसेंबर रोजी एकाच दिवशी चार वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत धडक कारवाई केली. या कारवायांमध्ये चार आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येऊन देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रमोद किसनराव जगदाळे (रा. बडनेरा) याच्याकडून देशी दारू 'संत्रा कंपनी'च्या ९० एमएल क्षमतेच्या १५ सिलबंद बॉटल जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत ७५० रुपये आहे. ही कारवाई पोलीस हवालदार सुधीर प्रांजळे व श्रीकृष्ण भानगे यांनी केली.

वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत हेमराज गोवर्धन वर्मा (रा. वलगाव) याच्याकडून देशी दारू 'बॉबी संत्रा' कंपनीच्या १८० एमएल क्षमतेच्या ८ बॉटल जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत ६४० रुपये आहे.

राजापेठ पोलीस ☞(पान २ वर)

# संत श्री गजानन महाराजांच्या चमत्कारांनी व शिकवणीने अनेक भक्तांचे जीवन उजळले - आमदार सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधी:** - श्री संत गजानन महाराज हे महाराष्ट्रातील एक महान संत होते, जे १८७८ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव येथे प्रकट झाले आणि त्यांच्या चमत्कारांनी व शिकवणीने अनेक भक्तांचे जीवन उजळले, विशेषतः श्री गजानन विजय या ग्रंथातून त्यांचे चरित्र आणि लीला ( कार्ये )सांगितल्या जातात, ज्याचे लेखन श्री. दासगणू महाराज यांनी केले आहे आणि त्यांच्या कार्यामुळे शेगांव हे एक मोठे तीर्थक्षेत्र बनले आहे. संत गजानन



महाराजांनी अनेक भक्तांना त्यांचे दर्शन देऊन, मार्गदर्शन करून आणि चमत्कार करून जीवन बदलले. ते आपल्या लीलांनी भक्तांना आध्यात्मिक मार्गावर आणत असत. थोडक्यात गजानन महाराज हे एक दैवी व्यक्तिमत्व होते. ज्यांनी भक्ती आणि साधेपणाचा संदेश दिला आणि महाराष्ट्राच्या अध्यात्मिक परंपरेत एक महत्वाचे स्थान निर्माण केले. श्री संत गजानन महाराज यांचे जीवन वर्णन करणारा ग्रंथ श्री. दासगणू महाराज यांनी लिहिला असून त्याचे नाव ' श्री गजानन विजय ' असे आहे, या ग्रंथात महाराजांच्या आयुष्यातील अनेक आख्यायिका आणि ऐतिहासिक घटना वाचायला मिळतात. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना ☞(पान २ वर)

# राजेश शर्मा यांचे निधन

अमरावती - न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाचे खंदे कार्यकर्ते व दिनेश भाऊ बूब रक्तदान समिती चे पदाधिकारी, शिव टेकडी परिसरातील सदस्य राजेशजी शर्मा (५७)यांचे काल रविवार रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. मागील काही दिवसांपासून ते आजारी असून त्यांचेवर रिम्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. त्यांची अंत्ययात्रा आज २९ डिसेंबर ला दुपारी ४ वाजता त्यांचे राहते घर एएऊ बंगलो, अर्जुन नगर, अमरावती येथून निघेल. आणि हिंदू स्मशान संस्था अमरावती येथे अंत्यसंस्कार केले जातील.

